
अर्थधारा

डॉ. सतीश शास्त्री



अर्थधारा

डॉ. सतीश शास्त्री

प्रकाशक
नचिकेत कम्युनिकेशन्स प्रा.लि. नागपूर.

अर्थधारा
प्रथमावृत्ती : १७ मार्च १९९१

प्रकाशक व मुद्रक
श्री. अनिल सांबरे
नचिकेत कम्युनिकेशन्स प्रा.लि.
२४, योगक्षेम लेआऊट, स्नेहनगर, वर्धारोड, नागपूर-४४००१५

प्रमुख वितरक
श्री. राजाभाऊ कुळकर्णी
साहित्य प्रसार केन्द्र, सिताबर्डी, नागपूर-४४००१२

मुखपृष्ठ : श्री. प्रकाश बेतावार

मूल्य - ५५ रुपये

माझे
प्रेरणास्रोत व आशीषनिधान
तीर्थरुप
प्रा. शंकरराव शास्त्री
आणि
सौ. प्रमिला शास्त्री
यांना समर्पण...

अर्थधारा

अनुक्रम

ऋणनिर्देश

दै. तरुण भारत, नागपूर
योजना पाक्षिक, मुंबई
दै. महाराष्ट्र टाईम्स, मुंबई
दै. नागपूर पत्रिका, नागपूर
वैभव मासिक, मुंबई
दै. युगधर्म, नागपूर
दै. तरुण भारत, पुणे
प्रज्ञालोक, त्रैमासिक, नागपूर.
दै. तरुण भारत, सोलापूर
श्रमकल्याण युग, मुंबई
उद्योग श्री, मुंबई.

काळ १९७० ते १९९१.

मनोगत

अर्थधाराची ग्रंथठेव वाचकांना सुपूर्द करताना मला आनंद होत आहे. अर्थकारण, वाणिज्य-व्यवस्थापन, पर्यटन, वृक्षसंवर्धन, गामकशक्ती, पर्यावरण अशा विविध क्षेत्रातील लेखांचा हा संग्रह आहे. वृत्तपत्रांमधून वेळोवेळी ज्वलंत समस्यांसंबंधी गेल्या दोन दशकांपासून मी लेख लिहिलेले आहेत. प्रामुख्याने ते वरील क्षेत्रांशी संबंधित आहे. समस्येची पूर्वपिठका, स्वरुप, समीक्षा आणि उपाययोजना अशा स्वरुपात लेखाची जडणघडण झालेली आहे. १९७० ते १९९१ या कालावधीतील लेख असल्यामुळे त्यावेळचे संदर्भ व स्वरुपाचे प्रतिबिंब त्यात पडलेले आहे. आकडेवारी जुनी असली तरी समस्यांच्या वाढत्या स्वरुपामुळे लेखाचे महत्व अधिक वाढले आहे. अभ्यासपूर्ण लेख असल्यामुळे ते पुस्तक स्वरुपात प्रसिध्द करावे अशी इच्छा माझ्या मित्र संपादकांनी ब-याच वेळा प्रगट केली. आज ती पूर्ण होत आहे.

अर्थकारण, वाणिज्य-व्यवस्थापन हा विषय केवळ वैचारिक कुतुहलाशी संबंधित नसून तो आता या देशातील जनतेचा जिव्हाळयाचा, अभ्यासाचा आणि संशोधनाचा विषय झाला आहे. लोकशाहीची चौकट कायम ठेऊन आर्थिक नियोजनाचे प्रयोग राबविणारा आपला देश आहे. अर्थकारणातील समस्या एकदम सुटणा-या नाहीत. प्रयत्नपूर्वक धोरणाने, कार्यक्षम नियोजनाने, आणि अंमलबजावणीने समस्यांची तीव्रता कमी होऊन त्या सोडविण्यास यश मिळू शकते.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये वाणिज्य-व्यवस्थापनाची भूमिका महत्वपूर्ण आहे. व्यवस्थापन ही संकल्पना व्यापक स्वरुपाची म्हणजेच कुटुंब, समाज, शासन, उद्योगरचना, व्यापार, अधिकोष, शिक्षणसंस्था, सामाजिक संस्था या सर्वांच्याच संदर्भात उपयोगात येत असली तरी प्रामुख्याने व्यवस्थापन उद्योग-व्यापार आणि औद्योगिक उपक्रमांच्या संदर्भात योग्य स्वरुपात समजली जाते, मानली जाते. व्यवस्थापकांचे कार्य महत्वाचे व विशेष स्वरुपाचे असल्यामुळे व्यवस्थापनात मानवी मूल्यांचे संवर्धन झाले पाहिजे,,असे मानणारा एक मोठा वर्ग तयार झाला असून, या विचारप्रवाहाची अंमलबजावणी करुन, त्यांनी यशप्राप्ती केली असल्याचे दिसून येते. कार्यक्षम व्यवस्थापनामुळे अर्थकारणात चैतन्य खेळते राहते, संसाधनांचा उपयोग होतो, उत्पादनाची पातळी गुणात्मक स्वरुपात वाढते आणि आर्थिक विकासाचा वेग वाढतो. लोकांचे जीवनमान उंचावणारा निर्णायक घटक कार्यक्षम व्यवस्थापनच असतो. प्रदूषण, आजारीपण, बेकारीची स्थिती, सतत हानीची समस्या, स्पर्धेची तीव्र स्थिती इत्यादी स्वरुपाच्या समस्या कार्यक्षम व्यवस्थापनातूनच सुटू शकतात. खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्र तसेच शासकीय क्षेत्र या दोन्ही ठिकाणी अशा कार्यक्षम व्यवस्थापनाची आज नितांत गरज आहे. यांचे प्रतिबिंब अर्थधारामधील लेखांमध्ये पडलेले दिसून येईल.

नव्या तंत्रप्रधान लाटेत उत्पादन क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, आणि सत्ताक्षेत्र विकासमान होण्यासाठी "माहितीक्षेत्र" मूलभूत तसेच महत्वाचे ठरले आहे. कोणत्याही महत्वाच्या विषयासोबत सामान्य विषय वाचकांना प्रत्यक्ष व्यवहारासाठी माहीत असणे आवश्यक झाले आहे. पत्रकारांना आणि अभ्यासकांना तर 'माहिती क्षेत्र' अतिशय उपयुक्त वाटते. या गरजेसाठीच अर्थधाराचा हा लेखन प्रपंच आहे.

जनतेच्या व विशेषतः युवकांच्या मनात सध्याच्या ज्वलंत समस्यांचे स्वरुप समजावून

देऊन जागरुकता निर्माण करणे, उद्योगांच्या विविध पैलूंचे दर्शन घडवून युवकांसमोर नवी क्षितिजे उभारणे, उद्योग-व्यवस्थापनात स्वयंपूर्ण उद्योजक निर्माण करणे, अर्थायाम सारखा महत्वपूर्ण आर्थिक विचार अभ्यासक व संशोधकांच्या समोर ठेवणे आणि देशाच्या अर्थकारणातील समस्यांचे आणि विकासाचे चित्र उभे करणे ही या लेखनामागील भूमिका आहे.

सुप्रसिध्द तत्वचिंतक पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या 'एकात्म मानव दर्शनातून' एकात्म अर्थायामावर प्रकाश टाकला आहे. अर्थाचा प्रभाव आणि अर्थाचा अभाव या दोन्ही स्थिती नसणे म्हणजेच अर्थायाम होय. विकासाचा मानबिंदू ठरणा-या अर्थायामाचे सोप्या भाषेत महत्व विशद केले आहे. काही विचार तात्कालिक महत्वपूर्ण असतात तर काही विचारप्रवाह सार्वकालिक, मूलगामी व कल्याणकारी असतात. अर्थायाम या दुस-या प्रवाहाचा निदर्शक आहे.

अर्वाचीन काळात पर्यटनास सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक दृष्टया अभूतपूर्व महत्व प्राप्त झाले आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांप्रमाणेच भारतात पर्यटन हे आनंददायी, सुखप्रद, उत्पन्नदायी व आवश्यक मानले गेले आहे. म्हणूनच पर्यटन व्यवसाय जागतिक स्तरावर आणि भारतातही लक्षणीय उत्पन्नदायी ठरला आहे. वाढत्या प्रमाणावरील उत्पन्न, रोजगारीची हमी, नवीन शोध, पर्यटनस्थळांचा विकास, वाढती प्रवासी वृत्ती इत्यादीमुळे पर्यटन व्यवसाय अधिकाधिक लोकप्रिय आणि लाभकारी होत आहे. हे विचारसूत्र 'पर्यटन व्यवसायास नवे रुप हवे !' या लेखात मांडले आहे.

पेट्रोल-तेलाची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत आहे. आखाती युध्दामुळे इंधनाची समस्या बिकट होत जाणार आहे. या समस्येचे स्वरुप, मागणी प्रबंधनाची स्थिती, पर्यायी इंधन,,व्यवस्था-त्याचा खर्च, उपाययोजना याबद्दलचे लेखातील विवेचन वाचकांना अर्थपूर्ण वाटेल.

पर्यावरण संतुलन राखण्याची आज नितांत गरज आहे. प्रदुषण निर्मूलनासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन आवश्यक आहे. म्हणून प्रदूषणाची समस्या, गंगाशुध्दी प्रकल्पाची दिशा, औद्योगिक आजारपणाचे स्वरुप आणि समस्या, वृक्षसंवर्धनास पर्याय नाही हे लेख वरील विषयास आशयघन बनवितात.

दारिद्रय हा मानवी जीवनास शाप आहे. संत तुकारामांनी अशा जीवनास 'जळो जिणे लाजिरवाणे' असे संबोधिले. गरिबी अतिशय वाईट परिस्थिती ! तितकीच गंभीर आणि मनःस्ताप देणारी ! गरिबी दूर होत आहे ? गरिबाची व्यथा - निवा-याची कथा, सुशिक्षित बेकारी : नियोजनातील एक समस्या, आर्थिक विषमतेचे आजचे चित्र, निवडणुका आणि काळा पैसा, लोकसंख्या - अर्थकारणातील प्रश्नचिन्ह - या लेखांमधून वरील समस्या चित्रित केली आहे.

अधिकोष आर्थिक जीवनाची नाडी आहे. अर्थप्रबंधनाचे एक महत्वाचे माध्यम आहे. या संदर्भात, जागतिक यादीत सात भारतीय बँकांचे श्रेष्ठत्व ! या लेखाने प्रकाश टाकलेला आहे. बँकांची स्थिती, राष्ट्रीयीकरणानंतर नव्या धोरणामुळे पूर्वीसारखी लाभकारक व दर्जेदार राहिली नाही. शासकीय धोरण राजकारणामुळे सतत बदलत जाते. बँकांच्या लाभकारकतेत लक्षणीय घट या लेखातून हे चित्र व्यवस्थित स्पष्ट झाले आहे.

कथा चवदार कॉफीची , स्पर्धेच्या टोकावरील साबण व्यवसाय हे दोन लेख सर्वसामान्य वाचकांनाही नक्कीच आवडतील. ते सर्वांच्या जिव्हाळयाचे विषय आहेत .

याशिवाय व्यवस्थापनात मानवी मूल्यांचे संवर्धन, विदेशी व्यापार-धोरणात्मक परिवर्तनाची गरज, भारतीय पुस्तकांना विदेशात प्रचंड मागणी, समस्याग्रस्त सार्वजनिक क्षेत्राचे भवितव्य, टी.व्ही. उद्योगाकडून स्वस्त किंमतीतील संचाची मागणी, भेट वस्तू च्या संपन्न बाजारपेठेचे स्वरुप इ. लेखांनी व्यवस्थापन आणि विपणन क्षेत्रातील समस्यांची जाणीव करुन दिली आहे.

वृत्तपत्रीय लिखाण वाचक, अभ्यासक, विचारवंत, धोरण-प्रबंधक, शासक या सर्वांनाच उपयुक्त ठरणारे म्हणजेच सर्वस्पर्शी व बहुआयामी असते. फक्त त्यांना पृष्ठ मर्यादा असते त्यामुळे विषयाचा अधिक विस्तार करणे लेखकास कठीण होते. विषयाचा नेमकेपणा ही उपलब्धी मात्र विशेष स्वरुपाची असते. अशा लेखाची आयुमर्यादा एक दिवसाची असते म्हणून या लेखांना ग्रंथबध्द करणे ही एक वाडःमयीन गरज झाली आहे. अर्थधारा ती पूर्ण करीत आहे.

तरुण भारत नागपूरचे माजी मुख्य संपादक श्री.दि. भा. घुमरे यांनी आर्थिक व ललित स्वरुपाच्या लेखनास आग्रहपूर्वक उत्तेजन दिले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तसेच तरुण भारताचे विद्यमान मुख्य संपादक श्री लक्ष्मणराव जोशी आणि शुक्रवारच्या अर्थरंजन पुरवणीच्या संपादिका सौ. स्वातीताई शहाणे यांनी हेच लेखन सतत माझेकडून येत राहील म्हणून आग्रह कायम ठेवला त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

महाराष्ट्र टाईम्सचे क्रीडा संपादक श्री.वि.वि. करमरकर, केन्द्र शासनाचे वतीने प्रसिध्द होणा-या 'योजना' पाक्षिकाच्या माजी संपादिका श्रीमती विजया जोशी, विद्यमान संपादकद्वय श्री.श्री. भट, श्री.नितीन केळकर, नागपूर पत्रिकेचे मुख्य संपादक श्री. नरेश गद्रे, लोकमत चे संपादक श्री दत्ता कवीश्वर, युगधर्म चे संपादक श्री. पद्माकर भाटे या पत्रकार प्रभृतींचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

माझ्या सी.पी. अॅन्ड बेरार महाविद्यालयाचे विद्वान बहुश्रृत प्राचार्य श्री.श्री.म.पांडे यांचे वेळोवेळी हार्दिक सहकार्य लाभत असते त्यांचा मी आभारी आहे.

अर्थधारा पुस्तकाच्या प्रकाशनाची, मुद्रणाची आणि वितरणाची संपूर्ण जबाबदारी माझे सुविद्य, उद्यमशील मित्र श्री. अनिल सांबरे आणि सौ. अनुराधा सांबरे यांनी स्वीकारली व उत्तम रीत्या पार पाडली याबद्दल त्यांचे तसेच नागपुरातील प्रसिध्द पुस्तक वितरक, विक्रेते, प्रकाशक आणि व्यवसायी श्री राजाभाऊ कुळकर्णी (साहित्य प्रसार केन्द्र) यांचाही मी आभारी आहे.

श्री.परमेश्वर नृसिंहसरस्वतींची कृपा, आईवडिलांचे आशीर्वाद, सुहृदांच्या शुभेच्छा यातून ग्रंथ सिध्दीचे कार्य झाले त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करुन मी हा ग्रंथ वाचकांना सुपूर्द करतो.

वर्षप्रतिपदा **डॉ. सतीश शास्त्री**

दि. १७ मार्च १९९१.

प्रकाशकीय . . . .

अर्थधारा हा ग्रंथ वाचकांचे हाती सोपविताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. अर्थकारण, पर्यटन, पर्यावरण, उद्योग, अधिकोष, वाणिज्य-व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रातील चिंतनशील विचारप्रवाहांचा आणि समस्यांचा लालित्यपूर्ण आविष्कार म्हणजेच अर्थधारा होय.

विकासाचे चक्र गतीने फिरत आहे. आधुनिक यंत्र व तंत्र यांचा उपयोग मोठया प्रमाणावर होत आहे. त्याचा अपरिहार्य परिणाम सर्व क्षेत्रात जाणवत आहे. सामान्य माणसाची, प्रगती करण्यासाठी असलेली जिद्द वाढलेली आहे. तो अधिक जागरुक, विचारी व कार्यप्रवण होत आहे अशावेळी अभ्यासपूर्ण आणि संशोधनपूर्ण क्षेत्रासोबतच जीवनास आवश्यक असणा-या व्यावहारिक स्वरुपाची, समस्यांची आणि स्थितीची माहिती करुन घेण्याची त्याची इच्छा आहे. ती पूर्ण करण्याकरिता एका ग्रंथाची नितांत आवश्यकता होती. अर्थधारा ग्रंथाने ती पूर्ण केली आहे.

डॉ.सतीश शास्त्री हे प्रतिभाशाली लेखक आहेत. गेल्या दोन दशकांपासून त्यांचे आर्थिक व ललित विषयांवरील लेख वृत्तपत्रातून प्रसिध्द होत आले आहे. त्यांचा व्यासंग, अनुभव दांडगा असून त्याला चिंतनाची किनार आहे. त्याचे लेखन प्रासंगिक असले तरी त्याचे मोल चिरंतन स्वरुपाचे आहे. त्या लेखांना चिरस्थायी स्वरुप देण्यासाठी प्रस्तुत ग्रंथाचे प्रकाशन करीत आहोत.

डॉ. सतीश शास्त्री व्यवसायाने प्राध्यापक असून पर्यटनतज्ञ म्हणून त्यांचा लौकिक आहे. प्रकाशनाची संधी दिल्याबद्दल त्यांचे तसेच वितरक म्हणून जबाबदारी स्वीकारल्याबद्दल साहित्य प्रसार केन्द्राचे श्री. राजाभाऊ कुळकर्णी तसेच या दर्जेदार निर्मितीत सहभाग देणा-या सर्व तंत्रज्ञांचे/कलाकारांचे आम्ही आभारी आहोत.

या ग्रंथ निर्मितीला ऑफसेट छपाईमुळे बराच खर्च आला. अन्य संस्थांकडून अर्थसहाय्य मिळविण्याचा प्रयत्न केला पण तो असफल ठरला.

प्रसिध्दी पूर्व नोंदणीच्या आमच्या योजनेला वाचकांनी कल्पनेपेक्षा अतिशय चांगला प्रतिसाद दिला. त्यांच्या या सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

सर्वांगसुंदर शैलीमध्ये डॉ. सतीश शास्त्री यांनी लिहिलेला हा ग्रंथ वाचकांना नक्कीच आवडेल व व्यावहारिक उपयुक्ततेचा ठरेल यात शंका नाही.

अनिल सांबरे
प्रकाशक

एकात्म अर्थायाम : विकासाचा मानदंड

पं. दीनदयाल उपाध्याय !

एक थोर तत्वचिंतक !

एक सत्प्रवृत्त लोकनेता !

एक कुशल संघटक !

एक प्रतिभाशाली राष्ट्रपुरुष !

एक नवे संपन्न तत्वज्ञान देणारा विवेकी विचारवंत-

अशा बहुविध पैलूंनी नटलेले आदर्श व्यक्तित्व पंडित दीनदयालजींचे होते.

आधुनिक भारताच्या इतिहासात आपल्या असामान्य कर्तृत्वाचा अमीट ठसा उमटविणारी काही महान व्यक्तिमत्वे होऊन गेलीत. अशी थोर माणसे आपल्या आदर्श व्यक्तितत्वाने, कर्तृत्वाने व विचारदर्शनाने एक इतिहास घडवीत असतात. एक श्रेष्ठ संकल्पना व त्यसानुसार विशिष्ट परंपरा निर्माण करीत असतात. त्यातून राष्ट्रजीवनात जी विविध आवर्तने निर्माण होतात ती समाजाला कल्याणप्रद जीवनाकडे जाण्याचा एक निश्चित मार्ग दाखवितात. अशा प्रकारच्या श्रेष्ठ महापुरुषांमध्ये पं. दीनदयाल उपाध्याय यांची गणना होते.

पडितजींच्या गुणवैभवी जीवनाची प्रभा विस्मित करणारी आहे. आपल्या असामान्य संघटनकौशल्याने व प्रखर ध्येयनिष्ठेने भारतीय जनसंधाला त्यांनी एक राष्ट्रीय अधिष्ठान व अखिल भारतीय स्वरुप प्राप्त करुन दिले. जनसंधाप्रमाणेच रा. स्व. संघाचे प्रचारक या नात्याने केलेले त्यांचे कार्य संस्मरणीय आहे. साधुत्च, समत्वबुध्दी व अष्टावधानी प्रतिभा या पैलूतून त्यांचे श्रेष्ठतम व्यक्तिमत्व उजळले होते. त्यांनी केलेले कार्य, राष्ट्रकारणाच्या क्षेत्रातील एक महान सजग प्रहरी म्हणून गौरवास्पद आहे.

एका राजकीय पक्षाचे प्रमुख या नात्याने पंडितजींनी प्रामुख्याने राष्ट्रकारणाचे कार्य केले

असले तरी त्यांचा पिंड राजकीय नसून मूलगामी तत्वचिंतकाचा होता. राजकारणाचा विचार करीत असतानाच, भांडवलशाही, समाजवाद, व भारतीय अर्थनीती यांच्या अभ्यासानंतर, अर्थकारणाविषयी केलेले त्यांचे चिंतन आजही मौलिक ठरते. त्यांचे अर्थचिंतन राष्ट्रकारणाच्या व्यापक अधिष्ठानावर उभे असल्याने मानवाच्या सर्वांगीण विकासाचे तत्व म्हणून अन्य आर्थिक तत्वज्ञानाच्या तुलनेत ते श्रेष्ठ ठरते. एकात्म अर्थायाम हा एकात्म मानवदर्शनाचा एक भाग आहे. दीनदयालजींच्या या तत्वदर्शनाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

संभ्रमावस्था

अर्धविकसित राष्ट्रांमध्ये विकासाची प्रक्रिया सुरु असल्यामुळे सर्वांचा विकास व त्यातून सर्वजण सुखी आहेत असे गृहीतच धरता येत नाही. पण पाश्चिमात्य जगामध्ये मात्र आर्थिक समृद्वीचे चित्र दिसून येते. नवीन यंत्र आणि तंत्राच्या अभूतपूर्व शोधामुळे यांत्रिक संस्कृती विद्यमान झाली. त्यातून भौतिक सुख-समुद्वीची विविध रुपे मानवाला अनुभवायला मिळाली पण तरीही समस्याची निर्मिती होतच गेली प्रा. गॅलब्रेथच्या शद्वात,

" अमेरिकेसारख्या सुसंपन्न भांडवलशाही राष्ट्राला विविध समस्यांनी घेरले असून, अमेरिकन माणूस सुखाच्या शोधात आहे."

पाशिचमात्य राष्ट्रात खून, बलात्कार,आत्महत्या,फसवणूक,काळाबाजार, इत्यादींचे प्रमाण सर्वाधिक आहे. तेथे प्रचंड संख्येत मनोरुग्ण तयार होत आहेत. पिढीच्या पिढी अफू,चरस,गांजा,गर्द इत्यादी व्यसनांनी ग्रस्त आहे. भांडवलशाही व समाजवाद या दोन्ही आर्थिक विचारंप्रणालीने माणसाला भौतिक सुख देण्याचा प्रयत्न केला पण माणूस ख-या अर्थाने सुखी होऊ शकला नाही. यामुळे पश्चिम जगात मानवी संभ्रमावस्था निर्माण होत असल्याचे चित्र दिसून येते.

अर्थाचा अभाव आणि प्रभाव

जीवनातील सर्व भौतिक सुखे पैशानेच प्राप्त होतात म्हणून माणसाला किमान द्रव्याची आवश्यकता असते, पण दारिद्रयात पिचत पडलेल्या लोकांना मूलभूत गरजा पूर्ण करण्याइतपत वेतन मिळत नाही. त्यामुळे आपल्या कुटुंबाच्या अन्न, वस्त्र, व निवारा या गरजा तो पूर्ण करु शकत नाही. त्यातून दुराचारी स्थिती निर्माण होते. परिस्थितीचा वैताग येऊन जीवनच नकोसे होऊन जाते. अर्थाचा अभाव अशी भयानक स्थिती निर्माण करतो. या संदर्भात पं. दीनदयालजी लिहितात, ' अर्थाचा अभाव आणि प्रभाव या दोन्हीमुळे आर्थिक स्वातंत्र्य नष्ट होते. सुलभ निर्वाहसाधन उपलब्ध न होणे तसेच उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक भांडवल न मिळणे म्हणजे अर्थाचा अभाव होय. ही बाब व्यक्ती व राष्ट्र या दोहोंनाही लागू आहे. संपत्ती हे केवळ साधन आहे. याचे विस्मरण होऊन तिच्या विषयी आसक्ती असणे, धर्मानुकूल उपभोगाची इच्छा, ज्ञान वा शक्ती नसणे, अर्थाचा अनुचित बडेजाव, आर्थिक विषमता,

चलनफुगवटा, चलनाचे अवमूल्यन या कारणांमुळे अर्थाचा प्रभाव निर्माण होतो. अर्थाच्या प्रभावामुळे माणसांची कार्यशक्ती कुंठित होते आणि श्री व समृद्धी यांचा -हास होतो.' [संदर्भ- सिद्धांत] अर्थाच्या अभावातून व प्रभावातून समस्या निर्माण होऊन व्यक्ती, समाज आणि राष्ट्र समृद्धीच्या मार्गाने जाऊ शकत नाही हे नेमके सूत्र त्यांनी अर्थनीती विशद करताना स्पष्ट केले.

अर्थायाम

संपत्तीच्या अभाव व प्रभाव या दोन्हीपासून समाजजीवन मुक्त ठेवून समाजात संपत्तीसंबंधी निर्माण करण्यात येणा-या योग्य व्यवस्थेला " अर्थायाम " म्हणतात. जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन. वितरण. मालकी व उपभोग या सर्व पैलूंचे सुयोग्य व्यवस्थापन अर्थायामात अपेक्षित आहे. लोकशाहीने मानवला स्वातंत्र्य दिले. भांडवलशाही व समाजवाद यांनी आपापल्या विचारप्रणालीनुसार आर्थिक मानव तयार केला पण त्यांना सुखी मानव, सुखी समाज तयार करता आला नाही. अर्थायामात तो अपेक्षित आहे. " अर्थाचे उत्पादन,विनिमय व उपभोग व्यवस्थित करण्यासाठी अर्थायामाची आवश्यकता आहे. यासाठी आर्थिक क्षेत्रात विविध प्रकारच्या संस्था निर्माण होतात. शासनाची जबाबदारी महत्वाची असते. परंतु सर्व उद्योग व उत्पादनाची सर्व साधने शासनाच्या मालकीची केल्यास राजकीय व आर्थिक शक्तींचे केंद्रीकरण होते, हे उचित नाही. अनुशासनाच्या दृष्टीने व राष्ट्राच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात यासाठी आर्थिक क्षेत्रात सामान्यपणे नियोजन,निर्देशन, नियमन आणि नियंत्रण यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी शासनाकडे असावी." [संदर्भ - राष्ट्रजीवनाची दिशा] दीनदयालजींच्या या विचारात खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे योग्य संतुलन साधण्याची स्थिती अपेक्षित आहे. अशा संतुलनामुळे दोन्ही क्षेत्रांतील मर्यादा नष्ट होऊन विकासाची गती वाढते.

आर्थिक विकेंद्रीकरण

अर्थायामाच्या स्थितीत अर्थव्यवस्थेचा निकष व्यक्तीचा सर्वंकष कल्याण हाच असतो केवळ आर्थिक मानव नव्हे. ज्या व्यवस्थेत मानवाची आर्थिक क्षमता वाढते परंतु मानवत्वाची, अन्य अंगोपांगाच्या विकासाची क्षमता कुंठित होते ती व्यवस्था कल्याणकारी होऊ शकत नाही. संपूर्ण मानवाचा विचार न करता केवळ अर्थपरायण मानवालाच सर्व क्रियाकलापाचे केंद्र कल्पून विकसित झालेली भांडवलशाही अर्थव्यवस्था अपूर्ण आहे. जास्तीत जास्त नफ्याची स्वार्थी हाव ही या व्यवस्थेची प्रेरक शक्ती असून स्पर्धा ही तीची नियामक शक्ती असते. अर्थव्यवस्थेसंबंधीच्या या कल्पना भारतीय जीवनदर्शनाशी विसंगत आहेत. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतून उभ्या राहिलेल्या समस्यांची प्रतिक्रिया म्हणून उदयास आलेला समाजवाद [त्याची उद्दिष्टे स्तुत्य असली तरी] मानवाच्या हिताचा ठरला नाही, याचे कारण शास्त्रीय समाजवादाचा उद्गाता कार्ल मार्क्स यांचे व्यक्ती व समाज यासंबंधीचे विश्लेषण मूलतः

भौतिकवादी आहे म्हणून अपूर्ण आहे. वर्गसंघर्षाच्या भूमिकेतून स्वेच्छापूर्वक स्थायी सहकार्याची भावना निर्माण होऊ शकत नाही.

भांडवलशाही व समाजवाद या दोन्ही व्यवस्थांमध्ये भांडवलाच्या मालकीसंबंधी मतभेद आहेत परंतु दोन्हींची ही परिणती संपत्तीचे केंद्रीकरण व एकाधिपत्य यात होते. दोहोमध्ये मानवाची उपेक्षाच होते. आपल्याला अशी अर्थव्यवस्था अपेक्षित आहे की, ज्यामध्ये व्यक्तीची उपक्रमशीलता कायम राहील, तसेच समाजातील व्यक्तींच्या अन्योन्य संबंधात मानवतेचा विकास होईल. विकेंद्रित अर्थव्यवस्थेनेच हे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल.

पंडितजींनी सुस्पष्ट रीत्या विकेंद्रित अर्थव्यवस्थेची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील अनेक दुष्परिणामांचे मूळ केंद्रीकरणात आहे. लघु व कुटीरोद्योगांचा मोठया प्रमाणावर विकास करुन विकेंद्रित अर्थव्यवस्था अंमलात येऊ शकते. शेती, सहकारी चळवळ व समित्या आणि छोटे उद्योग हे अर्थव्यवस्थेचे मूळ आधार समजल्या गेले पाहिजेत. भारतातील प्रचंड लोकसंख्येच्या स्थितीतून निर्माण होणारी बेकारी यामुळे कमी कमी होत जाईल व दारिद्रयातील जनतेला आपल्या किमान गरजा भागविण्यासाठी किमान रोजगार उपलब्ध होईल.

सामान्यपणे उत्पादनवाढ,न्यायोचित वितरण आणि संयमित उपभोग या तीन्ही बाबींचा सातत्याने विचार करण्याची गरज असते. या तिन्ही गोष्टी एकाचवेळी सुरू राहतील म्हणजे उत्पादनात वाढ होईल. योग्य वितरण होईल आणि संयमित उपभोगामुळे उत्पादनवाढीसाठी आवश्यक ते अधिक भांडवलही उपलब्ध होत जाईल, असे चक्र अर्थायामात अपेक्षित आहे.

विकासाचा मानदंड

आर्थिक धोरण निश्चित करीत असताना प्रत्येक व्यक्ती समाजाचा घटक आहे असे समजून स्वतःचा विकास साधण्यासाठी, त्याला शिक्षण देण्याची व रोजगार उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासनाने व समाजाने पत्करली पाहिजे, असे त्यांचे आग्रही मत होते. किमान जीवनाची हमी, रोजगार, सामाजिक सुरक्षितता, समाजकल्याण हे मूलभूत अधिकार मान्य करुन तशी व्यवस्था उपलब्ध करुन दिली तर अर्थायाम मानवी विकासाचा एक निश्चित स्वरुपाचा मानदंड ठरु शकतो.

अर्थायामामध्ये औद्योगिक विकासाच्या धोरणाचाही समावेश होतो. असे धोरण ठरविताना केवळ आर्थिक बाजूचा विचार केल्यास ते सदोष ठरण्याचाच धोका जास्त असतो, म्हणून आर्थिक घटकांसोबत, राजकीय व सामाजिक उद्दि ष्टे विचारात घ्यावी लागतात. दीनदयालजींच्या मते ही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत. [१] राष्ट्रांची संरक्षणशक्ती वाढविणे. [२] उपभोग्य व उत्पादक वस्तूंचे उत्पादन वाढविणे. [३] प्रत्येक व्यक्तीला निर्वाहक्षम रोजगार देणे. [४] जीवनाचे किमान राहणीमान सर्वांना प्राप्त करुन देणे. [५] अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण करुन आर्थिक विषमता कमी करणे.

वरील उद्दिष्टांमधून व्यापक राष्ट्रहिताचे औद्योगिक धोरण दृष्टीसमोर येते. सुसंघटित

व अद्ययावत तंत्रविज्ञानाचा उपयोग करणारे विशाल उद्योग आवश्कतेनुसार ठेवून मोठया प्रमाणावर लघुउद्योग-ग्रामोद्योग इंत्यादींना आर्थिकदृष्टया सुदृढ बनविणे आवश्यक आहे. लहान उद्योगांच्या विकासामुळे खेडे स्वयंपूर्ण बनू शकते. ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचविण्यासाठी हे औद्योगिक धोरण अतिशय उपयुक्त ठरते,अमेरिकेतील डॉ. आइन्स्टाईन या तज्ञाने या संदर्भात असे मत व्यक्त केले, " जगातील दोन तृतीयांश दारिद्रयपीडित लोकांना तर हा मार्ग संजीवनी देणारा ठरे लच परंतु समृद्व पाश्चात्य जगालाही दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करु शकेल."

आपल्या देशात श्रमशक्ती भरपूर आहे त्यामानाने भांडवलाची मात्र कमतरता आहे. मोठया उद्योगासाठी विशाल प्रमाणावरील भांडवलाची गरज असते. सामान्य जनतेतून ते उभारणे कठीण असते. अशा स्थितीत शेतीशी सुसंवाद होऊ शकणा-या व शेत जमिनीवरील भार कमी करू शकणा-या उद्योगाची कायम स्वरुपात व्यवस्था करावयाची असल्यास दीनदयालजी म्हणतात त्याप्रमाणे लघु उद्योगांनाच प्राधान्य देणे आवश्यक ठरते. आजच्या परिस्थितीत अल्प भांडवलावर सुरू होणारा हा लहान उद्योगच खेडयांच्या विकासाचा मानदंड ठरु शकतो, यात शंका नाही.

एकात्म मानव दर्शन

अर्थायामाचे तत्व सविस्तर प्रगट केल्यानंतर दीनदयालजींनी त्याही पलीकडचे मानवाच्या सर्वंकष कल्याणाचे तत्वज्ञान विशद केले आहे. एकात्म मानवदर्शन हे एक स्वयंपरिणत प्रज्ञेचे प्रतिभाशाली चिंतन आहे. व्यक्ती, समाज व निसर्गपरिवार या सर्वांचे एकात्म स्वरुपात कल्याण चिंतणारा एक नवा आयाम आहे. व्यक्तीचा विकास म्हणजे शरीर, मन, बुद्वी व आत्मा हे जे संकलित स्वरुप आहे या सर्वांचा क्रमशः विकास यात गृहीत धरला आहे. भौतिक सुखविषयक गरजांच्या पूर्तीसोबतच नैतिक व आध्यात्मिक उन्नतीही घडून आली म्हणजे ख-या अर्थाने व्यक्तीचा विकास होतो.

समष्टी म्हणजे समाज हा असंख्य व्यक्तींचा मिळूण बनलेला समुदाय असतो. त्यालाही एक स्वतंत्र व्यक्तिमत्व असते. व्यष्टी व समष्टी एकात्मतेच्या बंधनाने परस्परांशी निगडित असल्यामुळे ते परस्परांना पूरक व पोषक असतात. समष्टीलाही व्यक्तीप्रमाणेच धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे चारही पुरुषार्थ असतात. सुव्यवस्थित जीवनासाठी समष्टीला आधारभूत असा धर्म असतो, तर समाजाची सामूहिक कर्तृत्वशक्ती वृध्दिगत होण्यासाठी आर्थिक तत्वज्ञान म्हणजेच अर्थ ही असतो. समाजाचे स्वातंत्रय व संघटित जीवन सामूहिक कामपुरुषार्थावर म्हणजेच मनोबलावर अवलंबून असते. समाजाला, राष्ट्राला आत्मा असतो. या संदर्भात दीनदयालजी म्हणतात," प्रत्येक राष्ट्र सर्वतोपरी सत्तने नेमून दिलेले जीवन कार्य घेऊन जन्माला येते. या कार्याच्या पूर्तीसाठी आपल्या सर्वशक्तीनिशी प्रयत्न करणे हीच त्या राष्ट्राच्या विकासाची सर्वोत्तम व एकमेव साधना आहे. म्हणजेच राष्ट्राचा मोक्ष पुरुषार्थ होय."

समष्टीच्या पलीकडे नैसर्गिक सृष्टीचा विचार येतो. वनस्पती, प्राणी सृष्टी यांचाही

विकास होणे आवश्यक आहे. मानव हा निसर्गपुत्र आहे. निसर्गाचा उपयोग त्याच्या व्यक्तिमत्व विकासासाठी होत असतो. निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी वनस्पती व प्राणीमात्रांचा विकास व्हावा लागतो. माणसांच्या जीवनामध्ये व विकासामध्ये निसर्गाचा वाटा फार मोठा आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचे पोषण करुन संवर्धन करुन मानवाने विकास केला पाहिजे कारण दोन्ही घटक परस्परपूरक आहेत.

आत्मसुखाचे व्यापक स्वरूप-परमेष्टी

सृष्टीच्या विकासापलीकडे परमेष्टी म्हणजेच अध्यात्म होय. विश्वाचे नियंत्रण करणारी एक परमशक्ती आहे. या शक्तीलाच सर्वव्यापी परब्रम्ह परमेश्वर मानले आहे तीच एकमात्र सर्व विश्वसंचालक शक्ती आहे. या परब्रम्हा ठायी सत्यम् शिवम् सुंदरम् ची अभिव्यक्ती पूर्ण असल्यामुळे मनुष्य, या गुणांकडे आकर्षित होत असतो व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात या गुणांची अनुभूती घेत असतो.

माणसामाणसातील एकतेची अनुभूती आणून देणारी परमतत्व असलेली शक्ती म्हणजेच परमेश्वर होय. मनुष्य आध्यात्मिक मार्गाने "मीपण" विसरुन परमतत्वाशी समरुप होतो त्यावेळी त्याचे षड्विकार नाहिसे झालेले असतात व खरे आत्मसुख, आनंदमय स्थिती तो त्यावेळी अनुभवतो. ही त्याच्या कल्याणाची अंतिम अवस्था आहे. " आनंदाचे डोही, आनंद तरंग, आनंदचि अंग, आनंदाचे," असे वर्णन संतांनी या अवस्थेचे केले आहे.

एकात्म मानव दर्शनात व्यक्ती आणि समाज या दोन्हीचा एकात्म पातळीवर सर्वंकष कल्याणाचा विचार आहे. यात व्यक्ती व्यक्ती मधील सतप्रवृत्तीचे उन्नयन आहे. भौतिक सुखासोबत संयम आणि त्यागातही उच्च पातळीवरील सुख असते. याची जाणीव हे दर्शन करुन देते. अधिकारांची आकांक्षा हवीच पण तो अधिकार कर्तृत्वाच्या कोंदणात बसविलेला असावा असा आग्रह दीनदयालजींनी धरलेला आहे. असे आधुनिक जगाला कल्याणाचा चिरस्थायी मार्ग दाखवून देणारे हे एक तत्वदर्शन आहे. एकात्म मानव दर्शन व त्यात अनुस्युत असलेला एकात्म अर्थायाम या दोन्हीमुळे पूर्वीचा गौरवशाली भारत पुन्हा समर्थपणे निर्माण होऊ शकेल, अशा विश्वासाची प्रसादचिन्हे त्यात दडलेली आहेत.

* * *

पर्यटन व्यवसायाला नवे रुप हवे !

पर्यटन ! एक आंनददायी भ्रमंती !
व्यक्तित्व विकासाचे एक महत्वपूर्ण साधन !
सांस्कृतिक आणि राष्ट्रीय एकात्मता साधणारे एक चिरंतन मूल्य !
प्रंचड उत्पन्न प्राप्ती मिळवून देणारा एक विशाल व्यवसाय !

नैसर्गिक सृष्टीसौंदर्य, कलात्मकता व आदरातिथ्य यांच्या समृध्दतेमुळे भारतात आज पर्यटन व्यवसाय प्रंचड उत्पन्न प्राप्तीचे साधन बनलेला आहे. सृष्टीची मोहक पखरण असलेले काश्मीर, मसुरी, सिमला, उटकमंड, दार्जिलिंग, महाबळेश्वर, चिखलदरा तर कलात्मकदृष्टया संपन्न असलेला ताजमहाल, कुतुबमिनार, अजिंठा, वेरुळ लेणी, खजुराहो, कोणार्क, मीनाक्षी मंदीर, श्रीविवेकानंद शिला स्मारक ही भारतातील प्रसिध्द आकर्षक पर्यटन केन्द्रे देशातील नागरिकांना व आंतरराष्ट्रीय स्तरावर निरनिराळया देशातील लोकांना पर्यटनासाठी प्रोत्साहित करतात, आंनद देतात व उत्पन्नही प्राप्त करुन देतात. विदेंशी पर्यटकांमुळे विदेशी चलनात सतत वाढ होत असते. १९७५ मध्ये विदेशी चलनापासून १०४.२ कोटी रुपये प्राप्ती होती. या वर्षी २८०० को. रु. चे विक्रमी उत्पन्न मिळाले. (१९८५ पेक्षा १४०० को. रु. ने उत्पन्नात वाढ झाली आहे हे लक्षणीय आहे.) विदेशी पर्यटकांची संख्या १९७५ मध्ये ४ लक्ष, १९९० मध्ये २१ लक्षापेक्षा जास्त होती व यावर्षी त्यात १० लक्षाने भर पडली आहे. १९६१ हे आधारवर्ष गृहीत धरल्यास आतापर्यंत प्रवासी संख्येत ५ पटीने व चलन प्राप्तीत २६.८ पटीने वाढ झाली आहे. प्रवासी वाढीचा अनुपात १:३:३ असा येतो. म्हणजेच

पर्यटन व्यवसाय गुणोत्तर पध्दतीने विकास करीत आहे असे दिसते.

आपला देश सांस्कृतिक व कलात्मक दृष्टया संपन्न असल्यामुळे विदेशी पर्यटनाप्रमाणेच देशांतर्गत पर्यटनास विशेष आकर्षण प्राप्त झाले आहे. देशांतर्गत पर्यटन ही केवळ चैनीची संकल्पना राहिली नसून रोजच्या गुंतागुंतीच्या वेगवान यांत्रिक युगात तणावामुळे ती काही प्रमाणात आवश्यक झाली आहे. शासनाकडून प्रवासखर्च सवलत प्राप्त होत असल्यामुळे पर्यटन जनमानसात प्रिय होत आहे. केवळ विमानाने प्रवास करणारे ६.८५ लक्ष प्रवासी आहेत. गेल्या ३० वर्षात विमान पर्यटकांमध्ये २४.८६ पटीने वाढ झाली आहे. रेल्वे प्रवाशांच्या संख्येची तर गणनाच नाही. प्रवासी संख्येचा विचार करता रेल्वे गाडया साधन दृष्टीने अपु-या पडू लागल्या. प्रवासी संख्येचा पर्यटन व्यवसायामुळे अनुकूल परिणाम होत गेला.

महाराष्ट्र आघाडीवर

गौरवशाली इतिहास, कलात्मकता, सृष्टीसौंदर्य व संस्कृती यांचा उज्जवल वारसा लाभलेला महाराष्ट्र पर्यटन व्यवसायात अग्रगण्य आहे. मुंबई, महाबळेश्वर, पांचगणी, पुणे, माथेरान, अजिंठा-वेरुळ, औरंगाबाद, रत्नागिरी, गणपतीपुळे, कोल्हापूर, चिखलदरा, रायगड, प्रतापगड, खंडाळा, लोणावळा, ताडोबा, राष्ट्रीय उद्यान, नागझिरा अभयारण्य, अष्टविनायक, शेगांव, शिर्डी, त्र्यंबकेश्वर, सेवाग्राम-पवनार इत्यादी पर्यटनस्थळांमुळे व प्रसिद्व धार्मिक स्थानांमुळे महाराष्ट्रात पर्यटकांच्या संख्येचा ओघ सतत वाढत असतो. मुंबई शहर हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरुपाचे मान्यताप्राप्त व विदेशी चलनापैकी साठ टक्के चलनप्राप्ती मिळवून देणारे पर्यटन केन्द्र आहे. प्रवाशांची वाढती संख्या, विदेशी पर्यटक, आकर्षक पर्यटन केन्द्रे, व्यवसायाच्या आवश्यक घटकांचा विस्तार, साधनांची उपलब्धता यामुळे पर्यटन व्यवसाय अधिक उत्पन्नदायी होत आहे.

रोजगार निर्मितीत योगदान

देशाच्या प्रमुख आर्थिक समस्यांमध्ये दारिद्रय, लोकसंख्यावाढ, बेकारी, उत्पन्न वितरणातील विषमता इत्यादींचा समावेश होतो. दारिद्रय व लोकसंख्यावाढ हे परस्पर पूरक घटक आहेत. लोकसंख्येच्या मानाने साधन संपत्तीचा उपयोग पर्याप्त प्रमाणात होऊ शकला नाही म्हणजे बेकारी निर्माण होते. पर्यटन उद्योगामुळे ५० ते ६० हजार कामगारांना व ५,००० सुशिक्षित व्यक्तींना रोजगार प्राप्त होतो. पर्यटकांना आवश्यक असणा-या वस्तू व सेवा यांचा पुरवठा छोटया उद्योगातून होत असतो. हॉटेल उद्योग, उपहारगृहे, बाजारपेठा, बँका, वाहतूक साधने, मार्गदर्शक प्रवासी संस्था, फोटोग्राफर हे पर्यटन व्यवसायाचे प्रमुख घटक आहेत् पर्यटन स्थळाची घोषणा झाल्याबरोबर व अधिकृत मान्यता प्राप्ती बरोबर वरील घटकांचे अस्तित्व तेथे जाणवायला लागते. पर्यटकांची संख्या वाढताच या घटकांचा विस्तार होतो व त्यात स्पर्धाही सुरु होते. वरील प्रत्येक घटक रोजगार-पुरवठयाच्या क्षमतेचा आहे.

पर्यटन हा विशिष्ट मोसमाचा व्यवसाय असल्यामुळे रोजगार पुरवठा मोसमापुरता

मर्यादित राहतो. पण त्या मोसमात होणारी प्राप्ती मोठया प्रमाणावर असते. या व्यवसायाला आयातीची आवश्यकता तसेच तांत्रिक ज्ञानाची गरज कमी असल्यामुळे याचे स्वरुप श्रमप्रधान आहे. मुख्य शहरांपासून पर्यटन केन्द्रापर्यंत वाहतूक सेवा, रस्तेबांधणी, हॉटेलांची उभारणी इत्यादीमध्ये इंजिनीयर, कंत्राटदार, कामगार यांना रोजगार संधी प्राप्त होते. नॅशनल कौंसिल ऑफ अप्लाईड एकॉनॉमिक्स रिसर्च या संस्थेच्या मते पर्यटनाद्वारे सरासरी वार्षिक ९३३.८ लक्ष लोकांना रोजगार पुरवठा होतो. या आंशिक योगदानानेही अर्थकारणाला गती लाभते.

पर्यटन व्यवसायापासून विदेशी चलनप्राप्ती होते तसेच देशांतर्गत पर्यटनामुळे उत्पन्न वाढत असते. सर्वच स्तरावरील लोकांना विशिष्ट प्रमाणात उत्पन्न प्राप्ती करुन देणारा हा व्यवसाय त्यामुळेच महत्वपूर्ण ठरतो. नॅशनल कौंसिलच्या मते ३८९ लक्ष लोकांपासून १९३६.६ लक्ष रु. चे वार्षिक उत्पन्न या व्यवसायापासून प्राप्त होते. पर्यटन करापासून शासनाला ३१०.८ लक्ष ते ४०० लक्ष रुपयापर्यंत वार्षिक सरासरी उत्पन्न प्राप्त होत असते. उत्पन्नाचे वाढते आकडे लक्षात घेता पर्यटनाचे स्थान अर्थकारणातील उत्पन्नाचे स्रोत म्हणून गणले जाते हे विशेष आहे.

प्रवाशांची व्यथा

पर्यटन व्यवसायाचे स्वरुप घटकांच्या व्यवस्थापनावर अवलंबून आहे. पर्यटन व्यवसायाने मोठया विनियोगास प्रोत्साहन दिले आहे. पंचतारांकित हॉटेलांच्या स्वरुपात निवास व्यवस्थेतील गुंतवणूक, भोजन व उपहारासाठी हॉटेलमधील गुंतवणूक व साधनसामुग्रीच्या उपलब्धतेसाठी गुंतवणूक अशा तीन स्वरुपात गुंतवणूक होत असते.

पर्यटन व्यवस्थापनात निवास, भोजन, मनोरंजन, मार्गदर्शक, वाहतूक सेवा या प्रमुख घटकांच्या व्यवस्थेचा विचार केला जातो. भारतातील प्रसिध्द पर्यटन केन्द्रांच्या ठिकाणी या सर्व व्यवस्था उपलब्ध आहेत. काश्मीर, मसुरी, सिमला, मुंबई, महाबळेश्वर, नैनिताल दार्जिलिंग, आग्रा, पांचगणी, मद्रास, कन्याकुमारी या ठिकाणी एक ते पाच तारांकित हॉटेल व लॉज उपलब्ध आहेत. मनोरंजन, मार्गदर्शक व वाहतूक सेवाही उपलब्ध आहेत. पंचतारांकित हॉटेल सुखसोयींनी सुसज्ज असतात पण त्यांचे दर तेवढेच महाग असतात एका खोलीचे एक दिवसाचे भाडे ८०० रु. ते १५०० रु. द्यावे लागते व ते श्रीमंत पर्यटकच देऊ शकतो. मध्यम व कमी दराच्या हॉटेलची संख्या फार कमी आहे. त्यात वाढ होणे आवश्यक आहे. देशांतर्गत पर्यटक हा सामान्य आर्थिक स्थितीतला असतो. पर्यटनाचा आनंद त्याला उपभोगता यावा यासाठी माफक दरातील निवास व्यवस्था उपलब्ध पाहिजे. पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेता निवास व्यवस्था अत्यंत अपुरी भासते. आ-याच्या ताजमहाल पाहण्यासाठी दररोज सरासरी ४,००० प्रवासी या स्थळाला भेट देत असतात पण आग्रा शहरातील सर्व हॉटेल, लॉज व धर्मशाळा या त्यांना सामावून घेण्यास अपु-या पडतात ही वस्तुस्थिती पर्यटन विभागाने मान्य केली आहे. अशा स्थितीत किमान व्यवस्थेचा लाभ न मिळाल्याने [redacted]ना अतिशय त्रास होतो. शासकीय निवासस्थानाची क्षमता तर फारच कमी आहे. अतिमहत्वाच्या व्यक्तीसाठी ते

पूर्वीच आरक्षित केले असतात. त्यामुळे सामान्य पर्यटकास हॉलिडेहोम, कॉटेज, टुरिस्ट हॉटेल इत्यादी शासकीय माफक दरातील निवा!सव्यवस्था कधीच उपलब्ध होत नाही. It is not enough to have adequate hotel accommodation, it is equally necessary to have hotels at various levels low priced, moderately priced, high priced and lastly a few real luxury hotels with interesting features The tourists will then be tempted to stay longer on the spot in the country. टुरिझम कमिटीचा वरील अहवाल बोलका आहे. निवासाप्रमाणेच अधिकृत मार्गदर्शकांच्या पुरेशा संख्येचा अभाव असल्यामुळे प्रवाशांना अन्य;प्रशिक्षित मार्गदर्शकांवर अवलंबून राहावे लागते. मनोरंजन व वाहतूक सोयींची पर्याप्तता मात्र ब-याच ठिकाणी आहे.

पर्यटन महामंडळाची पुनर्रचना आवश्यक

पर्यटन व्यवस्थांचा विस्तार करण्याकरिता व पर्यटन केन्द्रांचा विकास करण्याकरिता पर्यटन महामंडळाची निर्मिती झाली असून त्यांची कार्यालये पर्यटनस्थळी आहेत पण वस्तुस्थिती अशी आहे की, पर्यटन विभागीय कार्यालयांना पर्यटन व्यवस्थापनाची पुरेशी माहितीच नसते. प्रसिध्द पर्यटनस्थळी निवासाची व्यवस्था कशी आहे, किती असावी, अन्य घटकांचे अस्तित्व स्थिती-विस्तार या संदर्भात पर्यटन विभाग अतिशय अज्ञानी असतो. जुजबी माहितीच्या भांडवलावर विभागांचे कार्य सुरु असते. पर्यटकांची संख्या वाढत आहे. पर्यटन व्यवसायाचे उत्पन्न वाढत आहे. पण पर्यटनाच्या व्यवस्थानाकडे योजनाबध्द निरीक्षण आणि नियंत्रण ज्या पर्यटन महामंडळाकडून अपेक्षित असते त्याचा मात्र अभाव जाणवतो. पर्यटन केन्द्राचा विकास करण्याकरिता अधिका-यांमध्ये जी दृष्टी असायला पाहिजे तिचाही ब-याचवेळा अभाव दिसून येतो व कमालीचे औदासिन्य पर्यटन विभागांमध्ये जाणवते. फक्त नकाशे, छायाचित्रे व प्रकाशित पुस्तिका यांनी मात्र हा विभाग सज्ज असतो.

तज्ज्ञ हवेत

हॉटेलची व्यवस्था, निर्मिती व नियंत्रणाचे कार्य पर्यटन महामंडळाकडे नाही. वाहतूक व्यवस्थाही संचालनदृष्टया स्वतंत्र आहे. त्यामुळे या विविध मंत्रालयांशी पर्यटन महामंडळाने संपर्क साधून एक व्यवस्था निर्माण करायला हवी होती पण ती आज अस्तित्वात नाही. पर्यटन महामंडळाची पुनर्रचना करुन त्यात पर्यटन विषयाची ज्ञान असणा-या अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती शासनाने करावी म्हणजे त्यांना घटक व्यवस्थापन योग्य रीतीने करता येईल. तसेच पर्यटन महामंडळाचे कार्यक्षेत्र व अधिकार यांचा विस्तार व्हायला पाहिजे व व्यवस्थापन दृष्टीकोनातून त्यांनी पर्यटन केन्द्राच्या विकासाची योजना तयार करायला पाहिजे. त्याकरिता पर्यटन शास्त्रातील तज्ज्ञ व्यक्तींना निमंत्रित करुन त्यांचा सल्ला मागविला पाहिजे. पर्यटन महामंडळानी आपल्या विभागीय कार्यालयांना पर्यटन केन्द्रांच्या व्यवस्थापन संदर्भात निश्चित धोरण व कार्यक्रम आखून देऊन त्यावर नियंत्रण ठेवायला पाहिजे. विभागीय कार्यालयांनी

तेथील पर्यटन स्थळांच्या संदर्भात अस्तित्वात असलेल्या व्यवस्थांची सूची तयार करुन मुख्य कार्यालयास पाठवावी. पर्यटन स्थळांच्या व्यवस्थापन विकासासाठी पर्यटन विकास समितीची नियुक्ती झाल्यास अधिक लाभकारक ठरु शकेल.

विकास सूत्र

कोणत्याही पर्यटन केन्द्राचा विकास करण्याकरिता त्या स्थळाला उत्पन्नप्राप्ती अधिक होणे आवश्यक असते. जितके उत्पन्न अधिक होईल तेवढे व्यवस्थांचा प्रबंध मोठया प्रमाणावर करता येईल. हे कसे मोजावे हा संशोधनाचा प्रश्न होय. उत्पन्न प्राप्ती निश्चित करणारे विकास सूत्र मांडता येते. त्याद्वारे, "प्रती प्रवासी शुध्द प्राप्ती" निश्चित करता येते. पर्यटन विषयाच्या सूक्ष्म अध्ययनातून विशिष्ट पर्यटनस्थळी अपेक्षित गुंतवणूक केल्यास वार्षिक शुध्द प्राप्ती काढता येते.

हे सूत्र सर्व पर्यटन स्थळांना लागू होते. विदर्भातील ताडोबा राष्ट्रीय उद्यान या पर्यटनस्थळी सूत्राप्रमाणे १६,२५,००० रु. ची एकूण वार्षिक प्राप्ती होऊ शकते. अशा प्रकारे विकाससूत्र अंमलात आणले गेल्यास विशिष्ट पर्यटन स्थळाची प्राप्ती वाढून व्यवस्थांसाठी उत्तम प्रबंध होऊ शकेल.

वरील सर्व उपाययोजनांची अंमलबजावणी झाल्यास भारतातील पर्यटनस्थळे व्यवस्थापनदृष्टया उत्तम, आकर्षक पर्यटन केन्द्रे बनतील व प्रवाशाचा आनंद द्विगुणित करतील यात शंका नाही.

* * *

गंगाशुद्धी प्रकल्पाची दिशा

- **ल**क्षावधी भारतीयांचे श्रद्धास्थान असलेली पवित्र गंगा!

- दुःखिताचे दुःखहरण आणि पाप्याचे पापक्षालन करण्याची किमया असलेली गंगा!

- राव आणि रंक यांना सारखाच शीतल स्पर्श देऊन लोकजीवन समृध्द करणारी गंगा!

- कालाच्या अनंत प्रवाहातील प्रत्येक क्षणाची साक्षीदार,
परंपरेचे प्रतीक !
आणि लोकसेवेचे तप आचरीत मार्गक्रमण करणारी गंगा!

- जिच्या किना-यावर ऋचा गायल्या गेल्या,
गंगालहरीसारखे काव्य रचले गेले,
स्तोत्रे तयार झालीत ,
अध्ययन केले गेले,
पिढयांनपिढयांची तपश्चर्या ,तपस्या साकार होत गेली अशी ही गंगा !

- भारतीय जीवनमूल्यांचा गाभा समूर्त करणारी गंगा!

- गंगेची ही विविध रुपे मानवी मनाला नेहमीच मोहरुन टाकीत आली आहेत,
आकर्षित करीत आली आहेत.

ऋषिकेषला उदात्त ईश्वरी सौंदर्याचा साक्षात्कार होतो. गंगेचा युगानयुगाचा चिरंतन प्रवाह याची ग्वाही देत असतो. प्राचीन काळापासून अनेक पिढयांचे भावविश्व केवळ गंगादर्शन आणि गंगास्नान यातच रममाण झाले आहे. हरिद्वारला हजारो लोक स्नान करताना "अयि गंगे-विमलतरंगे", "हरगंगे", "गंगामैय्या", "गंगेS गंगेSS अशा आर्त हाका मारताना दिसतात. त्यावेळी सारा आसमंत एका गूढ वात्सल्याने भारलेला भासतो. हे जे सामर्थ्य गंगेमध्ये दिसून येते, जिने भारतीय अस्मितेला आपल्या कुशीत आश्रय देऊन सजग ठेवले ते गंगेचे विलोभनीय स्वरुप मनमुग्ध करणारे आहेच पण बुध्दिमुग्धही आहे. गंगेच्याच पाण्यावर हृषिकेष, हरिद्वार, प्रयाग, काशी, बेलूर अशी तीर्थक्षेत्रे निर्माण झाली व पुष्ट झाली. जान्हवी, देवभूती, भागीरथी, वारानदी, त्रिशोता, हरशेखरा आणि मंदाकिनी अशी गंगेची अन्य नावे आहेत. औषधं जान्वही तोयं-गंगाजल हे आरोग्यदायी आहे, असे समजले जाते. यामुळे देशातील ४० टक्के लोक आपल्या घरी शुध्द गंगाजल ठेवीत असतात.

प्रदूषित गंगा

अशी ही पवित्र गंगा गेल्या दशकामध्ये औद्योगीकरणाच्या लाटेने अतिशय दूषित झालेली आहे. गंगेचे ४,३५,००० चौ. मैल क्षेत्र दूषित असून त्यातून १,८०,०००० घ. फू. घाणपाणी वाहत असते. वास्तविक ४९३ बिलीयन क्यु. मी. पाणी वर्षातून गंगेमधून वाहात असून, ४६ लक्ष हेक्टर क्षेत्रफळ त्याने व्यापले आहे. देशाच्या क्षेत्रफळाच्या २६ टक्के क्षेत्र गंगेच्या पाण्याने व्यापले आहे. एक लक्ष लोकवस्तीची २९ शहरे गंगेच्या किना-यावर वसलेली आहेत.

उत्तरप्रदेशातील विस्तारलेल्या औद्योगीकरणाच्या सांडपाण्याची व्यवस्था गंगा नदीत केल्यामुळे व त्यासंबंधीच्या नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे गंगा प्रदूषित झाली. त्यामुळे लोकजीवनाला गंभीर धोका निर्माण झाला. कापड, कागद व रासायनिक कारखान्यात निर्माण होणा-या क्षेप्य (खराब), विषारी द्रव्य, आरोग्यास घातक ठरणारे अन्य द्रव्यघटक, शहरातील कचरा व घाणपाणी, प्रेते इत्यादी गंगेच्या प्रवाहात सोडण्याची व्यवस्था असल्यामुळे गंगेचे पाणी दूषित होत असते. तिच्या अन्य उपनद्यांचीही तीच स्थिती असल्यामुळे पाणी प्रचंड प्रमाणावर दूषित होत जाते. यातून धोक्याची स्थिती निर्माण झाली . प्रदूषित पाण्यामुळे मानवी जीवनावर गंभीर परिणाम होतात. मानसिक, शारीरिक दुर्बलता, अस्वस्थता, डोकेदुखी, चक्कर येणे, त्वचारोग इत्यादी रोगट स्थिती निर्माण होते. गंगेच्या या प्रदूषणाला औद्योगीकरणच प्रामुख्याने जबाबदार आहे. उद्योगांचा विस्तार आवश्यक असतो, पण सांडपाण्याची व क्षेप्याची व्यवस्था अन्यप्रकारे झाली असती तर ही स्थिती निर्माण झाली नसती.

हृषिकेषची शुध्द गंगा

प्रदूषणाची गंभीर स्थिती लक्षात घेऊन उत्तरप्रदेश प्रदूषण नियंत्रण बोर्डाने यासंबंधी

सर्वंकष अभ्यास केला. प्रदूषणाची स्थिती नियंत्रित करण्याच्या दृष्टीने वीस विविध ठिकाणच्या पाण्यांचे नमुने एकत्र करण्यात आले व त्याचे रासायनिक पृथःकरण करण्यात आले. अभ्यासगटाच्या निष्कर्षानुसार हृषिकेश येथील गंगेच्या पाण्यामध्ये अजिबात प्रदूषण नसून ते अतिशय स्वच्छ व शुद्ध आहे. त्याठिकाणी कारखाने नाहीत तसेच लक्ष्मणझुला ते स्वर्गाश्रमापर्यंत स्नान करणे, कपडे धुणे इत्यादीला बंदी आहे. निर्मळ वाहते पाणी असल्यामुळे ते प्रदूषणापासून मुक्त आहे. हरिद्वार ते हृषिकेश यामध्ये एक मोठा औषधी कारखाना आहे त्या कारखान्याच्या निकृष्ट क्षेप्याच्या प्रवाहामुळे तेथून पलिकडे प्रदूषणाची स्थिती निर्माण होते. हरिद्वार ते गरमुक्तेश्वर या भागात स्नानादी कार्यामुळे व अन्य सांडपाणी गंगेत सोडण्याची स्थिती असली तरी तेथे प्रदूषणाची स्थिती नाही. पाण्याचा ओघ प्रचंड असल्यामुळे आणि सांडपाण्याचे त्यादृष्टीने अल्पप्रमाण असल्यामुळे तेथील पाणी चांगले आहे. मीरत, बुलंदशहर, बदवन, मुरादाबाद, इटाह याठिकाणी औद्योगीकरणातील क्षेप्य व विषारी द्रव्यामुळे पाणी प्रदूषित आहे. काली ही लहान नदी तेथे गंगेला येऊन मिळते तिचे पाणी खूपच दूषित आहे. फरुक्काबाद येथे रंगीत साडी निर्मितीचा कारखाना आहे. तेथील पाणी काही प्रमाणात दूषित आहे. कनोज ते कानपूर या लांब पल्लयात कारखाने नसल्यामुळे आणि सामान्य कचरा व घाणपाणी याचा फारसा परिणाम पाण्याच्या प्रदूषणात होत नसल्यामुळे या पल्ल्यातील गंगेच्या पाण्याची गुणवत्ता चांगली आहे.

कानपूर भयंकर प्रदूषित

कानपूर शहराजवळ गंगेच्या पाण्याच्या गुणवत्तेत एकदम बदल जाणवतो. उत्तर प्रदेशातील जास्त लोकसंख्येचे आणि मोठया व लहान उद्योगांचे शहर म्हणजे कानपूर! कारखान्यांच्या विस्तारित संख्येमुळे त्यातून निर्माण होणा-या क्षेप्यातही मोठया प्रमाणावर वाढ आहे. ज्या गंगेचे पाणी पिण्याकरिता व स्नानाकरिता उपयोगात आणले जाते त्याच गंगेत क्षेप्यही मोठया प्रमाणावर सोडण्यात येते. अभ्यासगटाच्या निष्कर्षानुसार कानपूर येथील गंगेचे पाणी सर्वात जास्त प्रमाणात प्रदूषित आहे. बॉड (Biochemical Oxygen demand) चे प्रमाण काही ठिकाणी २.८६ मी.ग्रॅ.प्र.लिटर तर काही ठिकाणी ३०.३३ मि.ग्रॅ.प्र.लिटर आढळले. रासायनिक पृथःकरणाची स्थिती याप्रमाणे आहे. .००८ मि.ग्रॅ.प्र.लि.डी ऑक्सिजन - ३.८१ मि.ग्रॅ.प्र.लि. क्रोमियम -१०.९५ मि.ग्रॅ.प्र.लि.,(Ref.U.P.Pollution control Board Study) वाढती लोकसंख्या, शहरविकास व वाढते औद्योगीकरण यामुळे गंगेचे पाणी पिण्याच्या दृष्टीने योग्य राहणार नाही. असा इशारा त्यांनी दिला आहे. धरण व बांध योजनांमुळे नदीतील पाण्याचा प्रवाह कमी झाला व क्षेप्याचे प्रमाण वाढले. यामुळे येथील पाणी जास्त प्रदूषित झाले. अलाहाबाद व काशी या गंगेच्या किना-यावर दोन प्रसिध्द शहरांच्या तुलनेत काशीला हरिश्चंद्र घाटापासून पाणी अतिशय प्रदूषित असल्याचे आढळते, तर अलाहाबाद येथील पाणी पुष्कळ प्रमाणात स्वच्छ असल्याचे आढळले.

गंगाशुद्धी प्रकल्प

गंगेच्या प्रदूषणाचे धोके लक्षात घेऊन मध्यवर्ती शासनाने गंगा शुध्दीकरणाची योजना आखली असून, त्याकरिता २९२ को. रु. खर्च करण्याचे ठरले आहे. सातव्या योजनेच्या अंतर्गत यातील २४० कोटी. रु. खर्च होणार होते . त्यात उत्तरप्रदेश शासनाचा ११६ को. रु. चा हिस्सा आहे. शुध्दीकार्यातंर्गत एक लक्ष लोकवस्तीची शहरे निवडण्यात आली असून, त्यात हृषिकेश, हरिद्वार, फरुक्काबाद, फतेहगड, कानपूर, अलाहाबाद, मिरजापूर व वाराणसी यांचा समावेश आहे. प्रदूषण नियंत्रण व शुद्धीकरणासाठी उत्तरप्रदेश राज्य शासनाने एक उच्चस्तरीय समिती नेमली आहे. उत्तरप्रदेश जलनिगमाने या संदर्भात एक अहवाल शासनाकडे पाठविला आहे. शुध्दीकरणाचा अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे आहे - हृषिकेश -३ को. रु., हरिद्वार - ७.३२ को. रु., फरुक्काबाद व फतेहगढ -१४ को. रु., कानपूर-५२.९० को. रु., अलाहाबाद- २३.१० को. रु., मिर्जापूर- ४.१८ को. रु., वाराणसी-३९.३६ को. रु. सांडपाण्याचे पंपिग स्टेशन्स स्वच्छ करण्यात आले आहेत व सांडपाणी तसेच क्षेप्य वाहून नेण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. हृषिकेशवर ८० लक्ष रु. खर्च करुन स्वर्गाश्रमापलिकडील पाणी प्रदूषणापासून रोखले आहे.

हरिद्वार येथे कुंभमेळा भरत असतो. बारा वर्षांनी हा पुण्यकारक योग येत असल्यामुळे लक्षावधी लोक त्या एक महिन्याच्या काळात तेथे स्नान करतात. यावेळी ७० लक्ष लोकांनी गंगेत केले. हिंदूधर्मात हा महान पर्वकाळ समजला जातो. यादृष्टीने हरिद्वारचे पाणी शुद्ध करण्याचे कार्य पूर्ण होत आले असून, त्यासाठी ५० लक्ष रु. खर्च करण्यात आले. कुंभमेळयाचे वेळी या भागातील पाणी स्वच्छ व शुध्द राहील, अशी व्यवस्था करण्यात आली होती.

कानपूरसाठी एक स्वंतंत्र योजना आखण्यात आली असून, क्षेप्य वाहून नेण्याची दुसरी व्यवस्था निर्माण करण्याच्या प्रयत्नात राज्य सरकार आहे. १९९२ पर्यंत वाराणसी व अलाहाबाद येथील गंगेचे पाणी पूर्णतः शुद्ध होऊन प्रदूषण रोखले जाईल, अशी अपेक्षा आहे.

गंगाशुध्दी प्रकल्प लवकर अंमलात आणण्यात आला ही चांगली बाब आहे. कारण प्रदूषित पाण्याच्या प्रतिकूल परिणामामुळे निर्माण झालेल्या धोक्यांची तीव्रता वाढली होती. गंगेचे पाणी येत्या तीन वर्षात पूर्ववत् शुद्ध होऊन ते तसेच प्रवाहित होत राहील, ही सर्वांच्याच दृष्टीने आनंदाची बाब ठरते.

* * *

पेट्रोल साठी दाही दिशा .....!

पेट्रोल - डिझेल आणि पेट्रोल !
सर्व पेट्रोल पंपावर वाहनांच्या रांगाच रांगा !
पेट्रोल महाग झाले ! वाहतुकीचे दर वाढले !
परिणामी भाववाढ प्रचंड झाली !
जनतेत खळबळ तर व्यापारी क्षेत्रात तीव्र चिंता निर्माण झाली !

शासनाने पेट्रोलच्या किंमती वाढविल्या त्यामुळे जगामधील पेट्रोलचे सर्वात जास्त दर असलेला देश म्हणून भारताची गणना होत आहे. पेट्रोलच्या वाढीव किंमतीमुळे एकूण व्यापारपेठेलाच जबरदस्त धक्का बसला. क्रुड तेलाच्या किंमती ४० डॉलर्स प्रती बॅरल राहील त्यावेळी आपले आयात बील २४०० रु. कोटीचे असेल असे मत तज्ञांनी व्यक्त केले आहे. तेल पेट्रोल संबंधीच्या किमंतीविषयी शासनाजवळ निश्चित स्वरुपाचे धोरण वा व्यूहरचना नव्हती. तसे असते तर किंमती एवढया मोठया प्रमाणात वाढल्या नसत्या. यावर्षी देशांतर्गत तेल पेट्रोंलच्या मागणी आणि पुरवठयाचे संतुलन साधले गेले नाही कारण १८ लक्ष टन तेलाचा पुरवठा कमी झाला याची शासनाला फार उशिरा माहिती करुन देण्यात आली. देशांर्तगत अन्य समस्या सोडविण्याचा भयंकर ताणतणावात शासनाचे तेल - पेट्रोल स्थितीकडे पूर्ण दुर्लक्ष झाले. कुवैतच्या परिस्थितीनंतर शासनाचे लक्ष तेल - पेट्रोल कडे वळले. त्यावेळी पेट्रोल खरेदीचे धोरण मुळातच चुकीचे होते असे आढळले. पूर्वी प्रत्यक्ष स्थानीय खरेदी व भविष्यकालीन करार यामध्ये संतुलन राखण्यात येत असे, या वर्षीच्या प्रारंभीच हे संतुलन समाप्त झाले व परिस्थिती बिघडली.

मागणी प्रबंधन

क्रेंद तेल - पेट्रोलच्या व्यवहारात पूर्णपणे अपयशी ठरले. पर्याप्त पुरवठा उपलब्ध नसल्यामुळे पेट्रोलच्या उपभोगात १५% घट करावी लागली. एवढयाने प्रश्न सुटणार नसल्यामुळे " किंमती वाढविणार नाही " असे म्हणत म्हणत पेट्रोलच्या किंमती वाढविण्याचे धोरण राबविण्यात आले . पर्यायी इंधनाची व्यवस्था पुरेशा स्वरुपात नसल्यामुळे मागणी प्रबंधनाला विशेष महत्व प्राप्त झाले . मागणीपेक्षा पुरवठा खुपच कमी असल्यामुळे किंमतीत वाढ स्वीकारावी लागली. स्वातंत्र्योत्तर चाळीस वर्षात तेल पेट्रोल संबंधीच्या स्वावलंबी, दूरगामी स्वरुपाचे धोरण न आखण्याची जबर किंमत आता शासनाला मोजावी लागत आहे. प्रत्येक समस्येच्या संदर्भात राष्ट्रकारणाचा विचार करुन मूलभूत स्वरुपाचे दूरदर्शी धोरण आखण्याची नितांत आवश्यकता आहे. पण पक्षीय व वैयक्तिक स्वार्थ आणि राजकारण यामध्येच गुंतलेल्या राजकारण्यांना हे कसे सुचणार ?

फिस्कल रिसर्च फाउंडेशन, दिल्ली यांनी पेट्रोल संदर्भात सर्वेक्षण केले. त्यांच्या निष्कर्षानुसार तेल - पेट्रोल व पेट्रोलियम पदार्थांची मागणी लवचिक आहे . पेट्रोल पुरवठयावरील नियंत्रणामुळे किंमत वाढत जाते. मागणी जास्त व पुरवठा कमी यातून काळयाबाजाराचे प्रमाण वाढते. १९७३ - ७४ आणि १९७९ - ८० मध्ये पाश्चिमात्य देशांवर असेच तेलाचे संकट आले होते. त्यांनी त्यावेळी स्वतंत्र व्यूहरचना राबविली. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या पुरवठयावर प्रभावी नियंत्रण मिळविले. मुद्राविस्तारावर नियंत्रण, राजकोषीय तूटीमध्ये घट, उपभोगात घट, तेल आणि पेट्रोलच्या पर्यायी घटकांचा विस्तार, यामुळे त्यांनी पेट्रोलविषयक धोरण यशस्वी रीत्या राबविले.

पुरवठा प्रबंधन

स्वावलंबनाकडे वाटचाल करताना पुरवठा प्रबंधनाकडे विशेष लक्ष पुरवावे लागते. १९७३ मध्ये आयात ५० % ने वाढल्यामुळे शोधनाधिक्याचा प्रश्न तीव्र झाला होता. तेल - पेट्रोलचे भाव त्यावेळीही वाढले होते. वाढत्या निर्यातीमुळे प्रश्न सौम्य स्वरुपात आटोक्यात आला होता. १९७५ पासून बॉम्बे हाय मधून क्रूड ऑईलचे उत्पादन सुरु झाल्यामुळे किंमतीवर अनुकूल परिणाम दिसत होता. १९७९ मध्ये तेल - पेट्रोलची आयात वाढली व शोधनाधिक्याचा प्रतिकुलतेत भर पडली. १९८५ मध्ये ५ मी. टनावरुन क्रुड ऑईलचे उत्पादन ३०.२ मिलियन टन झाले. बॉम्बे हाय मधील उत्पादनामुळेच हे शक्य झाले. १९९० मध्ये हे उत्पादन ३५ मिलीयन टन आहे. देशांतर्गत ऑईलचे उत्पादन वाढले तरी पेट्रोल - तेलाची आयात कमी होणे शक्यच नव्हते. एकूण आयातीच्या ७० % तेल - पेट्रोलची आयात सध्या होत आहे. देशातील उत्पादन जितके जास्त वाढेल तितकी आयात कमी करता येईल. हिदुस्थान ऑईल एक्स्प्लोरेशन कंपनीच्या मते देशांतर्गत तेलाचा साठा भरपूर असल्यामुळे

उत्पादन वाढविणे शक्य आहे. पेट्रोलियम सचिवाच्या मते देशात उत्पादन वाढविणे अशक्य आहे. याबाबतीत तज्ञांच्या विचारात मतभेद आढळून येतात.

आठव्या योजनेत

आठव्या पंचवार्षिक योजनेतील पेट्रालियम वर्कींग ग्रुपच्या मते देशात पेट्रोल - तेलाचे उत्पादन ५१ मिलीयन टन होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. एकूण मागणीच्या ६५ % असे उत्पादन राहील. ऑईल अन्ड नॅचरल गॅस कमिशनने (ओ. एन. जी. सी.) यासाठी १५५३ कोटी रु. जास्त खर्च करण्याचे ठरविले आहे. आठव्या योजनाकाळात शासन २६.४२ कोटी रु. खर्च करणार आहे. खाजगी क्षेत्राला उत्पादनासाठी निमंत्रित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. किर्लोस्कर ग्रुपच्या प्रमुख सल्लागारांनी या संदर्भात व्यक्त केलेले मत विचारात घेण्यासारखे आहे.

Exploring a Block would require Rs. 35 to 40 crores. I am not sure that Private Sector Companies will be able to take the risk. Afterall, if nothing is found all this money will be lost.

या सूचक उद्गारावरुन खाजगी क्षेत्राचा सहभाग किती मिळेल हे सांगणे कठिण आहे.

पर्यायांचा शोध

तेल - पेट्रोलला पर्याय शोधण्याचे प्रयत्न नियोजनकारांनी सुरु केले आहेत. त्यातील एक पर्याय अल्कोहोलचा असून दुसरा नैसर्गिक वायूचा (Natural Gas) आहे. पाश्चिमात्य प्रगत राष्ट्रांमध्ये यासंबंधी संशोधन सुरु आहे. इथॅनॉल आणि मेथानॉल यांचा उपयोग किती व कशाप्रकारे होऊ शकतो. याची चाचणी सुरु आहे. भारतात दिल्ली ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (डी. टी. सी.) यांनी या संदर्भात एक चाचणी प्रयोग करुन पाहिला. डिझेंल इंधनात ३० प्रतिशत मेथॉनॉलचे मिश्रण करुन दहा बसेस चालवून पाहिल्या. केन्द्र शासनाने मेथॉनॉल मुफ्त स्वरुपात डी. टी. सी. ला उपलब्ध करून दिले. त्यांच्या अहवालानुसार हा प्रयोग यशस्वी झाला. यामुळे डिझेलची बचत होते पण मेथॉनॉलच्या प्रयोगाची किंमत मात्र जास्त पडते.

नैसर्गिक वायु आणि कोळसा यातून मेथॉनॉलचे उत्पादन करण्यात येते. या संदर्भात ओ. एन. जी. सी. ने एक नवी योजना तयार केली असून त्यात, " नैसर्गिक वायु - कोळसा - अल्कोहोल " असे मिश्रइंधन पेट्रोल आणि डिझेल साठी चांगला पर्याय ठरलेला आहे असे प्रतिपादन केले आहे. एक कि.मी. साठी पेट्रोलकरिता ८८ पैसे, डिझेलसाठी ३७ पैसे लागतात तर या मिश्र इंधनासाठी फक्त १८ पैसे लागतात. प्रति धनमीटरला मिश्र इंधन रु २.०९ एवढा खर्च येतो.

पर्यायी इंधनाचा खर्च

नैसर्गिक वायू	१.०० रु.
वाहतूक खर्च	०.२१
अन्य खर्च	०.५३
डीलरचे कमीशन	०.३५
एकूण खर्च	**२.०९**

हे मिश्र इंधन स्कुटर्स, मोटार सायकल, लुना मोपेड इत्यादींना चांगले उपयुक्त होऊ शकेल असे त्यांनी प्रतिपादीत केले आहे. मिरत, आग्रा, कानपूर, बरेली, ग्वाल्हेर, झाशी, दिल्ली, भोपाळ या शहरांमध्ये हा प्रयोग लवकरच होऊ धातला आहे. येत्या २ वर्षात सुमारे ४२५००० वाहने याचा उपयोग करु शकतील यामुळे १०५० लक्ष लिटर डिझेलची व २९० लक्ष लिटर पेट्रोलची बचत होऊ शकेल म्हणजेच ४८४ कोटी रु.चा खर्च कमी होईल. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास १७२ को.रु.ची गुंतवणूक नव्या पर्यायी मिश्र इंधनासाठी करावी लागेल.

न्युझीलंड, कॅनडा, अर्जेंटिना, अमेरिका, इटाली या राष्ट्रामध्ये या पर्यायी इंधनाचा प्रयोग यशस्वी झाला आहे. इटालीमध्ये ३ लक्ष वाहने तर न्युझीलंडमध्ये दीड लक्ष वाहने नव्या इंधनावर उत्तम रीत्या धावत असल्याचे सिध्द झाले आहे. ब्राझीलमध्ये हा प्रयोग यशस्वी झाला आहे. तेथील तंत्रज्ञानी मेथॉनाल द्रव्याचे उत्पादन मोठया प्रमाणावर केले. १२ बिलीयन लिटर इथॉनॉलमुळे २ लक्ष बॅरेल ऑईल वाचविण्यात आले. हा प्रयोग पाच लक्ष अटोमोबाइल्सनी राबविला व यशस्वी केला.

भारताला आज या पर्यायी इंधन स्रोताची नितांत गरज आहे. पेट्रोलच्या वाढत्या किंमतीला तोंड देण्याचे सामर्थ्य नागरिकांमध्ये फार दिवस राहणार नाही. वाढत्या महागाईमुळे जनता, व्यापारी,उद्योगपती सर्वच त्रस्त राहणार, अशा स्थितीत ओएनजीसीचा प्रस्ताव शासनाने मंजूर करुन प्रायोगिक स्तरावर त्वरित अंमलात आणावा कारण त्यात भविष्यकाळातील स्वावलंबनाची तत्वे दडलेली दिसत आहे. शासनाला अशी सदबुध्दी सुचेल काय ?

* * *

भारतीय पुस्तकांना विदेशात प्रचंड मागणी

भारतीय पुस्तकांना विदेशात प्रचंड प्रमाणावर मागणी असल्याचे,एक्सपोर्ट कौंसिलच्या प्रसिद्ध झालेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. यामुळे प्रकाशन व्यवसायाला अधिक आर्थिक गती येईल व अन्य व्यवसायाप्रमाणेच त्याचेही निर्यातीतील योगदान वाढेल असा तज्ज्ञांचा कयास आहे. आपल्या देशात अभिजात प्रतिभावंत आहेत. त्यांच्या विविध प्रकारच्या साहित्याची पाश्चात्यांनाही गरज आहे व आपले लेखक ती पूर्ण करु शकतात,ही शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अभिमानाची बाब ठरते. सामान्यपणे विदेशातील पुस्तकांची आवक आपल्याकडे जास्त असते. विविध विषयांवरील आधुनिक स्वरुपातील पुस्तके विदेशात प्रचंड प्रमाणावर प्रकाशित होत असतात. अमेरिका,इंग्लंड,फ्रांस प्रमाणेच जपान,जर्मनी व रशिया याही देशात प्रकाशनाचा वेग मोठया प्रमाणावर वाढला आहे. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अमेरिका व इंग्लंड यांचे प्रकाशन व विक्री या संदर्भात अजूनही वर्चस्व कायम आहे.

परकीय चलनाचा मार्ग

भारतातील तत्वज्ञान, हिंदू धर्म, कला, संस्कृती, इतिहास, शिल्पकला, पर्यटन या विषयावरील पुस्तकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रचंड मागणी प्राप्त झाली आहे. तसेच विज्ञान, वाणिज्य, तंत्रज्ञान, इंजिनियरिंग, वैद्यकीयशास्त्र, व्यवसाय प्रबंधन, राज्यशास्त्र, हिन्दी-मराठी व बंगाली साहित्य (कथा, कादंब-या, लेख व त्यांचे अनुवाद) इत्यादी विषयांवरील पुस्तकांनाही अमेरिका, इंग्लंड प्रमाणेच आशिया आणि आफ्रिका या देशातही चांगली मागणी आहे. अशा मागणीप्रमाणेच भारतातून पुस्तकांची निर्यात झाल्यास १०० कोटी रु. ची निर्यात होऊ शकेल. याचा भारताच्या विदेशी व्यापारावर अनुकूल परिणाम होऊन शोधनाधिक्य कमी होईल व निर्यातीचे क्षेत्र विस्ताराकडे वाटचाल करु लागेल.

१९८३-८४ मध्ये पुस्तकांची निर्यात २० कोटी रुपयांनी, तर १९८५-८६ मध्ये २४ कोटी रुपयांनी वाढली अर्थात एकूण मागणीइतकी निर्यात आपण करु शकलो नाही, याचा अर्थ भारताच्या प्रकाशन उद्योगाची प्रकाशनक्षमता कमी आहे असे नाही. वाढत्या मागणीमुळे भारताचा जगातील सर्वात जास्त पुस्तके प्रकाशित करणा-या पहिल्या दहा देशांमध्ये पूर्वी सहावा क्रमांक होता आता चौथा क्रमांक लागतो. खालील सारणीवरुन ते दिसून येते.

जागतिक बाजारपेठेतील वार्षिक प्रकाशित पुस्तके

देश	१९७६	१९८५
अमेरिका	८४५४२	१२५५४३
इंग्लंड	३४३४०	४०५२१
फ्रांस	२९३७१	३५२७२
भारत	१६१९२	२१९५७

(संदर्भ बी. सी. बी. डब्लु १२-२५-८५)

अमेरिका व इंग्लंड येथील प्रकाशकांनी अत्याधुनिक छपाई व आधुनिक माहिती या दोन घटकांकडे लक्ष पुरवून पुस्तके प्रकाशित केली. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील अद्ययावत स्वरुपाची दर्जेदार पुस्तके निर्माण करुन त्यांनी प्रकाशन व्यवसायात क्रांतीपर्व आणले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील त्यांच्या वर्चस्वाला धक्का लावणे तेवढे सोपे काम राहिले नाही. प्रत्येक क्षेत्रातील नामवंत तज्ञांशी संपर्क साधून, त्याला योग्य अधिकारशुल्क देऊन पुस्तकांची मालिका प्रकाशित करण्यात ते यशस्वी झाले. अर्थात यामागे शंभर वर्षाची परंपरा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. प्रकाशन व्यवसायाची लाभकारकता अन्य व्यवसायांप्रमाणेच मोठी असते हे त्यांनी सिध्द करुन दाखविले आहे.

देशांतर्गत स्थिती

भारतात मोठया स्वरुपाचे तसेच मध्यम स्वरुपाच्या प्रकाशकांचे जाळे आहे. पुस्तक प्रकाशनासोबत दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, पाक्षिके व मासिके यांची संख्या सतत वाढत असून त्यांची संख्या १९८१ मध्ये १९१४४ होती.

भारतातील भाषावार वार्षिक प्रकाशित पुस्तके

इंग्रजी	७६५५
हिन्दी	२२२५
मराठी	१३६१
बंगाली	१०४६
तामिळ	११३५
गुजराथी	७५७
कन्नड	५००
ओरिया	४५०
तेलगु	३८९
पंजाबी	२७३
उर्दू	२८६
आसामी	१९६
संस्कृत	४३
आसामी	१९६

वरील सारणीवरुन इंग्रजी भाषेतील पुस्तकांची संख्या सर्वात जास्त ४४ टक्के असल्याचे दिसून येते. मुंबई व पश्चिम महाराष्ट्र, दिल्ली अलाहाबाद व कलकत्ता ही पुस्तक प्रकाशनाची प्रमुख स्थाने आहेत.

मोठया प्रकाशन व्यवसायाला दरवर्षाला सरासरी विक्री ५.९६ लक्ष रु. असून लहान व्यवसायाला १.५८ लक्ष रु. आहे. बहुतांश प्रकाशक समविच्छेद बिंदु पातळीवर [लाभ नाही व हानीही नाही] असून लाभ मर्यादा २५००० रु ते १.०८ लक्ष रु. पर्यंत मोठया उद्योगांसाठी आढळून येते. त्यामुळे भारतात छापलेल्या पानांची सरासरी संख्या [प्रतिवर्ष प्रती व्यक्ती] ३२ आहे, तर अमेरिकेत ती २००० आहे. यावरुन भारतीय प्रकाशक न्यून भांडवलीकरणाच्या समस्येत गुंतला असल्याचे स्पष्ट होते. तसेच त्यात उच्चस्तरीय व्यवस्थापनकौशल्याचा अभाव जाणवतो. पुस्तकांच्या वाचकांची संख्या जास्त असली, तरी विकत घेऊन पुस्तक संग्रह करणारे संख्येच्या दृष्टीने फारच किरकोळ आहेत त्यामुळे देशांतर्गत पुस्तकांची समाधानकारक विक्री करणे प्रकाशकाला जमत नाही. त्या दृष्टीने उत्साहपूर्ण वातावरण तयार करण्यात ते यशस्वी झाले नाही. विविध विषयांच्या पाठयपुस्तकांची विक्री काही प्रमाणात समाधानकारक असली, तरी साहित्य, कला, तत्वज्ञान, इतिहास, राज्यशास्त्र इत्यादी

विषयावरील पुस्तके मौलिक स्वरुपाची असूनही योग्य प्रमाणात विक्रीत होत नाही अशीच स्थिती आहे. कागदाचे वाढते भाव, छपाई मूल्य व बांधणी इत्यादींमुळे पुस्तकांच्या किंमतीत वाढ झाली असते व वाचकाला त्या किंमतीत पुस्तके खरेदी करणे आर्थिक दृष्टया परवडत नाही. देशांतर्गत व्यवसायाची ही स्थिती असल्यामुळे विदेशातील मागणी पूर्ण करणे व्यवसायाला कठीण जाते.

व्यवसायाच्या समस्या

प्रकाशन व्यवसायाच्या समस्या खालीलप्रमाणे आहेत- [अ] अल्प भांडवलीकरणाची समस्या, [ब] कागद पुरवठा पर्याप्त प्रमाणात व पाहिजे त्यावेळी होत नाही. [क] अन्य उद्योगांप्रमाणे पुस्तकांच्या साठयांचे तारणावर बँकांकडून कर्ज प्राप्त होत नाही, [ड] आयातीवरील जबर कर, [इ] शासनाचा शैक्षणिक एकाधिकार, [फ] निर्यात करण्यात आलेल्या पुस्तकांचे अग्रिम शोधन करण्यात येत नाही. सामान्यतः ६ ते १० महिन्याच्या कालावधीनंतर शोधन होते. आंतर राष्ट्रीय बाजारपेठेतील उपलब्ध संधीचा लाभ मिळत नाही.

महामंडाळांची स्थापना

वरील समस्यामुळे भारतीय प्रकाशक निर्यात व्यापारातील मागणी पूर्ण करु शकत नाही. दहा वर्षापूर्वी आपल्या पुस्तकांना मुळातच मागणी कमी होती. विदेशात राहणा-या भारतीयांकडून ती सतत वाढतच आहे, अशा परिस्थितीत स्वतंत्र निर्यात प्रोत्साहक महामंडळ व नॅशनल बुक फायनान्स कॉर्पोरेशनची स्थापना करण्याची गरज निर्माण झाली आहे. यामुळे विदेशातील मागणीसाठी तसेच देशांतर्गत व्यवसाय वृद्धीसाठी प्रकाशन व्यवसायाला अर्थसाहय मिळू शकेल तसेच महामंडळांमार्फत विदेशातील विविध उपलब्ध संधीचा लाभ घेता येईल.

मध्य आशिया व आफ्रिकांमध्ये निर्यातीसाठी असलेली भरपूर मागणी लक्षात घेऊन शासनाने प्रकाशन व्यवसायाला विविध सवलती उपलब्ध करुन दिल्या पाहिजे. तसेच विविध प्रादेशिक भाषांतील पुस्तकांनाही इंग्लंड व अमेरिकेमध्ये असलेली चांगली मागणी लक्षात घेता, अभिजात विचारासोबत कागद व छपाईची गुणवत्ता विशिष्ट उंचीची राहील, याकडे प्रकाशकांनी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. पाश्चात्यांच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी हे आवश्यक आहे.

छपाईच्या गुणवत्तेसाठी उत्तम यंत्रांच्या आयातीवर भर द्यावा लागतो. आयातीवरील कस्टम डयुटीमुळे यंत्रांच्या किंमती वाढल्या आहेत. सर्वच प्रकाशकांना आर्थिक दृष्टया ती यंत्रे खरेदी करणे शक्य नाही. याकरिता छपाई यंत्रांवर कस्टम डयुटी लावण्यात येऊ नये, निर्यातीसाठी शासनाने स्वस्त व सवलतीच्या दरात चांगल्या प्रतीचा कागद उपलब्ध करुन द्यावा व अन्य खर्चासाठी आर्थिक सवलती उपलब्ध करुन द्याव्यात, अशा शिफारसी आहेत. या शिफारसी अंमलात आणल्या तरच भारतीय प्रकाशक विदेशातील भारतीय पुस्तकांची मागणी पूर्ण करण्याचे धाडस करु शकतील.

* * *

"कथा चवदार कॉफीची!"

दक्षिण भारताची व उत्तर प्रदेशातील सृष्टीसौंदर्यस्थानांवरील सकाळ कॉफीच्या चवदार घोटाने उगवते. चहाप्रमाणेच कॉफी हे सर्वाधिक लोकप्रिय पेय आहे. दुधाळ, फेसाळ नेस्कॅफे एक विलक्षण तरतरी व टवटवीतपणा माणसाला प्रदान करीतअसते. सामान्य माणसाला तसेच समाजातील "इलाईट" वर्गाला तितकीच सुखावह वाटणारी कॉफी आपल्या देशात तयार होते.

कॉफी-एक प्रतिष्ठित पेय!

भारत हा कॉफी उत्पादक व निर्यातक देश आहे. प्रचंड उत्पादन-प्रचंड विक्री व विक्रमी निर्यात हे समीकरण कॉफीला सहजगत्या लागू ठरले आहे. पाश्चिमात्य देशात कॉफी हे अत्यंत आवडते व तितकेच प्रतिष्ठित पेय मानले गेले आहे. पेयांचे प्रकार अनेक आहेत पण प्रतिष्ठितपणा मात्र कॉफीच्या वाटयास आला. इंग्लंड, रशिया, फ्रांस, जर्मनी, पोलंड, अमेरिका हे कॉफीची निर्यात मोठया प्रमाणावर स्वीकारणारे देश आहेत.

निर्माण प्रक्रिया

दक्षिण भारतात कॉफीची म्हणजेच चिकोरीची झाडे आहेत. अग्निजन्य खडकांची झीज होऊन निर्माण झालेली सुपीक, तसेच पाण्याचा निचरा होणारी व डोंगराच्या उतारावरील जमीन कॉफीच्या झाडांसाठी लागत असते. या झाडांना वर्षभर सरासरी तपमान १८ अंश ते २४ अंश सें. लागते. सामान्यतः वर्षातून १५० ते २०० मिलिमीटर पाऊस आवश्यक असतो. कॉफी झाडांच्या बिया तोडण्यात येतात व त्या पुढील प्रक्रियेसाठी कारखान्यात पाठविल्या

जातात. कॉफीची झाडे लावणे व बियांचे उत्पादन घेणे ही पहिली प्रक्रिया, बियांची पावडर तयार करणे व कच्च्या कॉफीचे रुपांतर पक्क्या स्वरुपात करुन ते आकर्षक स्वरुपात संवेष्टित करणे ही दुसरी प्रक्रिया व कॉफी डब्यांची विक्री ही तिसरी. अशा एकूण तीन प्रमुख प्रक्रिया कॉफी उद्योगात महत्वपूर्ण मानल्या आहेत.

कॉफी निर्मिती व विक्री करणा-या पाच मोठया कंपन्या लक्षावधी रु. च्या उलाढालीचा व्यापार करीत आहेत.

प्रमुख प्रमंडळे

प्रमंडळाचे नाव	उत्पादन टनामध्ये
१) फुड स्पेशालिटीज लिमिटेड (FCI)	८,५००
२) ब्रुक बाँड कंपनी	३,२५०
३) इंडोडान	३,०००
४) कोठारी जनरल फुड्स (KGF)	३,०००
५) एशियन कॉफी	१,५००

वरील पाचही प्रमुख कंपन्या आकर्षक जाहिरातीद्वारे आपल्या कॉफी प्रकाराची प्रचंड प्रमाणावर विक्री करीत आहेत. फुड स्पेशालिटिज लिमिटेडचया "नेस्कॅफेची" विक्री सर्वात जास्त आहे. मोहक स्वादामुळे दक्षिणेत नेस्कॅफे सर्वांचे आवडते पेय आहे. त्यानंतर ब्रूक बाँड कंपनीची "रिचकॅफे" उत्तर, मध्य व पूर्व भारतात लोकप्रिय आहे. इंडोडानची " गोल्ड कॅफे" व केजीएफचे "इंस्टंट कॅफे" हे प्रकार आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रभावशाली मागणीचे आहेत. नेस्कॅफेलाही आता इंग्लंडमध्ये भरपूर मागणी आहे. भारतात चहा जसा सामान्यांपासून प्रतिष्ठितांपर्यंत सर्वांना आवडतो, तसेच कॉफी पेय पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये सर्वांना आवडते. पश्चिम जगाला मोहविणारे व भारताला आर्थिक दृष्टया सुखविणारे असे हे पेय आहे.

उपभोगाचे प्रमाण

वर्ष	लक्ष किलो	प्र.ग्रॅ. उपयोग
१९६०-६१	०३.६०	८०
१९६२-६३	३३.००	७२
१९६३-६४	३८.००	७८
१९६६-६७	४३.००	८५
१९६८-६९	३९.००	७५
१९७०-७१	३२.००	६४
१९७२-७३	२८.००	६९
१९८०-८१	४८.००	७४
१९८१-८२	५१.००	७६
१९८२.८३	५४.००	७८
१९८३-८४	५८.००	७३
१९८४-८५	५५.००	७५
१९८६-८७	५९.००	७८
१९८७-८८	६५.००	८०

(स्रोत - बीआयसीडब्ल्यू मार्च १९८९)

भारतात दक्षिणेकडील केरळ, कर्नाटक, तामीळनाडू, आंध्र या प्रदेशामध्ये प्रतिउपभोक्ता दर जास्त आहे तसेच उत्तरभारतातील मसुरी, नैनिताल, सिमला, काश्मीर, चंदीगढ, दिब्रुगड इ. पहाडी निसर्ग सौंदर्यस्थानी कॉफीची मागणी सर्वाधिक आहे. अन्य उर्वरित प्रदेशांमध्ये कॉफी मागणीचे प्रमाण ३०% आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजराथ, राजस्थान, ओरिसा, प. बंगाल या प्रदेशात कॉफीची मागणी दुस-या क्रमांकावर आहे. येथे अजूनही कॉफी "इलाईट आयटेम" समजला जातो.

निर्यात स्थिती

१९८८-८९ या वर्षात कॉफीचे उत्पादन २ लक्ष टन आहे. कच्च्या स्वरुपातील कॉफीचा ७३ हजार टन अतिरिक्त साठा उपलब्ध आहे. कॉफीचा संपूर्ण देशातील उपभोग ६० हजार टन आहे. १९८८ मधील कॉफी निर्यात ५२ हजार टन आहे. याशिवाय १० हजार टन कॉफी अफ्रिकन राष्ट्रे व ४० हजार टन कॉफी रशियाला निर्यात करण्याचा करार झाला आहे. उत्पादन

वाढीबरोबरच निर्यातीत वाढ झाल्याचे दिसून येते. कॉफीची मागणी देशांतर्गत आहेच पण देशाबाहेर ती अधिक असल्याचे वरील आकडेवारी दर्शविते.

बाजारपेठेतील तीव्र स्पर्धा

व्यापार व्यवसायात प्रत्येक बाजारपेठेत स्पर्धा असणे स्वाभाविक असते. कॉफी हे प्रतिष्ठित पेय असल्यामुळे कॉफीनिर्मिती व विक्री करणा-या कंपन्यांकडे अलीकडील पाच वर्षात स्पर्धा अतिशय तीव्र झाली आहे. "नेस्कॅफे", "गोल्ड कॅफे", "इंस्टंट कॅफे", हे कॉफी प्रकार आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रभावक्षेत्राखाली आहे. इंडोडान, ब्रुक बाँड, कोठारी जनरल व एशियन कॅफे या कंपन्यांमध्ये तीव्र स्पर्धा सुरु आहे. त्यात प्रोक्टर अँड गॅम्बल, "गॉडफ्रे", फिलिप्स या कंपन्या नव्याने स्पर्धेत शिरण्याचा प्रयत्न करीत आहेत. फुड अँड स्पेशालिटिज लि. चा मात्र बाजारपेठेत वरचष्मा दिसून येतो.

कॉफी नियंत्रक बोर्ड

कॉफी बाजारपेठेवर कॉफी कंट्रोल बोर्ड लक्ष ठेवून आहे. कॉफी उत्पादकांना या बोर्डाच्या परवानगीनेच सर्व व्यवहार करावे लागतात. कॉफी उत्पादक असोसिएशनने उत्पादन, विक्री व निर्यातीवरील बंधने बोर्डाने उठवावी अशी मागणी केली आहे. या बोर्डाने कॉफीची मागणी अधिक प्रभावी करण्यासाठी एक स्वतंत्र योजना आखली असून ती स्वीकृतीसाठी वाणिज्य मंत्रालयाकडे पाठविली आहे. बेरोजगारांना रोजगार पुरवठा करणा-या या योजनेत कॉफीची गुणवत्ता अधिक वाढवून, कमी मागणीच्या क्षेत्रात, कॉफी पेयाला, निर्यातक देश, आकृष्ट करतील अशी व्यवस्था आहे. देशातंर्गत कॉफी पेय अधिक उपभोगाचे ठरेल याचाही विचार योजनेत कॉफी बोर्डाने केला आहे.

शासनाने कॉफी संवेष्टनावरील कराचा व लेव्हीचा फेरविचार करायला पाहिजे, कारण कॉफीचे उत्पादन वाढत आहे, निर्यात वाढत आहे पण देशांतर्गत मागणी मात्र त्या प्रमाणात वाढताना दिसून येत नाही. कॉफीचा स्वाद चांगला असला तरी, सामान्य माणसाच्या पाकिटाला तो परवडण्यासारखा असला पाहिजे. आज तरी कॉफी पॅक ग्राहकांच्या दृष्टीने महाग आहेत. जास्त उत्पादन तसेच बाजारपेठेतील तीव्र स्पर्धा लक्षात घेता कॉफी पॅक स्वस्त किमतीत उपलब्ध होतील याकडे कॉफी बोर्डाने विशेष लक्ष दिले पाहिजे. तसे झाल्यास प्रतिष्ठित व चवदार असणा-या कॉफी पेयाचा स्वाद सर्वसामान्य जनता सहजपणे घेईल. हा सुखद आस्वाद घेण्याची संधी कॉफी बोर्ड जनतेला देईल काय?

* * *

गरिबी दूर होत आहे ?

शेतक-यांचा कर्जमुक्तीचा प्रश्न सध्या अतिशय तीव्र बनला आहे. देशातील गरिबीत जीवन व्यतीत करण्या-यांमध्ये शेतकरी, शेतमजूर बहुसंख्येने आहेत. गरिबी दूर होत आहे काय ? हाच खरा प्रश्न आहे. दूरदर्शन व वैज्ञानिकीकरणाच्या प्रकाशात सामान्यांना याची कल्पना येत नाही, ग्रामीण क्षेत्र मात्र गरिबीने ग्रस्त आहे.

देशासमोरील महत्वाच्या आर्थिक समस्यांमध्ये गरीबीचा समावेश होतो. नियोजनपर्वामुळे आपल्या देशाचा आर्थिक विकास घडून आला. शहरीकरणाचा वेग वाढला. या विकासाचा बहुतेक लाभ आधीच पूर्वश्रीमंत असलेल्या व उत्पादनाच्या साधनांवर ताबा असलेल्या भांडवलदारांना मिळाल्यामुळे समाजामधील आर्थिक विषमतेची दरी वाढत गेली. आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करणे व विषमता कमी करणे ही पंचवार्षिक योजनांची उद्दिष्टये प्रत्यक्षात सिध्दीस न गेल्यामुळे आर्थिक विषमता कमी होण्याऐवजी वाढत गेली. या प्रक्रियेमुळे श्रीमंत अधिक श्रींमत तर गरीब अधिक गरीब झाले. नियोजन मंडळाच्या तज्ञ समितीच्या मते, दरडोई दरमहा उपभोग्य वस्तूंच्या खपाचे प्रमाण कमीतकमी ६५ रु. (१९८०-८१ वर्ष आधार मानून) असायला हवे. यापेक्षा कमी जीवनमान असणा-या व्यक्ती दारिद्रयाच्या सीमारेषेखाली जीवन जगतात, असे मानण्यात येते. निकषानुसार दारिद्रय सीमारेषेखाली जीवन जगणारे लोक एकूण लोकसंख्येच्या ४६.१२ टक्के आहेत. ४६० लक्षावरुन ही संख्या २७३ लक्ष वर आली आहे. (स्त्रोत - स्टॅटिस्टिकल आऊट लाईन ऑफ इंडिया, टाटा सर्व्हिसेस लि.) यावरुन गरीबीत जीवन जगणा-यांची संख्या कमी होत असल्याचे दिसून येते, पण गती अतिशय मंद आहे. समस्येची तीव्रता तशीच कायम आहे.

लोकसंख्या वाढ

गरीबीची समस्या बिकट होण्याचे एक कारण म्हणजे सतत वाढत जाणारी बेकारी होय. १९५१ मध्ये ३.३ दशलक्ष लोक, १९७४ मध्ये १८.७ दशलक्ष लोक, १९८३ मध्ये २१.१० दशलक्ष लोक बेकार होते. १९८८ मध्ये ३०.८६ दशलक्ष लोक बेकार आहेत. म्हणजेच प्रचंड कार्यशक्ती कामापासून वंचित आहे. बेकारीमध्ये सुशिक्षित व अशिक्षित हे दोन्ही प्रकार समाविष्ट आहेत. रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात येऊनही दरवर्षी बेकारीमध्ये वाढ होत जाते. आर्थिक विकासाच्या वाढीच्या वेगापेक्षा बेकारी वाढीचा वेग अतिशय जास्त असल्यामुळे हे प्रमाण वाढत जाते. बेकारीची समस्या सातत्याने वाढणा-या लोकसंख्येशी निगडित आहे. प्रत्येक तीन सेकंदाला दोन मुले, दरदिवशी तेहतीस हजारांची भर लोकसंख्येत पडत असते. त्यामुळे दरवर्षी देशाची लोकसंख्या १ कोटी २० लाखांनी वाढत जाते. अशी ही परस्पर संबंधित भयानक समस्या अर्थकारणाला भेडसावत आहे.

उत्पन्नवितरणातील असमानता

राष्ट्रीय उत्पन्न वितरणातील असमानता असल्यामुळे गरिबी वाढत जाते. नियोजनातील समान रोजगार संधी व उत्पन्नाचे समान वाटप होणे व त्याकरिता कार्यक्षम वितरण व्यवस्था असणे विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे पण प्रत्यक्षात याउलट स्थिती निर्माण होत गेली. संपत्तीची खाजगी मालकी व अधिकार, वारसाहक्क, संधीची उपलब्धता किंवा अभाव, व्यावसायिक भिन्नता, शिक्षण क्षमता, व अर्थव्यवस्थेचे भांडवलशाही स्वरुप इत्यादींमुळे उत्पन्न वितरणात समानता राहिली नाही. ही विषमता इतकी वाढली की, बहुसंख्य लोकांना अत्यंत हीन दर्जाचे, हालअपेष्टांचे व दारिद्रयाचे जीवन जगावे लागत आहे.

ग्रामीण व लघुउद्योगांकडे ज्या प्राधान्याची नियोजनात आवश्यकता होती ती पूर्ण होऊ शकली नाही. भांडवलाची दोषपूर्ण गुंतवणूक झाल्यामुळे योजनांची व्यूहरचना प्रभावी व परिणामकारक ठरु शकली नाही. श्रमप्रधान उत्पादनाचे तंत्र जेथे उपयोगात आणले जाते, अशा लघु व ग्रामीण उद्योगांमध्ये पर्याप्त प्रमाणात भांडवल गुंतवणूक करण्यात आली नाही. अशा अपर्याप्त भांडवल गुंतवणुकीमुळे बेकारीत वाढ व पर्यायाने गरिबीत वाढ होत गेली. औद्योगिक सत्तेचे विकेंद्रीकरण घडून न आल्यामुळे आर्थिक विषमतेची दरी जास्त रुंदावत गेली. देशातील वीस श्रीमंत घराण्यांनी औद्योगिक धोरणाचा अनुकूल लाभ घेऊन आपली सत्ता व संपत्ती वाढविली त्यामुळे विशिष्ट औद्योगिक साम्राज्याचा विस्तार वेगाने झाला. समाजातल्या विशिष्ट गटालाच भरपूर फायदा मिळाला तर उर्वरित बहुसंख्य गटाला समस्यांशी सामना करावा लागला. या सर्व कारणांचा परिणाम गरिबीत जीवन कंठणा-या लोकांच्या वाढत्या संख्येत होत गेला. अर्धनग्न राहून, आठ आठ दिवस उपाशी राहून दिवस कंठणा-या लोकांची व्यथा शद्बात वर्णन करता येत नाही. मनाला बधिर करणारी व हृदयाची स्पंदने क्षणकाल थांबविणारी अशी भीषण परिस्थिती आहे, दारिद्रयात पिचत राहणा-या लोकांची ! म्हणून समस्येची तीव्रता अन्य समस्यांपेक्षा अतिशय जास्त मूल स्वरुपाची आहे.

मानसिक दुर्बलता

आर्थिकदृष्टया जो समाज दरिद्री असतो तो सामाजिक व सांस्कृतिक दृष्टयाही मागासलेला राहतो. अशा समाजाची अभिवृत्ती ही विकसित समाजाच्या अभिवृत्तीपेक्षा भिन्न राहते व विकासाला मारक ठरणारी असते. या अभिवृत्तीमुळे गरिबी निर्मूलनाचे सामर्थ्य नाहीसे होत जाते व समाज परावलंबी, तसेच कर्तृत्वशून्य बनत जातो. यातूनच मद्यपान, भ्रष्टाचार, चोरी, अनैतिक गोष्टींचे प्राबल्य समाजात वाढत जाते. गरिबीतून अशी स्थिती व अशा स्थितीतून पुन्हा गरिबी असे दुष्टचक्र सुरु राहते. अशा लोकांचा दृष्टीकोन मिळालेला पैसा आवश्यक गरजांवर खर्च करण्याचा असतो पण बचत करण्याचा राहत नाही. पैसाच कमी मिळाल्यामुळे ही दृष्टी राहणे स्वाभाविक आहे. ब-याच वेळा घेतलेल्या कर्जाचा विनियोग मद्यपान, जुगार इ. मध्ये होतो पण विशिष्ट उत्पादक कार्यासाठी होत नाही. गरिबीच्या समस्येचे स्वरुप आर्थिक प्रमाणेच काही प्रमाणात सामाजिक व मानसिक अभिवृत्तीत असते हे लक्षात घेतले पाहिजे. धोका स्वीकारण्याची तयारी व पात्रता परिस्थितीमुळे अशा लोकांमध्ये अत्यंत मर्यादित असते. जिथे अपयश येण्याची शक्यता नसेल अशीच कामे निवडण्याची व स्वीकारण्याची प्रवृत्ती असते. त्यामुळे महत्वाकांक्षा कमी व प्रयत्नही कमी असतात. यामुळे स्वयंरोजगारासारख्या योजनांचा उपयोग होऊ शकत नाही व आर्थिक विकासाला मर्यादा पडतात.

समाजाचा आर्थिक विकास त्या समाजातील माणसांच्या कर्तृत्वप्रेरणेने होत असतो. जर्मनी व जपानसारख्या राष्ट्रातील व्यक्तीमध्ये असे कर्तृत्व आढळून येते. कर्तृत्वसंपन्न माणसे स्वतःच्या यशापयशाचे मूल्यमापन करुन विकास करीत असतात. अपयश पचविण्याचीही तयारी असते. त्यांच्या यशामध्ये भविष्यकालीन नियोजन, पुढाकार व धोका स्वीकारणे इत्यादी बाबींचा समावेश असतो. अशा समाजाची निर्मिती करण्यासाठी प्रथम गरिबीतून निर्माण होणारी मानसिक दुर्बलता नाहीशी करावयाची असते, त्यासाठी गरिबी दूर करावी लागते.

रोजगार हमी योजना

गरिबी दूर करण्यासाठी बेकार व्यक्तींना ग्रामीण क्षेत्रात काम उपलब्ध करुन देण्याची योजना १९७२ साली सर्व राज्यांमध्ये सुरु करण्यात आली. राज्य सरकारने रोजगार उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी स्वीकारल्यामुळे या योजनेचे रोजगार हमी योजना असे नामकरण झाले. ग्रामीण क्षेत्रातील अकुशल व बेकार व्यक्तींना उत्पादक स्वरुपाचा रोजगार पुरवून त्यांच्या श्रमशक्तीचा कमाल उपयोग करुन घेणे, त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य निर्माण करणे व ग्रामीण क्षेत्राचा विकास करणे ही योजनेची उद्दिष्टे आहेत. १९८० पर्यंत या योजनेच्या अंतर्गत १४०० कोटी रु. खर्च झाले असून त्यामुळे १८० कोटी श्रम दिवस रोजगार उपलब्ध झाला. सिंचनाच्या सोयींची निर्मिती, भूमीविकास, रस्तेबांधणी, कालवे, इत्यादी स्वरुपात हा खर्च झाला. या योजनेमुळे गरिबी कमी करण्यास मदत झाली आहे. पण या योजनेची अंमलबजावणी

कार्यक्षमतेने होत नाही असे आढळून आले. काम मागणा-यांची यादी अद्यावत नसणे, अधिका-यांची अनास्था, चुकीचे नियोजन, भ्रष्टाचार, पुरेशी मजुरी न देणे इत्यादी दोषांमुळे ही योजना प्रभावशाली ठरली नाही.

कर्जमुक्ती

बहुसंख्य गरीबांमध्ये शेतकरी व शेतमजुरांचा समावेश आहे. शेती करण्यासाठी दरवर्षी शेतक-यांना कर्ज पुरवठयाची गरज असते. पिढयानपिढया चालत आलेला गरिबीचा वारसा, शेतीचा लहान आकार, निसर्गाच्या पाण्यावरील निर्भरत्व, मान्सूनचा लहरीपणा व त्यातून पडणारे दुष्काळ, शेती उत्पन्नाचे अनिश्चित स्वरुप यामुळे शेतक-याला कर्ज मिळविण्यासाठी केविलवाणी धडपड करावी लागते व कर्ज मिळाल्यावर इच्छा असूनही परतफेड करता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. शेतमालाच्या विपणनातील अनिश्चित स्वरुपामुळे व उत्पन्नातील अनियमिततेमुळे कर्जाची फेड होऊ शकत नाही. कर्जमुक्तीचे धोरण शासनाने अवलंबिलेल्यास गरिबींच्या फे-यातून शेतक-यांची सुटका होऊ शकेल.

प्राधान्यक्रम आवश्यक

आठव्या योजनेमध्ये गरिबी निर्मूलन कार्यक्रमास प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे. ग्रामीण व लघुउद्योगांना विकास, देशातील साधन संपत्तीचा पूर्ण उपयोग करुन उत्पादकतेत प्रचंड वाढ, श्रमशक्तीस विशेष प्राधान्य, लोकसंख्यावाढीवर नियंत्रण, पाणीपुरवठयाच्या सोयी, वीजनिर्मिती व पुरवठा, शेतीच्या उत्पादन इष्टांकात वाढ व औद्योगिक विकासाचे विकेंद्रीकरण या दृष्टीने धोरणात परिवर्तन करण्याची गरज निर्माण झाली आहे. यामुळे गरिबी दूर होण्यास मदत होईल. रोजगार हमी योजना कार्यक्षमतेने व त्या योजनेमागील आर्थिक आशय लक्षात घेऊन राबविण्यात आल्यास रोजगाराची संधी मोठया प्रमाणावर सतत उपलब्ध होऊन दारिद्रयरेषेखाली किंवा त्याच्या जवळपास वावरणा-या लोकांमध्ये क्रयशक्ती निर्माण होईल त्यातून त्यांच्या व्यक्तिगत प्रगतीला व शेतीच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल व ग्रामीण क्षेत्रात आर्थिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचा वेग वाढेल. योजनाची कार्यक्षम अंमलबजावणी न झाल्यास गरिबीची जीवघेणी परिस्थती असंतोषात परिवर्तित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

* * *

समस्याग्रस्त सार्वजनिक क्षेत्राचे भवितव्य

आर्थिक विकासाचे प्रभावी माध्यम ठरणारे सार्वजनिक क्षेत्र अधिकच समस्याग्रस्त झाले आहे. जनतेला आर्थिक व सामाजिक न्याय प्राप्त करुन देण्यासाठी सार्वजनिक उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. मूलभूत उद्योगांच्या विकासाकरिता आवश्यक असलेल्या सर्व सोयी व सेवा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी सार्वजनिक क्षेत्राने स्वीकारली आहे. देशाचा आर्थिक विकास गतीने करण्यासाठी औद्योगिक आधार विस्तृत व सुदृढ असायला हवा. या दृष्टीने खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांचा विकास अपेक्षित असतो.

खाजगी उपक्रम लाभकारक आहेत कारण लाभाचे महत्तम प्रमाण भांडवलदारांना सतत आकर्षित करत असते व मार्गदर्शनासाठी तेच एकमेव तत्व असते. सार्वजनिक उपक्रमांची स्थिती यापेक्षा भिन्न आहे. देशातील काही सार्वजनिक उपक्रम लाभकारकता दर्शवीत असले तरी २०५ उपक्रमांना ४३१.६ को. रु. चा तोटा सहन करावा लागला आहे. या उद्योंगांमध्ये १२७३.०४ को. रु. भांडवल गुंतले आहे. सतत वाढत जाणारा खर्च ५८६.९५ कोटी रु. आहे. या परिस्थितीमुळे सार्वजनिक उपक्रम नेहमीच वादग्रस्त ठरतात व अंदाजपत्रकाचे वेळी वादळात सापडतात.

सार्वजनिक क्षेत्राची भूमिका

सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांची मालकी, संचालन व व्यवस्थापन शासनाकडे असते

त्यामुळे व्यवस्थापनाची जबाबदारी ओघाने शासनाकडे येते. खाजगी उद्योगांच्या संचालनात लाभकारकतेचे तत्व आहे, तर शासनाद्वारा नियंत्रित सार्वजनिक उपक्रमामध्ये सेवाहेतूचे तत्व कायम करण्यात आले आहे. मिश्र अर्थव्यवस्था असलेल्या आपल्या देशात सार्वजनिक क्षेत्राद्वारे विकास ही स्थिती अपरिहार्य आहे व महत्वपूर्णही आहे. सार्वजनिक क्षेत्राद्वारे मूलभूत उद्योगांची स्थापना प्रचंड भांडवल गुंतवणुकीतून होत असते. एवढया मोठया प्रमाणावरील भांडवल गुंतवणूक केल्यानंतर उत्पादनाचे कार्य सुरु होण्यासाठी लागणारा काळ इतर उद्योगांच्या तुलनेत बराच जास्त असतो. खाजगी क्षेत्राला याचे आकर्षण कमी असल्यामुळे मूलभूत उद्योगांची योजनाबध्द वाढ घडवून आणण्यासाठी सार्वजनिक क्षेत्र निर्माण करण्यात आले व त्याद्वारे उद्योगांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे ही सार्वजनिक क्षेत्राची जबाबदारी मानण्यात आली. आर्थिक मागासलेपणाचे दुष्टचक्र तोडून आर्थिक विकासाचा वेग वाढविण्याचे व त्यादृष्टीने उद्योग स्थापनेकरिता व विकासाकरिता आवश्यक असलेल्या सर्व सेवा उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था सार्वजनिक क्षेत्राची असते.

अनेकदा खाजगी क्षेत्रातील उद्योग "आजारी" पडतात व सातत्याने हानी दर्शवीत असतात. अशावेळी खाजगी उद्योगपती उद्योग बंद करतात. त्यामुळे यंत्रसामुग्री निष्क्रीय होते. हजारो कामगारांवर बेकारीचा प्रसंग येतो. वस्तूंचा पुरवठा कमी होऊन किंमत वाढते. अशावेळी हे आजारी उद्योग सरकारद्वारे चालविले जातात. त्यांची सार्वजनिक क्षेत्रात भर पडते.

वर्ष	उपक्रम संख्या	भांडवल गुंतवणूक
१९५१	५	२९ कोटी रु.
१९७५	१२९	७२६१ कोटी रु.
१९८६	२२३	४२८११ कोटी रु.

सार्वजनिक उपक्रमांची संख्या वाढली व भांडवल गुंतवणूक प्रचंड प्रमाणावर झाली, पण १९८५-८६ मध्ये ७०९२.५९ को. रु. एकूण तूट झाली. एका बाजूला ९२८.५७ को. रु. लाभ काही उपक्रमांनी प्राप्त करूनही एकूण तूट मोठया प्रमाणावर आहे ही विसंगती व्यवस्थापन समस्यातून निर्माण झाली आहे. ४०.३८% भांडवल या हानीमुळे गंजून गेले आहे. ४९ आजारी उद्योगांमुळे असे घडले असे शासकीय पातळीवर स्पष्ट करण्यात आले. ई. सी. एल. (ईस्टर्न कोलफिल्ड्स लि.) चा १९८४-८५ मध्ये मजुरी, भविष्यनिधी व अन्य सामाजिक जबाबदारी' या शीर्षकांतर्गत खर्च ४४७को. रु. म्हणजे कोळसा विक्रीमुल्याच्या ८७% होता. २ लक्ष कर्मचा-यांपैकी ५०,०००अतिरिक्त होते. त्यामुळे संकलित झालेला तोटा ६५० को.रु. वर पोहोचला. जास्त कामगार असूनही उत्पादन मात्र २६.७४ लक्ष टनावरुन २३.११ लक्ष टनावर घसरले. (संदर्भ बीपीई, बी. डब्ल्यू. २६/८७) वरील परिस्थितीवरुन सार्वजनिक उपक्रमांची आर्थिक स्थिती गंभीर असल्याचे स्पष्ट होते. उपक्रमांचे व्यवस्थापन सदोष असून

गुणवत्ता कमी होत असल्यामुळे जास्त भांडवल गुंतवणुकीतून प्रत्याय (return) मात्र मोठया प्रमाणात मिळत नाही, अशी निराशाजनक स्थिती आहे.

सुयोग्य व्यवस्थापनाचा अभाव

सार्वजनिक उपक्रमांच्या या स्थितीला त्यांच्या न सुटलेल्या समस्या कारणीभूत आहेत. उपक्रमांचे संचालन करण्यासाठी कार्यात्मक मंडळ असते. त्यात तज्ज्ञ संचालक असले तरी आपल्या विभागापुरते निर्णय घेण्यासाठी ते मर्यादित जबाबदार असतात, असा अनुभव आहे. व्यवस्थापन शास्त्राचे ज्ञान व अनुभव असलेल्या विशिष्ट व्यक्ती प्राप्त न झाल्यामुळे वरिष्ठ स्तरावर आय.ए.एस. अधिकारी नियुक्त होतात. ते बुद्धिमंत असले तरी उत्तम व्यवस्थापन करु शकत नाही ही मर्यादा नेमकी लक्षात घेण्यात येत नाही. त्यामुळे व्यवस्थापकीय कार्यक्षमता कमी कमी होत जाते. संचालक मंडळ व उच्चस्तरीय व्यवस्थापक यांना प्रबंधनात धोरण ठरविण्याचे व अंमलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य असायला पाहिजे. राजकीय हस्तक्षेपामुळे स्वातंत्र्याचा संकोच होतो व व्यवस्थापनावर विपरीत परिणाम झालेला आढळून येतो. व्यवस्थापनाच्या स्वायत्ततेसंबंधी अजूनही विचार होत नाही, हे कशाचे लक्षण समजायचे ?

हानीचे दुष्परिणाम : करांचे ओझे

सार्वजनिक उपक्रमांना हानी झाल्याने त्याचे परिणाम फक्त त्या उपक्रमापुरते मर्यादित राहात नसून त्याचे दूरगामी दुष्परिणाम होत असतात. करदात्यांवर करांचा पडणारा बोझा पूर्वीपेक्षा जास्त वाढतो. हानीमुळे आलेली तूट नवीन कर लादून वसूल केली जाते. जनतेला उपभोग्य वस्तू स्वस्त मिळण्याऐवजी करांचा भार सहन करावा लागतो. लोकांना वस्तू स्वस्त दरात उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी सार्वजनिक क्षेत्राची असते, ती पूर्ण होऊ शकत नाही. करांच्या वाढीमुळे किंमतीत उलटपक्षी वाढ होते. स्वस्त दरात प्रमाणित वस्तू उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने उपक्रमांचे आधुनिकीकरण आवश्यक असते. सातत्याने हानीचे प्रमाण वाढल्यामुळे ते केवळ अशक्य ठरते. सार्वजनिक उपक्रमांना नफा झाल्यास त्यातून अर्थव्यवस्थेत नवीन गुंतवणूक करणे शासनाला शक्य होईल.

सतत होणा-या हानीचा परिणाम मिश्र अर्थव्यवस्थेतील परिवर्तनाच्या कार्याला खीळ बसण्यामध्ये तर होतोच, पण किंमतविषयक धोरण ठरविताना अडचणी निर्माण होण्यामध्ये होतो. दुष्परिणामांचे दुष्टचक्र यातून सुरु होते. उत्पादन क्षमतेचा अपुरा उपयोग करण्यात आल्यामुळे सार्वजनिक उपक्रमांसमोर अतिभांडवलीकरणाची समस्या निर्माण झाली आहे. सामुग्रीचे साठे तुंबून पडणे, यंत्रे आळशी राहणे अशी स्थिती निकृष्ट उत्पादन क्षमता दर्शवते. उत्पादन क्षमतेचा व्यवस्थित उपयोग होत नसल्यामुळे उत्पादनखर्च सतत वाढत जातो त्यातून आवश्यक वस्तूंच्या तुटवडयाची स्थिती निर्माण होते. निर्धारित उत्पादनक्षमता उपयोगात आणली जात नाही, ही एक समस्याच आहे.

प्रचंड प्रकल्प खर्च

सार्वजनिक उपक्रमांची उभारणी क्वचितच वेळेवर होत असते, उलट अशी उभारणी ठराविक तारखेनंतर ब-याच उशिरा होणे ही रुढ झालेली वस्तुस्थिती आहे. त्यामुळे प्रकल्पाचा खर्च अवाढव्य स्वरुपात वाढतो. २५०० कोटी रु. वरुन ४६०० कोटी रु. ची वाढ म्हणजे अंदाचे ८० टक्के वाढ होते. त्यामुळे धोरणाच्या अंमलबजावणीस विलंब लागतो. इतर प्रकल्प खोळंबून राहतात व लक्षावधी रु. चे न दिसणारे नुकसान होते. जाहिरांतींवर अमाप खर्च, प्रशासनात होणारी प्रचंड प्रमाणावरील उधळपट्टी, उपक्रमाच्या संचालकांचे महागडे विदेशी दौरे, निर्णय घेण्यातील दिरंगाई, योग्य व्यक्तींची योग्यस्थानी निवड करण्यातील स्थितीचा अभाव, नियोजन व अंमलबजावणीतील अतिशय अंतर, मूल्यमापनाचा अभाव, तांत्रिक बाब्रीकडे होणारे दुर्लक्ष् इत्यादी घटकांमुळे सार्वजनिक उपक्रमांना जबर हानी सहन करावी लागते.

सामाजिक परिवर्तनाचे माध्यम

सार्वजनिक उपक्रम वरील सर्व घटक दोषामुळे समस्याग्रस्त बनले आहेत. त्यावर होणारा अवाढव्य खर्च व प्रचंड प्रमाणावरील भांडवल गुंतवणूक लक्षात घेता सार्वजनिक उपक्रम लाभकारक कसे ठरतील याकडे विशेष लक्ष् देर्णे अर्थकारणाच्या दृष्टीने आवश्यक आहे. कोळसा, वीज, स्टील, टेलिकम्युनिकेशन, बँका, विमा, विमानवाहतूक, इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी महत्वाच्या उपक्रमांना "प्राधान्य क्षेत्र" म्हणून वेगळे करुन त्या उपक्रमाच्या समस्या सोडविण्याकरिता सरकारने विशेष प्रयत्न करायला पाहिजे. आजारी उद्योगांचा स्वतंत्र वर्ग ठरवून त्यांना किमान उत्पादन क्षमतेवर कसे आणता येईल यासाठी व्यवस्थापन तज्ज्ञांची समिती नेमून विचार करायला पाहिजे. तसेच सतत तोटयात चालणा-या उद्योगांना "हानीग्रस्त" घोषित करुन एखाद्या स्वतंत्र "सेलद्वारे" त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न व्हायला पाहिजे. असे स्वतंत्र धोरण व त्याचे त्रिसूत्री अंमलात आणल्याशिवाय सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून सार्वजनिक उपक्रमांना आपली भूमिका बजावता येणार नाही आजतरी ही भूमिका वास्तवतेपासून खूप दूर आहे.

* * *

प्रदूषणाची समस्या

आजच्या आधुनिक विकासक्षम काळात औद्योगीकरण वरदायी ठरत असतानाचा, प्रदूषणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, जपान इत्यादी पाश्चिमात्य राष्ट्रांना हा प्रश्न भेडसावत असून भारतात मुंबई, कानपूर, अहमदाबाद व कलकत्ता या शहरांमध्ये या प्रश्नाची तीव्रता सतत वाढत आहे. प्रदूषणाचे क्षेत्र व स्वरुप मोठया प्रमाणावर वाढल्यास मानवी जीवनाला विराम मिळण्याचा धोका आहे. म्हणून या प्रश्नावर विचारमंथन करण्यासाठी "एन्व्हॉयरो टेक" हे भारतीय व पाश्चात्य तज्ज्ञांचे चर्चासत्र मुंबई येथे पार पडले. या निमित्ताने प्रदूषणाची भयावहता व त्यावरील उपाय दर्शविणारे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

प्रदूषण स्वरूप

प्रदूषण म्हणजें औद्योगीकरणामुळे निर्माण झालेले दूषित वातावरण होय. कारखान्यांमधून वस्तू निर्माण होताना अनेक प्रक्रियातून कच्चा माल (Raw Material) जात असतो व त्या प्रक्रियामध्ये क्षेप्य (टाकावू खराब वस्तू व खराब रासायनिक द्रव्य) निर्माण होते. ते पाण्यात सोडण्यात येते व परिणामी दूषित पाणी कारखान्याबाहेर प्रवाहित केले जाते. याला पाणी प्रदूषण (Water Pollution) म्हणतात. तसेच वायू उत्सर्गामुळे, कारखान्याच्या सभोवतीच्या परिसरात, निसर्गात असणारा व मानवी जीवनाला आवश्यक असणारा ओझोन वायू कमी होऊन कर्बाम्ल वायूचे प्रमाण अतिशय जास्त होते. या प्रक्रियेला हवा प्रदूषण (Air Pollution) असे म्हणतात. इंडियन इंडस्ट्रियल टॅक्सिकॉलॉजी रिसर्च सेंटरचे डायरेक्टर डॉ. झैदी यांच्या मते मुंबईला वायू प्रदूषण चेम्बूर भागात फार मोठया प्रमाणावर असून कानपूर, कलकत्ता, अहमदाबाद, हैद्राबाद या शहरी प्रदूषणाचा धोका निर्माण झाला आहे. त्यांनी

उदाहरणादाखल, देशातील मँगनीज उद्योगातील सुमारे १ लक्ष व्यक्तींना मँगनीज-विषारी (Poisoning) वातावरणामुळे कायमच्या शारीरिक व्यंगांचा धोका निर्माण झाल्याचे स्पष्ट केले. यावरुन हवा प्रदूषणाची तीव्रता लक्षात येते.

वायुप्रदूषणाप्रमाणेच दूषित पाण्याची समस्या वरील निर्देशित शहरांना भेडसावीत आहे. कारखान्यातील क्षेप्य, खराब रासायनिक द्रव्य पाण्यात सोडण्यात येते व ते पाणी लहान नाल्यातून नदीकडे जात असते. यातून रोगांना निमंत्रण मिळते. मुंबईला खाडीतून हे खराब पाणी प्रवाहित केले जाते. शुद्ध हवा व शुद्ध पाणी या मानवी जीवनाच्या आरोग्यविषयक आवश्यक गरजा आहेत. आणि यावरच प्रदूषणाने आघात होत असतो व पर्यायाने एक गंभीर समस्या निर्माण होते.

उपाययोजना

उद्योगांचे संचालक व शासन या दोन प्रमुख धारकांनी या गंभीर प्रश्नावर उपाययोजना करावयाची आहे. उपाय खालीलप्रमाणे आहेत. :-

१) उद्योग संचालकांनी प्रदूषण नियंत्रणाची जबाबदारी ओळखून विशिष्ट सीमित समयात हवा प्रदूषण नियंत्रणाचे मार्ग अवलंबिले पाहिजे. त्याकरिता शासनाने विशिष्ट अवधी, मर्यादा निश्चित करुन द्यायला पाहिजे.

२) उद्योगाचे स्वरुप व रचना लक्षात धेऊन तसेच प्रदूषणाची तीव्रता लक्षात घेऊन विशिष्ट स्वरुपाची रक्कम प्रदूषण नियंत्रण कार्यावर उद्योगांनी खर्च केली पाहिजे. ही सामाजिक जबाबदारी त्यांनी पार पाडली पाहिजे. प्रबंधनाचे असे सामाजिक उत्तरदायित्व उद्योगांनी मान्य करायला पाहिजे.

३) कमीत कमी प्रदूषण निर्मिती होईल याकडे शासनाने लक्ष द्यायला पाहिजे. कारण प्रदूषण नियंत्रण ही अतिशय खर्चाची स्थिती आहे. त्याकरिता उद्योगांनी जास्त खर्च करण्याची वैधानिक तरतुदींची आवश्यकता आहे. ती शासनाने पार पाडावयाची आहे. आंध्र प्रदेशात १२० औद्योगिक युनिट्सनी पाणी प्रदूषण नाहीसे करण्यात ९० टक्के यश प्राप्त केले आहे.

४) उद्योग संचालकांकडून प्रदूषण नियंत्रण यशस्वीपणे होण्यासाठी जनमत जागृत करुन त्याद्वारे दडपण आणायला पाहिजे.

५) नवीन उद्योगांना परवाने देतांना प्रदूषण नियंत्रण खर्च शासनाने निश्चित करुन देऊन त्याच्या अंमलबजावणीकडे नियंत्रण ठेवायला पाहिजे.

६) प्रदूषण नियंत्रणासाठी स्वायत्त महामंडळाची स्थापना शासनाने करावी. या मंडळात रसायन शास्राचे तज्ञ, उद्योगसंचालक व शासनाचे प्रतिनिधी असावे. या महामंडळाने वातावरण शुद्धतेसंबंधी संशोधनास अधिक चालना देऊन नियंत्रणासंबंधीचे मार्ग सुचवावे.

७) शासनाने प्रदूषण नियंत्रण कार्याचे महत्व लक्षात धेऊन अंदाजपत्रकात एका विशिष्ट रकमेची तरतूद करावी.

वरील उपाययोजनांच्या अंमलबजावणी वरच प्रदूषण नियंत्रणाचे यश अवलंबून आहे. अन्यथा एका गंभीर संकटाशी सामना करावा लागेल.

* * *

वृक्षसंवर्धनास पर्याय नाही!

मानवी जीवनात वृक्षांना प्राणभूत स्वरुपाचे महत्व आहे. पहाटेच्या प्रसन्न वेळी वृक्षांमधून बाहेर पडणारा शुध्द प्राणवायू मानवाला संजीवन देणारा असतो. मानवी जीवन आणि निसर्ग यांचा परस्परांशी अनन्यसाधारण संबंध आहे. आपल्या जीवनातील सुरक्षितता, शांतता, समृद्धी व सुखसंपन्नता या सर्व बाबी निसर्गाशी संबंधित आहेत. पर्यावरणातील समतोल कायम राहिल्यास आपले जीवन सुखी व निरामय होते.

अलिकडे मात्र पर्यावरणातील समतोल ढळला आहे. जंगलकटाई खूप होत असल्यामूळे व पर्याप्त प्रमाणात वृक्षारोपण नसल्यामुळे प्रदूषणाच्या समस्येची तीव्रता जाणवायला लागली आहे. जंगले उध्वस्त होत आहेत. लाकूड कटाई व विक्रीचा व्यापार तेजीत सुरु आहे व त्यातून होणा-या दुष्परिणामाचीं तीव्रता तेवढयाच वेगाने वाढत आहे. औद्योगीकरणाचा वेग वाढणे आवश्यक असले तरी वनीकरणाकडे तितकेच लक्ष देणेही आवश्यक आहे. भारतात अनेक प्रदेशात वनीकरणाची समस्या तीव्र झाली आहे. त्यामुळे बहुतांश भाग उजाड माळरानाच्या स्वरुपात दिसतो. ८० लक्ष हेक्टर्स जमिनीमध्ये व्यापलेली जंगले पार तोंडली गेल्याचे एका नव्या सर्वेक्षण अहवालात आढळून आले.

आर्थिकदृष्टया महत्वपूर्ण

वनांचे महत्व आर्थिकदृष्टया विचार केल्यास विशेषच आहे. हवामान उत्तम राहण्यास त्यामुळे फार मदत होते. शेतजमिनीची सुपीकता कायम स्वरुपात टिकून राहते. तसेच

जमिनीचे क्षरण होण्याच्या प्रक्रियेची गती जंगलांमुळे कमी होते. वाळवंटाच्या विस्तार स्वरुपाला पायबंद बसतो, तसेच नद्यांना पूर येण्याचे प्रमाणही वनीकरणामुळे कमी होते. घनदाट वनांमुळे वातावरणातील थंडावा वाढतो व त्याचा परिणाम पर्याप्त पाऊस पडण्यात होतो. कागद, रेयॉन, काडीपेटी अशा उद्योगांना आवयश्यक असणारी कच्ची सामुग्री जंगलामध्ये उपलब्ध होते. जंगलाच्या विकासावर समाजाचा विकास व भविष्यकाळ अवलंबून असतो हे आता सर्वांनीच मान्य केले आहे.

जंगलांची स्थिती

घनदाट जंगले ही देशाची संपत्ती आहे. भारतात जंगलांची स्थिती असमाधानकारक आहे. अमेरिका, जर्मनी, रशिया, फ्रान्स हे पाश्चिमात्य देश औद्योगिकदृष्टया अत्यंत प्रगत असूनही त्या देशात जंगलांची संख्या जास्त आहे. देशातील एकूण जमिनीपैकी ५६ ते ५८ प्रतिशत जमीन जंगलांनी व्याप्त आहे, तर भारतात एकूण जमिनीपैकी २१.९ प्रतिशत वनव्याप्त आहे. ७१३ लक्ष हेक्टर जमिनीमध्ये असलेल्या वनांवर सरकारची मालकी आहे. २४ लक्ष हेक्टर जमिनीमध्ये असलेल्या वनांवर स्वायत्त संस्थाची मालकी, तर १३ लक्ष हेक्टर जमिनीमध्ये असलेली जंगले ही खाजगी व्यक्तींच्या मालकीची आहेत. राखीव जंगले, सुरक्षित जंगले आणि अवर्जित जंगले असे जगलांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. राखीव जंगलावर (Reserved forests) शासनाची मालकी व कडक नियंत्रण आहे. संरक्षित जंगलांचे व्यवस्थापन शासनाकडे आहे पण नियंत्रणात शिथिलता आहे.

प्रादेशिक स्तरावर जंगलांचे विविध स्वरुप दिसून येते. एखाद्या राज्यात घनदाट जंगले आहेत, तर दुस-या राज्यात खुरटी झाडेही उपलब्ध नाहीत.

खालील सारणीवरुन हे चित्र अधिक स्पष्ट होते.

प्रदेश एकूण	एकूण भूप्रदेशाशी असलेल्या जंगलप्राप्त भागाचे प्रीतशत प्रमाण
हरियाणा	-२
राजस्थान	-४
उत्तर प्रदेश	-१३
बिहार	-१७
मध्यप्रदेश	-३३
हिमाचल प्रदेश	-४८
त्रिपुरा	-६०
जम्मू काश्मीर	-६१

जंगलांचे सरक्षण व संवर्धन करण्याचे एक शास्त्र आहे. याकडे दुर्लक्ष झाले. या राष्ट्रीय संपत्तीचा मागील दहा वर्षात सतत अपव्यय होत गेल्याचे आढळून आले.

अनिर्बंध जंगलकटाई

१९५२ पासून जंगलकटाईस प्रारंभ झाला. जमीन शेतीयोग्य बनविण्यासाठी तसेच लाकूड विक्री व्यवसायासाठी झाडांची कापणी सुरु झाली. परंतु त्यांचे जे निर्धारित प्रतिशत प्रमाण ठरले होते ते पुढे वाढत जाऊन, बेकायदेशीर मार्गाने वृक्षतोडीचे प्रमाण वाढून ओसाड रुप जमिनीस प्राप्त झाले. असाधारण व सतत करण्यात आलेल्या वृक्षतोडीमुळे एकेकाळी घनदाट जंगलांनी व्याप्त असलेल्या भूप्रदेशाचे वैराण वाळवंटात रुपांतर व्हायला लागले. बिहारमधील छोटे नागपूर, दक्षिणेकडील निलगिरी पर्वतांच्या रांगा, उत्तर प्रदेशातील इटावा येथील भूभाग दुष्काळी स्वरुपाचा बनला आहे. पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, कर्नाटक, गुजराथ, आंध्रप्रदेश व केरळ या राज्यांमध्ये ३४११ हजार हेक्टर्स जमिनीत प्रचंड प्रमाणावर वृक्षतोड झाली.

खालील सारणीतून हे अधिक स्पष्ट होते.

प्रदेश	नष्ट झालेल्या वन जमिनीचे क्षेत्र (हजार हेक्टर्स)
केरळ	११५
उत्तर प्रदेश	१२०
कर्नाटक	१४९
आंध्रप्रदेश	१६४
गुजराथ	१७५
महाराष्ट्र	१८४
पश्चिम बंगाल	३२२
मध्य प्रदेश	१५८७

(स्रोत-सर्वेक्षण अहवाल-एस.बी.बी.आय.-६ मार्च १९८९)

शासकीय प्रयत्न

शासनाने एकूण भूभागापैकी किमान ३३ प्रतिशत भूभाग जंगलानी व्याप्त असावा, असे १९५२ च्या धोरणात जाहीर केले होते. राष्ट्रीय हित दृष्टीसमोर ठेवून वृक्षसंवर्धन व संरक्षण करणे, अनियोजित व बेकायदेशीर वृक्षकटाईस आळा घालणे, चराऊ रानांचा व कुरणांचा विकास करणे इ. स्वरुपाची उद्दिष्टे असलेले धोरण आखलेले आहे. हे धोरण राबविण्यासाठी पंचवार्षिक योजनामध्ये आतापर्यंत १६४.७ कोटी रु. खर्च करण्यात आले. या काळात ४७ हजार चौ.कि.मी क्षेत्रात व्यापलेल्या जंगलांची पाहणी करण्यात येऊन तेथे जाण्यासाठी सडका बांधण्यात आल्या आणि लाकूडकटाई झाल्यानंतर नव्याने वृक्षारोपण करण्यात आले. जंगल संवर्धन व नियंत्रणासाठी केन्द्रीय जंगल उद्योग कमिशनही कार्यरत झाले. २५१ हजार हेक्टर जमिनीत लवकर वाढणारी झाडे लावण्यात आली, तर ३६९ हजार हेक्टर जमिनीत सागवानी

वृक्ष आर्थिकदृष्टया महत्वपूर्ण म्हणून लावण्यात आलेत. राष्ट्रीय उद्यानांच्या व अभयारण्याच्या निर्मितीवर भर देण्यात आला.

राष्ट्रीय उद्यान कायद्यांतर्गत महाराष्टातील खालील प्रमुख उद्याने व अभयारण्ये विकसित करण्यात आली आहेत.

बोरिवली राष्ट्रीय उद्यान	ठाणे जिल्हा	आकार	६१	चौ. कि. मी.
नवेगाव राष्ट्रीय उद्यान	भंडारा "	"	१३४	"
ताडोबा राष्ट्रीय उद्यान	चंद्रपूर "	"	११६	"
पेंच राष्ट्रीय उद्यान	नागपूर "	"	२५	"
कर्नाळ पक्षी अभयारण्य	कुलाबा "	"	४.४८	"
यावल प्राणी अभयारण्य	जळगाव "	"	११७.५२	"
नागझिरा प्राणी अभयारण्य	भंडारा "	"	१३६.४९	"
ठाकवा कोळमाय अभयारण्य	अमरावती "	"	३५१.३९	"
तानसा पानलोट अभयारण्य	ठाणे "	"	२१६.७५	"
किनवट अभयारण्य	यवतमाळ "	"	१३८	"
बोर अभयारण्य	वर्धा "	"	६१.१०	"

अपर्याप्त प्रयत्न

शासनाने जंगल संवर्धन व वृक्षारोपणाचे प्रयत्न योजना काळात केले, पण ते अपुरे आहेत. अवैध मार्गाने बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश व केरळ येथे जंगल कटाई मोठया प्रमाणावर होत असून ते रोखण्यात वनखात्यास अपयश येत असल्याचे दिसून येते. खेडी, गावे, शहरे येथे वृक्षारोपण व संवर्धन मोठया प्रमाणावर व्हावयास पाहिजे. बंगलोर, नागपूर, पुणे, दिल्ली, चंदीगड, अम्बाला, इंदूर, भोपाळ, उज्जैन, कोचीन, त्रिवेंद्रम, हैद्राबात, देहरादून इ. प्रमुख शहरे सर्वेक्षण अहवालात " ग्रीन सिटीज " असल्याचे नमूद केले आहे.

वृक्षसंवर्धन शहरांमध्ये तसेच लहान गावांमध्ये अतिशय आवश्यक आहे. प्रदूषण व अनारोग्य टाळण्यासाठी तो एक महत्वाचा उपाय आहे. त्यासाठी विशेष योजना राबवायला पाहिजे. औद्योगिक परिसरात मोठया वृक्षांचे बीजारोपण करणे अनिवार्य करायला पाहिजे. अवैध वृक्षकटाईस आळा घालणे, जंगलांनी व्याप्त असलेल्या प्रदेशाच्या एकूण क्षेत्रफळात वाढ करणे, व्यापारासाठी उपयुक्त असलेल्या झाडांच्या लागवडीचे क्षेत्र वाढविणे, नवीन जातीच्या झाडांची लागवड करणे व त्यासाठी संशोधन करणे, वनांचे व्यवस्थापन सुधारणा करणे इ. स्वरुपाचे प्रयत्न शासनाने करावयास पाहजेत. जनतेने व सामाजिक संस्थांनी वृक्षारोपण व संवर्धन कार्यात महत्वाचे योगदान देणे आवश्यक आहे, कारण प्रदूषणाच्या समस्या टाळण्यासाठी वृक्षसंवर्धनास पर्याय नाही !

* * *

गरिबाची व्यथा निवा-याची कथा

सातवी योजना संपण्याच्या टप्प्यात असूनही मानवाच्या मूलभूत गरजांमध्ये महत्वपूर्ण असलेल्या निवा-याची तीव्रता मात्र अजिबात कमी झाली नाही. उलटपक्षी ती अधिक वाढत असल्याचेच दिसून येते. एकूण लोकसंख्येच्या पंचवीस प्रतिशत लोक निवा-याच्या विपन्नावस्थेत जगत आहेत. कोणालाही आपले एक छोटेसे चांगले घर असावे, असे वाटणे स्वाभाविक आहे. दारिद्रयाच्या दुष्टचक्रामुळे व बेरोजगारीच्या अवस्थेमुळे सामान्यांना झोपडी देखील बांधता येत नाही. अशा स्थितीत काळ कंठणारे लाखोंच्या संख्येत लोक आज भारतात आहेत. आपल्या देशात घोषणांचे पीक उदंड आहे. निवडणुकीच्या तोंडावर तर अनेक घोषणा जनतेच्या डोळयात धूळ फेकतात. गरिबी हटावची घोषणा झाली, गरिबी मात्र वाढतच गेली. एका बाजूने देशाची वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती वेगाने होत आहे. फ्रीज, टी.व्ही., व्हिडिओ व कॉम्प्युटर्सचे युग आले आहे पण सर्वांचे जीवनमान उंचावले असे नाही लोकांच्या गरजा अपूर्ण अवस्थेतच राहिल्याचे दिसून येते. गरीबच काय पण बहुतांश मध्यमवर्गीय लोक स्वतःचे घर बांधण्याच्या स्थितीत अजून आलेले नाहीत. झोपडीमध्ये, भाडयाने दुस-याच्या घरी राहण्याची स्थिती, रेल्वे पुलाखाली, सिमेंटच्या मोठया पाईपमध्ये, तर कधी उघडयावर अशी निवा-याची स्थिती स्वातंत्र्यप्राप्तीपासून ४२ वर्षानंतरही पाहायला मिळते, ही खेदाची बाब होय.

गलिच्छ वस्त्यांमध्ये राहण्या-यांची संख्या शासनाच्या मते १ कोटी ४० लाख आहे. महाराष्ट्र हाऊसिंग बोर्डाने ३८ वर्षामध्ये ८३,७२९ घरे बांधलीत म्हणजे वर्षाला सरासरी २८०० ! पश्चिम बंगाल हाऊसिंग बोर्डाने मागील १४ वर्षात १४,५८० घरे बांधलीत म्हणजे वर्षाला सरासरी १००० ! लोकसंख्यावाढीच्या तुलनेत हे आकडे नगण्य आहेत. राज्यशासनाने कमीत कमी एकूण मासिक उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम घरबांधणीसाठी खर्च करायला पाहिजे, पण प्रत्यक्षात ती ५ टक्केपेक्षाही कमी आहे.

गुंतवणुकीतील घट

घरबांधणीसाठी खाजगी क्षेत्र आघाडीवर आहे. या क्षेत्राची गुंतवणूक २९,००० को. रु.आहे तर शासनाची २८५८ को.रु. आहे. शासनाने घरबांधणीसाठी पहिल्या योजनेत एकूण गुंतवणुकीच्या ३५ टक्के राशी गुंतविली होती. पुढे हे प्रमाण १९ टक्के, १५ टक्के, १२ टक्के, व ७.५ टक्केपर्यंत कमी होत गेले. शासनाने घरबांधणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन गुंतवणूक कमी केल्याचे, आकडे दर्शवितात. सामान्यतः गुंतवणूक वाढत असते, परंतु निवा-याच्या बाबतीत केवळ कमी प्राधान्य दिल्याने ती कमी झाल्याचे दिसून येते. याचा ग्रामीण क्षेत्रावर विपरीत परिणाम झाला. घरबांधणीचे धोरण गरिबांच्या बाबतीत पूर्णतः अयशस्वी ठरते. श्रीमंतांनी खाजगी क्षेत्राद्वारे आपला विकास केला. उच्च - मध्यम वर्गाने स्वतःची पुंजी व कर्ज यातून स्वतःची गृहबांधणी केली. गरीब वर्गाला मात्र चंद्रमोळी झोपडीतच निवारा शोधावा लागला.

घरबांधणीसाठी लागणारे सिमेंट, लोखंड, लाकूड, विटा इ. सामुग्रीच्या किंमती दिवसेंदिवस वेगाने वाढत आहेत. त्यामुळे मध्यमवर्गाला स्वस्त दरात छोटे घर बांधणे कठीण होत चालले आहे. अहमदाबाद येथील नॅशनल इंन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्स या संस्थेच्या सर्वेक्षण अहवालामध्ये, ५० टक्के लोकसंख्या वाढत्या किमतीमुळे स्वतःचे घर बांधण्याच्या आर्थिक स्थितीत नसल्याचे, नमूद केले आहे.

सुसज्ज शहरे - दुर्लक्षित खेडी

निवा-याचे संदर्भात विषम स्वरुपाचे दृश्य दिसते. शहरे गगनचुंबी इमारती व बगल्यांसह सुसज्ज होत आहेत. ग्रामीण क्षेत्रात मात्र बहुतांश झोपडया व क्वचित जुन्या काळातील वाडयाचे दर्शन घडते. व्यवस्थित नियोजन नसल्यामुळे घरबांधणी विकासाचे बाबतीत खेडी अतिशय दुर्लक्षित असल्याचे दिसून येते.

शहरे	घरांची संख्या (हजारामध्ये)	घरमालकांचे प्रतिशत प्रमाण
अहमदाबाद	१००५	४३.५
बंगलोर	१०१३	३५.२
मद्रास	१०१५	३७.६
कलकत्ता	१०१५	३७.४
मुंबई	१०२१	३८.५
नागपूर	NA	NA
पुणे	१०३८	३२.६
हैद्राबाद	१०५०	४४.२
दिल्ली	११११३	५१.३

संदर्भ - नशॅनल इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक फायनान्स, अहमदाबाद सर्व्हे रिपोर्ट सी.आय.२९ मे १९८९

वरील सारणीवरुन शहरांमधील घरांच्या संख्येच्या व घरमालकांच्या प्रमाणाचा अंदाज येतो. दिल्लीसह सर्व ठिकाणी ५० टक्के कमी घरमालकांची संख्या निवा-याच्या टंचाईकडे लक्ष वेधते. शासनाच्या चुकीच्या प्राधान्यक्षमतेची ही फलश्रुती आहे.

फ्लॅट्सचे आकर्षण

मध्यमवर्गीयांना घरबांधणीसाठी कर्जपुरवठा करणा-या सहकारी संस्था शहरांमध्ये आहेत. या संस्थांमार्फत प्रत्येकी ५०,००० रु. ते ८०,०००रु. चा कर्जपुरवठा होत असतो. महानगरांमध्ये ही कर्जमर्यादा लाखांमध्ये आहे. यामुळे अनेकांची घरबांधणीची सोय होते. मोठया शहरांमध्ये फ्लॅट्सचे आकर्षण खूप आहे. १ लक्ष रु. पासून ४.५० लक्ष रु. पर्यंत लहान - मोठया आकारमानाचे फ्लॅट्स उपलब्ध होत आहेत. मुंबई, बंगलोर, हैद्राबाद, अहमदाबाद, पुणे, मद्रास, दिल्ली, कलकत्ता याप्रमाणेच नागपूर, भोपाळ, इंदौर, औरंगाबाद, नांदेड, अकोला, अमरावती इ. शहरांमध्ये घरांप्रमाणेच फ्लॅट्सची रचना मोठया प्रमाणावर होत आहे. बिल्डर्सकडून बांधणी करुन तयार घर उपलब्ध होत असल्यामुळे फ्लॅट योजना दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहे. वास्तुविशारदांना या व्यवसायात लाभ मर्यादा भरपूर असल्यामुळे त्यांचा धंदा तेजीत सुरु आहे. मध्यम व श्रीमंत वर्गाला अर्थप्रबंधनाच्या सोयी उपलब्ध आहेत. गरीब वर्गाला मात्र या सवलतींपासून वंचित राहावे लागते. ग्रामीण क्षेत्रात अन्य घटकांचा विकास होत असला तरी, निवा-याची सोय मात्र अजूनही शासकीय व खाजगी क्षेत्राकडून दुर्लक्षित आहे.

शासनाने शाह कमिटी १९७८ प्लॅनिंग कमिशन १९८५, डॉ. रंगराजन कमिटी १९८६ अशा समित्या स्थापन करुन निवा-याच्या समस्येच्या संदर्भात अहवाल मागविले. या अहवालानुसार किमान ३०० को. रु. चा कर्जपुरवठा ग्रामीण क्षेत्रासाठी अपेक्षित आहे. रिझर्व्ह बँकेने कर्जपुरवठा करण्याचे धोरण आखले. कर्ज परतफेडीची मुदत १५ वर्षे व व्याज दर १२.५ टक्के ते १६ टक्के ठेवला. स्टेट बँक, कॅनरा बँक व पंजाब नॅशनल बँक यांचेद्वारे या सवलती देण्याचे धोरण आहे. नॅशनल हाऊसिंग बँक, ह्यूमन सेटलमेंट मॅनेजमेंट इन्स्टिटयूट, ह्यूमन डेव्हलपमेंट फेडरेशन या संस्था प्रामुख्याने घरबांधणीसाठी देशात प्रयत्नशील आहेत.

बृहत् प्रकल्प

नॅशनल हाऊसिंग बँकेने एक महत्वाकांक्षी प्रकल्प देशात राबविण्याचे ठरविले आहे. विशेषतः ग्रामीण क्षेत्रातील एकवीस कोटी लोकांच्या निवा-याचा प्रश्न सोडविण्यासाठी हे धोरण आहे. त्या दृष्टीने ग्रामीण जनतेला घरबांधणीसाठी तीस रु. दरमहा बचत करावी लागेल. त्यावर १० टक्के दराने चक्रवाढ व्याज देण्यात येईल. ५ वर्षेपर्यंत अशी बचत करणे अनिवार्य राहील. या बचत राशीवर नॅशनल हाऊसिंग बोर्ड ५०,००० रु. कर्जपुरवठा करील. त्यामुळे एक छोटेखानी स्वरुपाचे घर सहज बांधता येईल. या योजनेत कर्ज परतफेडीची मुदत वीस वर्षे व व्याज दर तीन प्रतिशत राहील, असे बँकेच्या अध्यक्षांनी एका मुलाखतीत सांगितले.

या योजनेनुसार ग्रामीण जनतेला घर बांधणे सोयीचे होईल. देशव्यापी स्वरुपात ही योजना राबविण्यात येणार आहे. योजनेचे स्वरुप आकर्षक असले तरी ग्रामीण जनतेकडून किती प्रमाणावर बचत होईल, अशी शंका संचालकांना वाटते. बचतीचा प्रभाव शहरी क्षेत्रात जसा आहे तसा ग्रामीण क्षेत्रात नाही. ग्रामीण जनतेचे उत्पन्न निश्चित नसल्यामुळे परतफेडीची व्यवस्था दिरंगाईची राहील, असे अर्थतज्ञांना वाटते.

स्वतःचे घर बांधणे हा सर्वसामान्य जनतेचा जिव्हाळयाचा विषय आहे. शहरी क्षेत्र असो की ग्रामीण क्षेत्र असो ही व्यथा सर्वत्र आहे. निवा-याचा प्रश्न सोडविण्यासाठी नियोजनात प्राधान्यक्रम ठरवायला पाहिजे. घरबांधणीसाठी कमी व्याजदराचा कर्जपुरवठा व जमीन खरेदीसाठी सवलती दिल्या पाहिजेत. गृहनिर्माण सहकारी संस्थाकडून फसवणुकीचे व्यवहार होणार नाहीत यासाठी स्वतंत्र नियंत्रण व्यवस्था पाहिजे. घरबांधणीचे स्वतंत्र धोरण योजनापूर्वक राबविल्याशिवाय हा प्रश्न सोडविता येणार नाही. शासन हे करील काय ?

* * *

आर्थिक विषमतेचे आजचे चित्र

इकॉनॉमिक टाइम्स रिसर्च ब्युरोने सर्वेक्षण करुन देशाच्या आर्थिक क्षेत्रातील विविध पैलूंची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. त्यातून देशाच्या आर्थिक विषमतेच्या भेसूर स्वरुपाची कल्पना येते. योजना काळात औद्योगिक क्षेत्राचा विकास अशा रीतीने झाला की बडया औद्योगिक घराण्यांचे उद्योगावरील वर्चस्व व वैभव सतत वाढतच गेले. एका बाजूने बडया उद्योगपतींची संपत्ती वाढत आहे. म्हणजेच दारिद्रयाच्या प्रश्नाची तीव्रता सात पंचवार्षिक योजनानंतरही कमी झालेली नाही.

देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे हे जितके महत्वाचे आहे तितकेच या उत्पन्नाचे वितरण व्यवस्थित व सामान्य घटकांपर्यंत होणेही महत्वाचे आहे. उत्पन्न वितरणामध्ये विषमता असल्यामुळे एका वर्गाकडे अमाप संपत्ती केंद्रित होते तर गरीब वर्ग त्याचवेळी यातनांचे जीवन जगत असतो. भांडवलशाही अर्थव्यवस्था, संपत्तीची खाजगी मालकी व अधिकार, वारसाहक्क व्यावसायिक वर्चस्व इत्यादी कारणांमुळे विषमतेची स्थिती निर्माण होत असते. आज २६० लक्ष लोक असे आहेत ज्यांना दिवसभर परिश्रम केल्यानंतरही आपल्या मूलभूत गरजा भागविण्याकरिता केविलवाणी धडपड करावी लागते. त्यांना दिवसाला ३.५० रु. मिळत नाही म्हणजेच दारिद्रयरेषेखालील जीवन जगणा-यांचे ५१ टक्के प्रमाण होते, ते १९८५ मध्ये ४३.२ टक्केपर्यंत कमी झाले आहे असे असले तरी दारिद्रयाची तीव्रता कायम आहे.

मागील दोन दशकांमध्ये टाटा आणि बिर्ला या दोन श्रीमंत घराण्यांनी देशातील वीस मोठया घराण्यांमध्ये पहिले व दुसरे स्थान कायम राखले आहे.

२० श्रीमंत घराणी

१९६४ क्र.	१९८४ क्र	नाव	एकूण संपत्ती (आकडेवारी कोटी रु.) १९६४	१९८४
१	१	टाटा	३७५.०	२,४४९.३
२	२	बिर्ला	२८२.९	२,५५१.६
१०	३	मफतलाल	३९.५	७१२.२
६	४	सिघांनिया	५४.५	६९२.३
४	५	थापर	६३.३	५७२.१
३	६	एसीसी	७६.९	४५६.२
१२	७	आयसी आय	३६.९	४४९.७
१४	८	साराभाई	३३.८	४४०.९
५	९	बांगूर	६२.५	३७३.७
१६	१०	किर्लोस्कर	१९.१	३७०.२
-	११	रिलायन्स	-	३६०.२
८	१२	श्रीराम	५०.३	३५८.६
-	१३	अशोक लेलँड	-	३३६.५
-	१४	हिंदुस्थान लिव्हर	-	३२९.०
१९	१५	मोदी	११.३	३२२.०
९	१६	सिंदीया	४६.३	३०६.०
-	१७	टीव्हीएस अय्यंगार	-	३०१.९
१५	१८	महिंद्र आणि महिंद्र	२१.१	२९९.७
२०	१९	लार्सन आणि टुब्रो	११.२	२९२.८
१७	२०	बजाज	१६.७	२८६.२
		(संदर्भ-इकॉनॉमिक टाइम्स ८९)	१,३४६.९	१२,२६१.७

वरील सारणीवरुन देशातील २० मोठया औद्योगिक घराण्यांच्या संपत्तीतील वाढ दिसून येते. मध्यंतरीच्या काळात टाटाचे शेअर्स घसरल्यामुळे एकूण संपत्तीत थोडी घट झाली पण बिर्ला घराण्याच्या संपत्तीत सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येते. १९६४ मध्ये यादीत नसणारे हिंदुस्थान लिव्हर, टीव्हीएस, अय्यंगार, अशोक लेलँड, रिलायन्स इत्यादीनी १९८४ मध्ये या यादीत स्थान मिळविले. बालचंद, हिराचंद, पॅरी,कस्तुरभाई लालभाई, क्लीक्स यांना या यादीत अजून स्थान घेता आले नाही. पण त्यांची त्या दिशेने घोडदौड सुरु आहे. किर्लोस्कर

आणि मफतलाल घराण्यांनी प्रयत्नपूर्वक संपत्तीत वाढ करुन आपले स्थान उंचावले आहे. साराभाई, सिंधानिया, महिंद्र आणि महिंद्र, आयसीआय, लार्सन अंड टुब्रो, बजाज इत्यादी प्रतिष्ठानांनी आपली संपत्ती वाढविण्यात यश मिळविले.

आजचे आर्थिक विषमतेचे हे चित्र आहे. बडया घराण्यांची संपत्ती तर वाढणार आहेच. पण दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या जितकी कमी होईल व लोकांना किमान स्तरावरील जीवन जगण्याची संधी उपलब्ध होईल अशी स्थिती येंणे आवश्यक आहे. औद्योगिक विकासाचा फायदा समाजातील सर्व घटकांना योग्य प्रमाणात प्राप्त झाला असता तर समाजातील आर्थिक विषमतेची दरी निश्चितपणे कमी होऊ शकली असती. सातव्या योजनेत दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणा-या लोकसंख्येचे ४३.२ टक्के प्रमाण ३० टक्केपर्यंत कमी होऊ शकेल असे उद्दिष्ट पूर्ण हाईल अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

* * *

जागतिक यादीत सात भारतीय बँकांचे श्रेष्ठत्व!

बँक! सर्वसामान्य माणसाची जिव्हाळ्याची बँक!

सामान्यांच्या ठेवी यात सुरक्षित राहणार आणि त्यांना कर्जपुरवठाही होणार!

असे अर्थप्रबंधन करणारी बँक देशाच्या अर्थकारणाची प्राणनाडी असते!

ठेवी विस्तार व कर्जपुरवठा या दोन महत्वाच्या उद्दिष्टांसोबत अन्य सुविधा उपलब्ध करुन देणारी बँकच असते.

शेती, उद्योग व व्यापार ही अर्थव्यवस्थेची प्रमुख क्षेत्रे आहेत. या क्षेत्रांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींना त्यांचे व्यवहार व्यवस्थित करण्यासाठी योग्य वेळेस कर्जपुरवठा झाल्यास या सर्व क्षेत्राचा विकास होईल व पर्यायाने आर्थिक विकासाचा वेग वाढेल- हे कार्य बँका करीत असतात. त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य रिझर्व्ह बँक करीत असते. या नियंत्रणामुळे व सुयोग्य व्यवस्थापन दर्जामुळे भारतातील काही बँकांचे कार्य निश्चितपणे स्पृहणीय ठरले आहे.

जागतिक यादीत

प्रबंधनाच्या क्षेत्रात अग्रगण्य ठरणा-या, जगातील प्रमुख निवडक ५०० बँकांची यादी तयार करण्यात आली. त्यात सात भारतीय बँकांना विशेष स्थान लाभले आहे, असे इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स लंडनच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. भारताच्या दृष्टीने ही अभिमानाची बाब ठरते. स्टेट बँक ऑफ इंडिया (ग्रुप), बँक ऑफ इंडिया, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, कॅनरा बँक, पंजाब नॅशनल बँक, सिंडिकेट बँक, अशा या सात बँकांनी जागतिक पटलावर आपले प्रबंधनातील श्रेष्ठत्व सिद्ध करुन दाखविले.

इन्स्टिटयूट तर्फे प्रत्येक दशकामध्ये बँकांच्या आर्थिक प्रबंधनाच्या संदर्भात एक विस्तृत सर्वेक्षण करण्यात येते. बँकांची लाभार्जनक्षमता, ठेवी, कर्जविषयक धोरण, तरलता, संपत्ती, भांडवल, संचिती, करपूर्वनफा, करानंतरचा नफा, कर्मचा-यांची संख्या अशा महत्वाच्या विविध बाबींचा अभ्यास करुन विशिष्ठ निकष पूर्ण करणा-या बँकांचाच या यादीत समावेश करण्यात येतो. ही जागतिक प्रमुख बँकांची यादी विनियोजकांना नेहमीच प्रोत्साहित करीत असते. तसेच स्पर्धेच्या परिस्थितीत लाभार्जनक्षमता वाढवून, आर्थिक स्थैर्य कायम ठेवून या यादीत मानाचे स्थान प्राप्त करणे म्हणजे बँकांच्या प्रबंधनकार्याची परीक्षाच असते. हे आव्हान आपल्या सात बँकांनी पेलून धरले व कार्यक्षम व्यवस्थापनाची पावती दिली.

प्रमुख निष्कर्ष

प्रमुख बँका	संपत्ती	%	[illegible]पूर्वनफा		भांडवल	कर्मचा-यांची
लाख डॉलर्स	संपत्तीवर	भांडवल		संपत्ती	संख्या	
			%	%		%
१-१००	५,९४२,७१०	६४.[illegible]	०.६२	१८.३८	३.३८	२,४८२,०२१
१०१-२००	१,५५८,५४०	[illegible].९	०.७७	[illegible]	४.६०	८१६,९७१
२०१-३००	८२८,२९५	९.०	०.८८	१७.०९	४.९३	७८१,९६१
३०१-४००	५३७,६२४	५.८	०.८६	१७.६४	४.७३	७१८,०१९
४०१-५००	३८३,३५८	[illegible]	[illegible]३७	१८.५५	५.२५	४४७,६८८

वरील सारणीवरुन (संदर्भ - बी. आय. ८-३-८७) जगातील निवडक प्रमुख पाचशे बँकांच्या संपत्तीची, करपूर्वनफ्याची, भांडवल व सपंत्तीच्या दराची तसेच कर्मचा-यांच्या संख्येची स्पष्ट कल्पना येते. यावरुन काढण्यात आलेले सर्वेक्षणाचे प्रमुख निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत. भांडवल संपत्ती दर, कर्मचा-यांची संख्या इत्यादी सर्वच घटकांच्या बाबतीत युरोपीय बँका प्रथम क्रमांकावर आहेत, असे आढळले. संपत्ती व लाभार्जनक्षमता यांचे नियोजन बुद्धिमत्तापूर्ण असल्याचे दिसून आले. अमेरिकन बँका क्रमांक दोन वर आढळल्या. त्या ठिकाणी स्पर्धा अतिशय तीव्र असून, भाववाढीचा विपरीत परिणाम एकूण अर्थप्रबंधनावर आढळून आला. आशियाई बँका फक्त शाखा विस्तारात आघाडीवर असून, लाभार्जनक्षमतेत मागे असल्याचे स्पष्ट झाले.

आघाडीवर असलेल्या सर्व मोठया बँकांनी अंशधारकांचा प्रत्यय निधी वाढविला असून, त्या वाढीचे सातत्य कायम राखले आहे. कर्जविषयक धोरणाने आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यात मदत केली आहे, असा दुसरा निष्कर्ष आहे. तीनशे बँकांनी लाभकारकतेचे प्रमाण सतत वाढविले आहे. भांडवल क्षमता व लाभार्जनक्षमता त्यांची उत्तम असून, त्यांना दीर्घकालीन नियोजनाची दृष्टी आहे. मोठया बँकांचा चलअनुपात जास्त असून लहान बँकांपेक्षा त्याचे लाभविषयक धोरण लवचिक आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती अतिशय सुदृढ आहे. आघाडीच्या मोठया बँकांनी कार्यशील पुंजीत सातत्याने दुपटीपेक्षा जास्त वाढ होत राहील, याकडे

लक्ष पुरविल्यामुळे लहान बँकांपेक्षा त्यांची स्थिती निश्चितच चांगली आहे. हा तिसरा निष्कर्ष आहे. या निष्कर्षावरुन आघाडीच्या मोठया बँकांची आर्थिक स्थिती चांगली असून, लहान बँकांना तशी साधता आली नाही, असे आढळून येते. विवेकी प्रबंधनाची स्थिती मोठया बँकांना साधता आली हे प्रबंधनसूत्र लहान व अन्य बँकांनी अंमलात आणायला पाहिजे.

स्टेट बँकेची प्रगती

बँका	भांडवल संपत्ती अनुपात	कर्मचा-यांची संख्या
स्टेट बँक ऑफ इंडिया ग्रुप	१.५२	२,७०,८८४
बँक ऑफ इंडिया	०.७०	४५,७००
सेंट्रल बँक ऑफ इंडिया	१.०९	४५,१५२
बँक ऑफ वरोडा	१.४१	४२,०२९
कॅनरा बँक	१.५१	४६,६४०
पंजाब नॅशनल बँक	०.६७	४४,४०६
सिंडिकेट बँक	१.३१	३५,०००

भारतीय बँकांच्या संदर्भात स्टेट बँक ऑफ इंडिया प्रथम स्थानी असून, जागतिक स्तरावर पहिल्या पन्नासात आहे. या बँकेचा शाखा विस्तार, कर्मचारी संख्या, संपत्ती व लाभार्जनक्षमता अन्य बँकापेक्षा जास्त आहे. १९८५ मध्ये स्टेट बँकेचा क्रमांक ८३ होता आता त्यात सुधारणा आहे. स्टेट बँकेचे कर्जविषयक धोरण स्पृहणीय असून, समाजातील सर्वच घटकांना कर्जाचा पुरवठा केल्याचे दिसून येते. भारतातील अत्यंत लहान गावी स्टेट बँकेची शाखा असून तेथील आर्थिक विकासात तिने महत्वाचे योगदान दिले आहे, याची दखल सर्वेक्षणात घेण्यात आली.

निधीचा कार्यक्षम प्रवाह

स्टेट बँकेच्या अर्थप्रबंधनाची यशस्विता निधीच्या कार्यक्षम प्रवाहात दिसून येते. सुयोग्य अर्थप्रबंधनासाठी निधीत सतत वाढ होत राहणे व त्याचा प्रवाह योग्य रीतीने कार्यान्वित होणे आवश्यक असते. अन्य बँकांच्या लाभकारकतेचा विचार पंजाब नॅशनल बँकेचा लाभ दर २६.०७, तर सिंडिकेट बँकेचा ११.७४ आढळला. पंजाब नॅशनल बँकेने आपली लाभकारकता उर्वरित बँकांच्या तुलनेत वाढविली आहे. बँक ऑफ इंडियाला संपत्तीच्या तरलतेकडे व कर्ज पुरवठा धोरणाकडे लक्ष द्यावे लागेल. या सर्व बँकांना आर्थिक सुदृढता कायम राखण्यासाठी करपूर्व लाभदराच्या वाढीसाठी प्रयत्न करावे लागतील तसेच निधीचा कार्यक्षम प्रवाह कायम राहील व त्यासाठी निधी प्रबंधन व्यवस्था अतिशय उत्तम ठेवणे आवश्यक राहील. कारण निधी प्रवाहावरुनच बँकांची सांपत्तिक स्थिती सुधारत असते. या सर्वेक्षणातून एक बाब सिद्ध झाली की, बँकांच्या आंतरराष्ट्रीय रचनेत आकार व प्रबंधन स्वरुपानुसार भारतीय बँकांनी उंच भरारी मारली असून तिचा वेग कायम ठेवणे आवश्यक आहे.

* * *

औद्योगिक आजारपणाची गंभीर समस्या स्वरुप आणि समीक्षा

आपल्या औद्योगिक व्यवस्थेत एक आंतरविरोधाची स्थिती सध्या निर्माण झाली आहे. दरवर्षी नवीन उद्योगांची स्थापना होत असते. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राचा विस्तार होतो, उद्योगांची संख्या वाढते पण उत्पादनाची पातळी मात्र वाढताना दिसत नाही कारण उद्योगांच्या स्थापनेबरोबर अनेक जुने उद्योग आजारी पडत आहेत त्याचा परिणाम असा झाला की नवीन उद्योगांची स्थापना होऊनही औद्योगिक आघाडीवर अपेक्षित प्रगती होऊ शकली नाही. गेल्या दोन दशकांपासून या समस्येने तीव्र स्वरुप धारण केले आहे.

राष्ट्रीयीकृत बँकांकडून एक कोटी रुपयापेक्षा जास्त कर्ज घेतलेल्या व त्याची परतफेड न करणा-या उद्योगांना तांत्रिक दृष्टीने आजारी उद्योग मानले जाते. लाभांश न देणारा व सतत हानीत चालणा-या उद्योगास आजारी उद्योग समजले जाते. म्हणजेच ज्या उद्योगांची चलदेयता चलसंपत्तीपेक्षा जास्त असते व त्यांना आर्थिक मदतीसाठी केवळ बाहय घटकांवर अवलंबून राहावे लागते. अशा उद्योगांना आजारी उद्योग मानण्यात येते. अशा आजारी उद्योगांची संख्या दरवर्षी सातत्याने वाढत आहे. १९७८ मध्ये २८९ आजारी युनिट्स होते ती संख्या १९८५ मे पर्यंत ८०११० वर पोहचली आहे. अशा उद्योगांवर कर्जाचा भार १९७८ मध्ये ८५८ कोटी रु. होता. आता तो ३०८१ कोटी रु. झाला आहे. रिझर्व बँकेच्या अहवालानुसार गतवर्षात ५४४ आजारी युनिट्स असून त्यात २३३९ कोटी रु. चे कर्ज गुंतून पडले आहे. या कर्जाची परतफेड करण्याची क्षमता आजारी उद्योगांमध्ये नाही. यामुळे उद्योगांचे व्यवस्थापन तर कोलमडतेच पण

एवढा प्रचंड निधी आजारी घटकांमध्ये तुंबून पडल्यामुळे बँक व्यवस्थापनातही गंभीर समस्या निर्माण होतात. कापड ताग व साखर इत्यादी (नागपुरातील १०० वर्षांची एम्प्रेस मील आजारी झाली व बंद पडली त्यामुळे ७,००० कामगारांवर बेकारीचे संकट उभे असल्याची माहिती सर्वांना आहेच) परंपरागत उद्योग आजारी आहेतच पण महत्वाचे व आधुनिक असलेले इंजिनिअरिंग, केमिकल्स, रबर, सिमेंट, इत्यादी उद्योग आजारपणाच्या लाटेत सापडले आहेत. नुकतेच १५ सिमेंट उद्योग आजारी असल्याचे त्यांच्या व्यवस्थापकांनी घोषित केल्याची वार्ता आहे. प. बंगाल, महाराष्ट्र, तामिळनाडू, उ. प्रदेश व गुजराथ या पाच राज्यात हे आजारी उद्योग असून महाराष्ट्र व प. बंगाल या दोन राज्यात ही संख्या सर्वात जास्त आहे.

आजारी उद्योगांची संख्या	**१९७८**	**१९८५**	**१९९०**
लघुउद्योग	२०३२६	७८३६३	
मोठे उद्योग	२८९	१७४७	NA
एकूण	२०६१५	८०११०	NA

गुंतलेले कर्ज कोटी रुपये

लघु उद्योग	२३१	७२९
मोठे उद्योग	८५८	२३५२
एकूण	१०८९	३०७९

वरील तक्त्यावरुन मोठया उद्योंगापेक्षा लहान आजारी उद्योगांची संख्या जास्त दिसून येते मात्र मोठया उद्योगात जास्त कर्ज तुंबलेंले आढळते. समस्येची तीव्रता आकडयांमधून दिसून येते.

गंभीर परिणाम - बेकारीत वाढ

औद्योगिक आजारपणामुळे बेकारीचा प्रश्न अतिशय बिकट झाला आहे. अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे निर्माण झालेल्या एका मोठया उद्योगाच्या आजारपणामुळे ८००० कामगारांवर बेकारीची कु-हाड कोसळते व त्याची झळ ४०,००० अवलंबित व्यक्तींना पोहोचते. या हिशोबानुसार एकूण बेकारांची संख्या कोटीमध्ये जाते. आजारपणाचा बळी कामगारच ठरतो. अगोदरच देशामध्ये बेकारीची समस्या तीव्र आहे त्यात आजारी उद्योगांमुळे भर पडते व आर्थिक विकासाला खीळ बसते. औद्योगिक विकासाचा दर मंदावतो. प्रचंड

भांडवल गुंतवणूक अडवून ठेवली जाते. औद्योगिक उत्पादनात घट होते त्यामुळे वस्तुंची टंचाई निर्माण होते व ग्राहकाला भाववाढीच्या परिस्थितीशी सामना करावा लागतो. रोजगार वाढीच्या ऐवजी रोजगार बुडीची स्थिती अतिशय गंभीर आहे.

उत्पादनाचा दर्जा घसरणे, आर्थिक सत्तेच्या केन्द्रीकरणाचे दुष्परिणाम, उत्पादन क्षमतेचा पर्याप्त प्रमाणात उपयोग न होणे, अदूरदर्शी व्यवस्थापनातून निर्माण होणारी अकार्यक्षमता, बडया उद्योगपतींचे लहरी राजकारण, अशिक्षित व सुशिक्षित बेकारांच्या संख्येत वाढ, आर्थिक बेशिस्तीत वाढ, अर्थ व्यवस्थेवर विपरित परिणाम इत्यादी गंभीर परिणाम उद्योगांच्या आजारीपणाने सहन करावे लागतात.

जबाबदार घटक

प्रमंडळाचे अकार्यक्षम व्यवस्थापन, अयोग्य अर्थप्रबंधन, शासनाचे उत्पादित वस्तूंचे वितरण विषयक सदोष धोरण, गु ंतवणूक धोरणातील बदल, बिघडत चाललेले कामगार-मालक संबंध, निधीचा दुरुपयोग, खर्चावरील नियंत्रणाचा अभाव इत्यादी घटक आजारीपणास जबाबदार आहेत. याशिवाय आजारीपणाची नेमकी कारणे आहेत त्यात बाहय घटकांप्रमाणेच आंतरिक घटकांचा समावेश आहे. तंत्रज्ञान व प्रोजेक्ट प्लॅनिंगमधील चुका, अव्यवस्थित संयंत्र आराखडा, पर्याप्त प्रमाणात न घेतलेली यंत्राच्या भरणपोषणाची काळजी इत्यादींचा परिणाम व्यवस्थापनात सातत्याने अडचणी निर्माण करतो. व्यवस्थापनाची गुणवत्ता कमी असणे, मजूर व्यवस्थापक संबंधातील वाढता ताण, अर्थप्रबंधनातील त्रुटीं, अवक्षयणाची कमी तरतूद, यांचाही आजारीपण निर्माण होण्यात वाटा आहे. वीज, वाहतूक साधने, कच्च्या मालाची टंचाई व बदलत्या किंमती राजकोषीय नीतीतील बदल, आयात-निर्यात धोरणातील बदल इत्यादींचा उद्योगांच्या प्रबंधनावर विपरित परिणाम ब-याच वेळा होतो.

उद्योगांच्या प्रबंधनात आर्थिक अनुपातांचे प्रमाण योग्य नसते तसेच कार्यशील पु ंजीत वाढ करणारे घटकही नसतात. त्यामुळे आर्थिक अडचणीचे निराकरण होत नाही व जबर हानी उद्योगास सहन करावी लागते. नवे तंत्रज्ञान, प्रस्थापित बाजारपेठ, कच्च्या मालाची उपलब्धता, संसाधने, प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळ इत्यादी घटक उद्योगांच्या विकासास आवश्यक आहेत, व त्यांची उपलब्धता असल्यामुळे तीव्र स्पर्धेची स्थिती आहे. त्यात सामना करण्यासाठी सक्षम व्यवस्थापनाची आवश्यकता असते. आजारी उद्योगाजवळ अशा व्यवस्थापनाचा अभाव जाणवतो. संचालक मंडळ या औद्योगिक प्रश्नांची स्वतःच्या राजकीय उद्दिष्टापायी, उकल करीत नाही व त्याचा परिणाम उद्योग आजारपणात दिसून येतो.

उपाययोजना

शासनाने आजारी उद्योग ताब्यात घेणे हा पर्याय असला तरी सरसकट आजारी उद्योगांचे सरकारीकरण करणे शक्य नाही. कारण त्यामुळे नुकसान भरपाई म्हणून बरीच मोठी रक्कम द्यावी लागेल व असे उद्योग वर्षानुवर्ष तोटयात चालतील. यापेक्षा अशा करखान्यांना

पुनर्वसनासाठी शासनाने आर्थिक मदत देउनव व्यवस्थापकांना व्यवस्थापन सुस्थितीत आणण्यास भाग पाडावे. कामगारांचे रोजगार संरक्षणाची हमी शासनाने घेतली पाहिजे. म्हणजे बेकारीची स्थिती निर्माण होणार नाही. आजारी उद्योगांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज पुरवठा वित्तसंस्थांनी करायला पाहिजे व शासनाने कच्च्या मालाच्या पुरवठयांत सवलती व प्राधान्य द्यायला पाहिजे. समान उद्योगाबरोबर विलीनीकरण करणे, शासनाच्या प्रभावी नियंत्रणाखाली व्यवस्थापकांनी उद्योग संचलित करणे, तांत्रिक सेवेची उपलब्धता, विशिष्ट काळाकरिता अशा उद्योगांना एक्साईज डयूटी, विक्रीकर इत्यादी कर भरण्यातून मुक्त करावे, शासनाने आजारपणास जबाबदार असलेल्या कारखान्यांना निरोधक शिक्षा देण्याची तरतूद करावी, मागील थकबाकी बाबत संरक्षण देणे इत्यादी उपाययोजनांमुळे आजारीपणाच्या समस्येची तीव्रता कमी होऊ शकेल. लघुउद्योगांच्या संदर्भात शासन व अर्थप्रबंधन संख्या आणि अधिकोष यांनी सहानुभूतीपूर्ण धोरण अंमलात आणले पाहिजे. त्यांच्या अडचणी प्रामुख्याने आर्थिक व व्यवस्थापकीय स्वरुपाच्या असतात. वरील उपाय योजनांची शासनाने व विशिष्ट उद्योगांच्या व्यवस्थापक मंडळाने अंमलबजावणी केल्यास आजारी उद्योग पुन्हा "पूर्वीच्याच" अवस्थेत येऊ शकतील व कामगारांवरील बेकारीचा दुर्धर प्रसंग टाळला जाऊ शकेल आणि औद्योगिक विकासाला गती येऊ शकेल.

* * *

"व्यवस्थापनात मानवी मूल्यांचे संवर्धन आवश्यक!"

औद्योगिक क्षेत्रात व्यवस्थापनाचे कार्य मूलभूत स्वरुपाचे आहे. आजच्या व्यवस्थापनातील परिस्थिती गुंतागुंतीची होत असून प्रमंडळामध्ये लाभवाढीसाठी, तसेच अस्तित्व टिकविण्यासाठी कंठच्छेदी स्पर्धा भयावह स्वरुप धारण करीत आहे. प्रमंडळाबाहेर व अंतर्गत संघर्षाची स्थिती, व्यवस्थापनातील अप्रगल्भता व शोषणाची स्थिती दर्शविते, जी शंभर वर्षांपूर्वी युरोपीय राष्ट्रांमध्ये होती. आपल्या देशात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर औद्योगीकरणाची प्रक्रिया सुरु झाली परंतु आर्थिक आणि औद्योगिक लोकशाहीपासून आपण काही योजने दूर राहिलो असेच आता वाटायला लागले. आपल्या लोकशाहीचे भवितव्य आर्थिक विकासावर अवलंबून आहे. या विकासाचा आधार औद्योगिक असल्याने शांततेला असाधारण महत्व आहे.

मानवीसंपदा

व्यवस्थापन कार्यक्षम ठेवण्याची जबाबदारी तसेच औद्योगिक शांतता कायम ठेवण्याची जबाबदारी कामगार संघटनांचे नेते यांच्याप्रमाणेच व्यवस्थापक नेत्यांवरही विशेषत्वाने असते. औद्योगिक व्यवस्थापनात मानवी घटकांचा व मूल्यांचा विचार होतो तो विशेष करुन अंमलात आणण्याची आवश्यकता व्यवस्थापकांच्या सतत वाढत जाणा-या संख्येमुळे निर्माण झाली

आहे.

खालील सारणीवरुन हे चित्र अधिक स्पष्ट होईल.

वर्ष	व्यवस्थापकांच्या संख्येची गरज
१९७०-७५	३०८४
१९७५-८०	३०,०००
१९८०-८५	२,५०,०००
१९८५-८९	६,००,०००

(स्रोत-इकॉनॉमिक अँड सायंटिफिक रिसर्च फाऊंडेशन-बी.ई. (८९))

औद्योगिक क्रांतीनंतरच्या संक्रमणकाळात भांडवलशाहीतील आंतरविरोधातून नवीन समस्या निर्माण होत गेल्या. लोकशाहीच्या विकासाबरोबर व्यक्तिस्वातंत्र्याचा उद्‌घोष होत असताना पिळवणुकीतून निर्माण होणा-या नव्या स्वरुपाच्या दास्याचे व संघर्षाचे प्रश्नही तीव्र होत गेले. कायदा आणि सुव्यवस्थेच्या नावाखाली राजकीय सत्तेच्या कक्षा रुदांवत गेल्या, पण त्यात मानवी मूल्यांच्या विचारांना प्राधान्य नव्हते. दुस-या महायुध्दानंतर परिस्थिती बदलत गेली. लोकशाही तंत्राचा उपयोग व्यवस्थापनात करावा, असे मत दृढमूल होत गेले. मानवी संपदेला व्यवस्थापनात महत्वाचे स्थान असून त्याला शास्त्रशुध्द भूमिकेचा केंद्रबिंदू मानू लागले. मानवाचा मानवाशी माणुसकीच्या नात्याने व्यवहार असावा व त्याच्या उच्चतम कौशल्याचा उपयोग व्यवस्थापनात करुन घ्यावा, या सनातन सूत्रानूसार व्यवस्थापक व्यवस्थापन समस्या सोडवू लागले व त्यात त्यांना यश मिळाले.

मानवी संबंध

इंग्लंड, अमेरिकेसारख्या प्रगत देशातून मानवी संबंधाचे संस्थात्मक पातळीवर संशोधन सुरु आहे. राष्ट्रहितास प्राधान्य देणा-या जपानमध्ये उद्योगधंद्यातील मानवी घटकांबद्दल पूर्ण आस्था आहे. भारतात काही मोजक्या उद्योगसंस्था मानवी मूल्यांची कदर करतात, पण एकंदरीत या विषयाबद्दल बरीचशी अनास्था सत्ता स्पर्धेमुळे आढळून येते.

मानवी संबंध हे एक माध्यम आहे. उत्पादन व विक्री वाढीचे उद्‌दिष्ट पूर्ण करण्यासाठी,व्यवस्थापन अधिकारी, कर्मचारी हे ज्या माध्यमातून परस्परांशी आत्मीयतेने सहकार्य करतात त्या संबंधांना मानवीय संबंध असे म्हणता येईल. यशस्वी व्यवस्थापनासाठी बुद्धिमत्तापूर्ण प्रबंधनाची नितांत गरज असते. व्यवस्थापक व्यवसायास गती व जीवन देणारे एक तत्व आहे. त्यांनी आपली भूमिका मानवी संबंधाच्या दृष्टिकोनातून पार न पाडल्यास उत्पादनाच्या साधनांचे उत्पादनात परिवर्तन होऊ शकणार नाही. स्पर्धात्मक अर्थव्यवस्थेत

प्रत्येक व्यवसायाचे यश आणि अस्तित्व दोन्ही व्यवस्थापकांच्या योग्यतेवर व भूमिकेवर अवलंबून असतात. स्थानीय बाजारपेठेवर जागतिक बाजारपेठेचा परिणाम होत असल्यामुळे पूर्वी विक्रेत्यांची बाजारपेठ होती. परंतु तिला ग्राहकांच्या बाजारपेठेचे स्वरुप आले आहे. बाजारपेठेत आत्यंतिक स्पर्धा निर्माण झालेली असल्यामुळे मोठया औद्योगिक उपक्रमाच्या अस्तित्वाला धोका उत्पन्न झाला आहे. स्पर्धेचा अभाव असताना औद्योगिक व्यवस्थापन करणे अवघड नव्हते, पण आता तीव्र स्पर्धेत अस्तित्व टिकवून लाभ प्राप्त करुन द्यायचा हे व्यवस्थापनातील महत्वाचे आव्हान ठरले आहे. शासनाकडून होणारा कडक हस्तक्षेप, निर्बंधांचे जाचक स्वरुप, कच्च्या मालाची कृत्रिम टंचाई, कामगार संघटनेची वाढती शक्ती, किंमतीमध्ये घडून येणारी उच्चावचने बाजारपेठेत सातत्याने बदलणारी परिस्थती, ग्राहकांची संघटना, ग्राहकांच्या आवडीनिवडी, फॅशन्सचा होणारा परिणाम, कार्यशील पुंजीची कमतरता, नवीन आधुनिक स्वरुपाचे तांत्रिक परिवर्तन व त्यातून निर्माण होणा-या बेकारीचे प्रश्न, यामुळे व्यवस्थापनाचे स्वरुप अतिशय वेगवान,गुंतागुंतीचे, नाजुक तसेच, अतिशय आव्हानाचे झाले आहे. परंपरागत पद्धतीचा अवलंब केल्यामुळे पूर्वी व्यवसायात यश मिळत होते, पण आता चित्र आमूलाग्र बदलले आहे, अशावेळी मानवी मूल्यांच्या संवर्धनाची, तसेच व्यवस्थापनात विकास प्रक्रियेची आवश्यकता औद्योगिक क्षेत्राला जाणवते.

मनोधर्माचा शोध

व्यवस्थापनातील सर्वच घटकांमध्ये कार्य करण्याची प्रवृत्ती जागती ठेवण्याचे महत्वाचे कार्य अभिप्रेरणेद्वारे होत असते. मजुरी व वेतनात वाढ, बोनस, रोख बक्षिसे, अतिरिक्त उत्पन्न या आर्थिक प्रलोभनांसोबत प्रगतीची प्रशंसा, कौशल्यास भरपूर वाव, रोजगारीची सुरक्षितता, समान न्याय, उत्तम स्वरुपाची वागणूक इ. स्वरुपातून व्यवस्थापनातील सर्वच घटकांमध्ये कार्य करण्यासाठी एक चैतन्याचे वातावरण निर्माण केले जाऊ शकते, त्यातून व्यवस्थापनकार्य सुलभ होते. उच्चतम मनोबल कायम राखण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे, संघटनेतील आंतरविरोध नाहीसा करुन सहकार्याच्या वातावरणाची निर्मिती, प्रत्येक घटकाच्या कार्यक्षमतेचा अंदाज घेऊन कार्यवाटप, कार्यप्रतिष्ठा, शिस्त, आपुलकीच्या भावनेचे वातावरण इ. स्वरुपात मनोधर्माचा शोध व्यवस्थापकास सहज घेता येतो व त्यातून यशस्वी व्यवस्थापनाची वाट चोखाळता येते.

मानवी मूल्यामध्ये मनोधर्माच्या शोधाबरोबर व्यक्तिमत्व विकास प्रक्रियेचाही समावेश होतो. व्यवस्थापकांच्या क्षमतेचा परिपूर्ण उपयोग व्हावा व त्यातून व्यवस्थापनकार्य, प्रभावीपणे करता यावे, यासाठी ज्ञान, कौशल्य, दूरदृष्टी व संतुलित प्रवृत्ती या कलागुणांचा विकास साधण्याच्या प्रक्रियेचा समावेश व्यवस्थापक विकास संकल्पनेत होतो. व्यवस्थापकांचे मनोबल वाढविणे, सामूहिक पद्धतीने काम करण्याची प्रवृत्ती रुजविणे, संघटन कौशल्य वाढविणे,नवीनतम दृष्टीने विचार प्रक्रियेत अनुकूल बदल घडवून आणणे, अनुकूल वातावरणाची निर्मिती करणे, आपुलकी, नैतिक आदर्शाच्या कल्पनांशी जवळीक साधणे, आकर्षक योजनांकरिता कल्पकतेचा वापर करणे इ. प्रकारचे स्वरुप या प्रक्रियेचे असते. यातून कार्यक्षम व प्रगल्भ व्यवस्थापक तयार होतात.

संघटनेची संस्कृती

प्रत्येक उद्योगाच्या संघटनेला एक संस्कृती असते व असायला पाहिजे. उद्योगाचें नेतृत्व करणारे संचालक, त्याचीं मते व धोरणे, त्यांचा ध्येयवाद, त्यांनी जोपासलेली मूल्ये, त्यांच्या व्यवस्थापकीय जाणिवा, व्यवस्थापकांचा विकास व्हावा व त्यांना योग्यतेनुसार पद मिळावे, जबाबदारी व अधिकार प्राप्त व्हावेत व त्यांनी त्याच दृष्टीने यांचा उपयोग करावा या संदर्भातील संचालकांची विचारसरणी इ. घटकांचा परिणाम होऊन संघटनेची संस्कृती निश्चित होत असते. या संस्कृतीमध्ये मानवी सभ्यता व मूल्यांचा समावेश असायला पाहिजे. आदर्शांच्या कल्पनांचा एक आकृतिबंध असायला पाहिजे. नियमांचा आग्रह पाहिजे पण अतिरेक करता कामा नये. शिस्त,कार्यासंबंधी आस्था, जबाबदारीची जाणीव, अनुकूल वातावरण निर्मिती, इतरांचा सन्मान करण्याची प्रवृत्ती इ. स्थिती व्यवस्थापनात सातत्याने राहील, असे वातावरण संचालक मंडळाने निर्माण केले पाहिजे. दुराग्रह टाळणे, निम्न मनोबलाची स्थिती नाहीशी करणे, याकडेही पुरेसे लक्ष द्यायला पाहिजे. निरोगी स्पर्धेची स्थिती ठेवण्यासाठी व्यवस्थापनाने सतत प्रयत्न करायला पाहिजे. म्हणजे लाभ प्राप्तीबरोबरच उत्तम दर्जेदार वस्तूंचे उत्पादन व वितरण समाजाला व संघटनेला फायदेशीर राहील. व्यवस्थापकीय कौशल्यात वाढ, प्रशिक्षण कार्यक्रमावर भर दिल्यामुळे प्रमंडळाचा व्यवस्थापन विकास चांगल्या दिशेने होऊ लागतो.

सामाजिक दायित्व

सामान्यतः उद्योगपती जास्त लाभ प्राप्तीचे उद्दिष्ट ठेवून व्यापार व्यवसायाचे संचालन करतात. या अतिरिक्त लाभ प्राप्तीमुळेच संघर्ष उद्‌भवतो व तीव्र होतो. याचे कारण सामाजिक जबाबदारीकडे त्यांनी केलेले दुर्लक्ष होय. प्रत्येक व्यवसायाचे लाभमूल्य आहे, तसेच ज्या समाजाकडून त्यात वृद्धी होत असते त्या समाजाप्रती दायित्वाची भावना आज तत्वतः कुणी नाकारु शकत नाही. व्यापाराची मूलभूत प्रेरणा भरपूर लाभप्राप्तीची असली तरी कमी काळात कमी प्रयत्नांनी जास्त लाभ मिळविण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून आता व्यवसाय यशस्वी होऊ शकत नाही. कारण समाजातील ग्राहक अतिशय हुशार, जबबाबदार आणि चोखंदळ झाला आहे, हे व्यवस्थापनाने विसरता कामा नये. व्यवसायाच्या सामाजिक बाजूची पूर्ण उपेक्षा करणे आता कोणत्याच व्यवस्थापनास परवडणारे नाही. उद्योगांचे व्यवस्थापन करताना समाजाच्या गरजा व समाजाचे हित व्यवस्थापकाने लक्षात धेणे आवश्यक आहे. ही जाणीव व्यवस्थापकांमध्ये तसेच उच्चस्तरीय संचालकांमध्ये असायला पाहिजे. यातूनच तीव्र स्पर्धेत यशाची अभिलाषा करता येते. मानवी मूल्यांचा प्रभाव पडायला लागतो. टाटा व बिर्ला बिझिनेस ग्रुप यांनी सामाजिक दायित्व निभावल्यामुळे त्यांच्यातील व्यावसायिक स्पर्धा तीव्र स्वरुपाची होत नाही. नवीन उद्योजकांनी याची जाणीव ठेवायला पाहिजे म्हणजे उपक्रमाची भरभराट होईल व समाजाचा विकास होईल. हे सर्व घडेल, पण लक्षात घेतले तर!

* * *

बँकांच्या लाभकारकतेत लक्षणीय घट

राष्ट्रांच्या आर्थिक जीवनात केंद्रीय अधिकोषांप्रमाणेच व्यापारी अधिकोषाचे मूलगामी स्वरुपाचे महत्वपूर्ण स्थान आहे. म्हणून व्यापारी बँकांच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याची प्रमुख जबाबदारी रिझर्व्ह बॅंकेची केंद्र अधिकोष नात्याने असते. थोडया दिवसापूर्वी रिझर्व्ह बॅंकेचा अहवाल प्रसिद्व झाला. जून ते जुलैऐवजी मार्च ते एप्रिल असे आर्थिक वर्ष ठरवून अहवाल तयार करावयास पाहिजे. कारण ते अधिक सोयीस्कर ठरते. अहवालात मध्यमकालीन ऋणांच्या समस्येसोबतच लाभकारकतेकडे अधिक लक्ष वेधण्यात आले आहे.

लाभकारकतेत घट

बँकांची लाभकारकता कमालीची घसरली असून आर्थिक क्षेत्रात त्याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.७८ व्यापारी बँकांना लाभवाढीचा दर १९८५ मध्ये ८.३ आहे तो यापूर्वीच्या वर्षात २३.४ आणि २४.५ होता तसेच २० राष्ट्रीयकृत बँकांचा लाभवाढीचा दर फारच कमी झाला असून तो २.६ होता. म्हणजेच लाभवाढीच्या दराची स्थिती वाढीच्या दृष्टीने गतीमान असायला हवी होती . ती उलट १९८५ मध्ये फारच कमी झाली. अहवालातील पुढील वाक्य अतिशय बोलके व आर्थिक परिस्थितीवर प्रकाश टाकणारे आहे.

In more recent years the profitability of banks has tended to erode. even when judge in the framework of soical banking.

सर्जनशील कार्यक्षमतेचा अभाव

लाभकारकतेत घट होण्याची काही प्रमुख कारणे आहे. सुयोग्य निधीचे संकलन करुन तो योग्य रीतीने प्रवाहित करण्यास बँका असमर्थ ठरल्या आहेत. खर्च जागरुकतेचा अभाव ,दूरदर्शीपणाचा अभाव, व्यवस्थापन कौशल्याचा अभाव, आणि सर्जनशील कार्यक्षमतेतील मोठया प्रमाणावरील घट या कारणामुळे लाभकारकता घसरत गेली. अग्रीम राशीच्या अल्पवसुलीकडे दुर्लक्ष करण्यात आले. परिणामतः शेती संबधित दिलेल्या अग्रीम राशीपैकी ५०% राशी वसूल झाली नाही. कर्जवसुलीचा एकूण दर ५१% असला तरी प.बंगालमध्ये २८% बिहार मध्ये ३८% आणि ओरिसात ३९% असल्याचे आढळले. त्यामुळे निधी संकलन उद्दिष्टाप्रमाणे होत नाही व पर्याप्त प्रमाणात तो बँकांना प्रवाहित करता येत नाही. ५४४ आजारी युनिटस् असून त्यात २३३९ कोटी रु. चे कर्ज गुंतून पडले आहे. एवढा प्रचंड निधी आजारी घटकांमध्ये तुंबून पडल्यामुळे निधी व्यवस्थापनात गंभीर स्वरुपाच्या अडचणी निर्माण होऊन खुप हानी सहन करावी लागते. अर्थकारणाच्या दृष्टीने ही चिंतेची बाब ठरते.

व्यवस्थापन कौशल्याची निकड

व्यापारी बँकांना लाभकारकतेची उद्दिष्ट पूर्ण करणे आवश्यक आहे ही गरज लक्षात घेऊन लाभकारकतेच्या तीव्र -हासाबद्यल गंभीर स्वरुपाचा विचार उच्च व्यवस्थापन स्तरावर व्हायला पाहिजे. उत्तम कार्यक्षमता, उत्तम व्यवस्थापन कौशल्य व चांगल्या कार्यवृद्वीची बँकांना आज नितांत गरज आहे. बँकांच्या व्यापक प्रमाणावरील शाखांच्या विस्तारामुळे सध्याच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यक्षमतेवर कामाचा फार ताण पडतो. त्यामुळे सर्जनशील कार्यक्षमता तर कमी होतेच पण ग्राहकांना उपलब्ध होणा-या सेवेवर विपरीत परिणात होतो. कर्मचारी संच वाढविणे आवश्यक आहे.

ग्रामीण क्षेत्रातील शाखांचे स्वरुप खर्चांचे व नुकसानीचे असल्याचे आढळून आले ग्रामीण भाग आर्थिकदृष्टया फारसा विकसित नसतोच. त्या क्षेत्रातील लहान व्यवसाय व लघुउद्योगधंदे अधिकोषण लाभकारकतेसोबत सुरक्षितता व रोखता या तत्वाकडे दुर्लक्ष करता येत नाही. बँकांच्या उच्च अधिका-यानी अशा ठिकाणच्या शाखा व्यवस्थापनात योग्य प्रकारची मदत करणे लाभकारकतेकरिता आवश्यक आहे. बँकांची एकूण आर्थिक स्थिती लक्षात घेता व्यवस्थापनदृष्टया तांत्रिक व विवेकी परिवर्तनाची आवश्यकता असल्याचे जाणवते. शाखांचा विस्तार लक्षात घ्यायला पाहिजे. तसेच उद्दिष्टपूर्तीची तंत्रे त्यांना समजावून घ्यायला पाहिजे. वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावरुन बँकांना खर्चासंबंधीच्या निश्चित स्व रुपाच्या नियमपालनात सहकार्य मिळायला पाहिजे. यामुळेच अधिका-यांच्या सर्जनशील कार्यक्षेत्रात वाढ घडून येईल.

उपाययोजना

बँकांच्या उत्पादकतेतील वाढ आणि समाधनाचा कार्यक्रम प्रवाह लक्षात घेता क्षेत्रीय

विकासासाठी निधीचा उपयोग होणे लाभकारकतेच्या दृष्टीने आवश्यक आहे. बँका शासनाच्या व शासन पुरस्कृत प्रतिभुतीमध्ये निधी गुंतवीत असतात. प्रत्यय पुरवठयाच्या २५% हिस्सा प्राधान्य क्षेत्राला आणि आर्थिकदृष्टया मागासलेल्या क्षेत्राला प्रत्यय पुरवठा करण्यांचे बँकांना बंधन आहे. लाभकारकता वाढविण्यासाठी पुरवठयाच्या धोरणात काही बदल करण्याची गरज आहे. असे चक्रवर्ती समितीने पूर्वीच सुचविले होते. त्यांचा विचार व्हायला पाहिजे. प्राधान्य क्षेत्रातील कर्जदाराला वेळेवर व पर्याप्त प्रमाणात कर्जाची आवश्यकता जास्त असते, व्याजदरांच्या स्वस्ततेची नसते याकडे व्यवस्थापनाने लक्ष पुरवायला पाहिजे.

बँका श्रीमंत व्यक्ती, संघटना, उद्योग, फर्म, प्रमंडळांना कर्ज व अग्रीम संदर्भात फार सवलती देत असतात पण राष्ट्रीयीकृत बँकांकडून जास्त सवलतीची अपेक्षा करतात. अशा सवलती बँकांद्वारे देतांना ग्राहकांच्या सेवेवर विपरित परिणाम होतो. मध्यंतरी इंडियन बँकस असोसिएशनने एकच सेवाशुल्क Uniform Serive Charges आकरण्यासंबंधी बँकांना विशेष सूचना केली. त्याकडे बँकांच्या उच्च व्यवस्थापनाने लक्ष द्यावे. सामाजिक दायित्व, भावावाढीची परिस्थिती या संदर्भात खर्च कमी करण्यासाठी केवळ कळकळ दाखवून चालणार नाही तर बँकांच्या पर्याप्त निधी संकलन व प्रवाहासाठी तसेच त्यापासून उत्पन्न मिळविण्यासाठी अंतर्गत व्यवस्थापन क्षमतेच्या सुधारणेसाठी गंभीर प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे.

* * *

"विदेशी व्यापार - धोरणात्मक परिवर्तनाची गरज"

उद्योग, अधिकोष, शेती या क्षेत्रांप्रमाणेच विदेशी व्यापारसुध्दा अर्थव्यवस्थेचे एक महत्वाचे क्षेत्र आहे. विदेशी व्यापाराची स्थिती व स्वरुपाचा देशाच्या आर्थिक विकासावर, कल्याणावर आणि जनतेच्या जीवनमानावर परिणाम होत असतो. उद्योग आणि शेती या दोन्ही दृष्टींनी फारशी अनुकुलता नसतानाही इंग्लंड व जपानने केवळ विदेशी व्यापाराच्या माध्यमातून आपले आर्थिक प्रभुत्व निर्माण केले ही महत्वाची बाब लक्षात घेतली म्हणजे विदेशी व्यापाराचे अर्थकारणातील विशेष स्थान लक्षात येते.

बाजारपेठेचे क्षेत्र विस्तारणे व व्याप वाढणे, रोजगार संधी विस्तृत होणे, मानवी व नैसर्गिक संसाधनांचा उपयोग करुन घेऊन लोकांच्या जीवनमानात वाढ करणे, औद्योगीकरणाचा वेग वाढणे, विभिन्न देशातील जनतेमध्ये सामाजिक व सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करणे, आर्थिक प्रगती करणे इत्यादी स्वरुपाची स्थिती विदेशी व्यापारवृध्दीमुळे निर्माण होत असते.

आयात, निर्यात व पुनर्नियात व्यापार हे तीन विदेशी व्यापाराचे घटक आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने आयात व निर्यात व्यापार वाढविण्याचे प्रयत्न केले. उद्योगांची उभारणी करावयाची असल्यामुळे आयात प्रचंड प्रमाणावर वाढली. त्या मानाने निर्यात व्यापाराची गती मात्र मंदावली. अन्नधान्य, जड यंत्रसामुग्री, पेट्रोल, रासायनिक मूलद्रव्ये, वाहतुकीची साधने, धातु, उत्तम प्रतीचे पोलाद इत्यादी घटकांची आयात सातत्याने वाढत गेली.

औद्योगिक विकासाचे उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेवून राबविण्यात आलेल्या महत्वाकांक्षी कार्यक्रमामुळे आयातीचे स्वरुप उत्तरोत्तर वाढत गेले.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार भारताचा आयात व्यापार ३०,०६३ कोटी रु. असून निर्यात व्यापार १२,५५० कोटी रु.व शोधनाधिक्य ७५१३ कोटी रु. चे आहे. शोधनधिक्य कमी होण्याचे ऐवजी त्यात सतत पडणारी भर आर्थिक विकासाच्या दृष्टीने गंभीर ठरते. पण चिंतेचे कारण नाही. असे रिझर्व्ह बॅंकेने नमूद केले आहे. केवळ निर्यात व्यापाराचा विचार केला तर त्यात होत जाणारी वाढ समाधानकारक असली तरी चित्र अर्थकारणाचे दृष्टीने अजिबात हितावह नाही. तीन दशकेपर्यंत शोधनाधिक्याची स्थिती समजण्यासारखी होती, पण नंतर मात्र धोरणात्मक परिवर्तनाची आवश्यकता भासली, त्याचा नेमका अभाव असल्याचे दिसून येते. भारताच्या विदेशी व्यापाराचे खालील आकडे बोलके आहेत.

	१९६१ को.रु.	**१९७१ को.रु.**	**१९८५ को.रु.**	**१९८७ को.रु.**
आयात व्यापार	१,१४०	१,६३४	१७,१७१	२०,०६३
निर्यात व्यापार	६६०	१,५३५	११,८५५	१२,५५०
शोधनाधिक्य	**(-)**	**४८०**	**(-)९९(-)**	**५३१६**

आपल्या साधनमर्यादेच्या बाहेरचे चित्र यातून स्पष्ट होते. निर्यातीत केवळ २.९ टक्कयाने वाढ होणे, तसेच रुपयाचे अवमूल्यन, आंतरराष्ट्रीय किंमतीतील घट हे सर्व लक्षात धेऊनही निर्यातीचे चित्र बदलणे अपरिहार्य ठरते.

वर्ष	**जगाच्या निर्यातीच्या तुलनेत**	**आयात अनुपात**
१९४९	२.४०	--
१९६१	१.०५	५७.९
१९७१	०.६५	९३.९
१९८१	०.४३	६९.०
१९८७	०.४०	६२.६

वरील सारणीवरुन आयात अनुपाताच्या तुलनेत निर्यात अनुपात कमी असल्याचे निदर्शनास येते. आयातीच्या २/३ स्वरुपात निर्यात व्यापार होऊ शकला नसल्यामुळे त्यातून

विदेशी मदत आणि विदेशी कर्जात झालेली तुफान वाढ शोधनाधिक्यात सातत्याने होणारी वाढ, हे सर्व घटक अपेक्षित आर्थिक विकासातील अडथळे ठरलेत.

आयातीचे चित्र

अमेरिका (१३७१ को.रु.), सोव्हिएट रशिया (१५१३ को.रु.), इंग्लंड (८८६ को. रु.), जपान (१०७० को.रु.), इराक (८८४ को.रु.), इराण (७८३ को.रु.), प. जर्मनी (८०१ को.रु.), फ्रान्स (४१४ को.रु.), ऑस्ट्रेलिया (२७९ कों.रु.), कॅनडा (२५१ को.रु.) व अन्य देश (९६०८ को.रु.) असे आपल्या आयातीचे स्वरुप आहे. पेट्रोलियम व तत्संबंधित वस्तू लोखंड, पोलाद, उत्पादित खते, इंजीनियरिंग व तांत्रिक संदर्भातील वस्तू, कागद व संबंधित वस्तू, रसायने, उपग्रह, उपकरणे इत्यादींची आयात मोठया प्रमाणावर आहे. एकीकडे देशात आधुनिक यंत्रसामुग्रीचे उत्पादन केले जात आहे, तर दुसरीकडे यंत्रसामुग्री, वाहतूक व अन्य साधनांच्या आयातीवर खर्च होणा-या रकमेत प्रचंड वाढ होत आहे. यात आंतरविरोध असला तरी वास्तवता आहे. नियोजनाच्या एकूण कालखंडात भारताने अमेरिकेकडून सर्वात जास्त आयात व्यापार केल्याचे दिसून येते. सातत्याने आयातवृद्धी झाल्यामुळे देशातील ग्राहकांवर किंमतीचा व अप्रत्यक्ष करांचा फार मोठा बोझा पडला. भाववाढ होण्याचे हेही एक कारण आहे.

निर्यात व्यापाराची दिशा

१९५० सालापासून भारताचा निर्यात व्यापार सुरु आहे. प्रारंभी ज्यूट, चहा, कापड, उद्योगातील वस्तू, अन्य देशांना आपल्या देशातून निर्यात होत असते. आता त्यात कच्चे लोखंड, चामडयाच्या वस्तू, तंबाखू, इंजिनीयरिंग वस्तू, कॉफी, अभ्रक, साखर, कापूस, लोह, पोलाद, रसायने, खाद्यपदार्थ यांचा समावेश झाला आहे. इंग्लंड, अमेरिका, जपान, रशिया, पश्चिम जर्मनी, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, सुदान, केनिया, नायजेरिया, झांबिया, पाकिस्तान, बांगला देश, ब्रम्हदेश, श्रीलंका, इंडोनेशिया, नेपाळ, सिंगापूर, इराक इत्यादी देशांना निर्यात होत असते. नियोजनकाळात जपान, प. जर्मनी, फ्रान्स, अरब गणराज्य या देशांशी असलेल्या निर्यात व्यापाराचे परिमाण तर वाढलेच पण त्याचे कार्यक्षेत्रही विस्तृत झाले. भारत अमेरिका यांच्यामध्ये अनेक व्यापारी करार झालेत. अमेरिकेतील बाजारपेठेत भारतीय वस्तू लोकप्रिय झाल्याने निर्यात वृध्दी व्हायला लागली.

प्रारंभी रशियाशी फक्त ११ को.रु. निर्यात होती. नंतर करारसंबंध वाढलेत व ही निर्यात १५५८ को.रु. झाली. निर्यात व्यापाराचे स्वरुप आशिया व आफ्रिका खंडातील देशामध्ये चांगले आहे. तेथील देश आर्थिक विकासाच्या दृष्टीने प्रारंभिक अवस्थेत असल्यामुळे निर्यात मोठया प्रमाणावर सुरु आहे. प्रगत देशांच्या बाजारपेठेत मात्र आपल्या निर्यात वस्तूंना जबर स्पर्धेशी सामना करावा लागत आहे. आणखी काही वर्षानंतर औद्योगिक दृष्टीने प्रगत असलेल्या देशांची बाजारपेठ आपल्याला गमवावी लागेल, अशी चिन्हे दिसू लागली आहेत.

आयात प्रतिस्थापन

वरील सर्व परिस्थितीमध्ये विदेशातून करण्यात येणारी आवश्यक वस्तूंची आयात बंद

करणे हा प्रश्न सोडविण्याचा मार्ग राहू शकत नाही. ज्या वस्तूंची आयात विदेशातून करणे आवश्यक आहे, अशा वस्तूंचे देशातच उत्पादन करणे हाच त्यावरील पर्याय ठरतो. त्यातून आयातीवरील निर्भरता आपोआप कमी होईल. हे सर्व प्रयत्न म्हणजे आयात प्रतिस्थापन होय. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाची पातळी वाढविणे, विदेशी मुद्रेची बचत करणे, जुन्या उद्योगांचे विवेकीकरण करणे, नवीन उद्योगांची स्थापना करणे इत्यादी व्यवस्था या प्रकल्पात कराव्या लागतात. पंचवार्षिक योजनांमधून आयात प्रतिस्थापनेचे प्रयत्न झालेत. लोखंड, पोलाद, वाहतुकीची साधने, डिझेल इंजिन्स, ट्रान्सफॉर्मर्स इ. बाबतीत परिपूर्णता आली आहे पण अन्य वस्तूंच्या संदर्भात आयात प्रतिस्थापनेचे धोरण प्रभावी पद्धतीने अंमलात आले नाही त्याकडे विशेष लक्ष पुरविल्यास आयातीचे प्रमाण कमी होऊ शकेल.

स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन

स्टेट ट्रेडिंग कार्पोरेशनने निर्यात व्यापार वाढविण्यासाठी निर्यात कार्यालये उघडून, प्रचार करुन बरेच प्रयत्न केलेत. आयात व्यापार कमी करण्यामध्ये मात्र त्यांना अपेक्षित यश लाभले नाही. आयात व्यापार सतत वाढतच गेला. कॉर्पोरेशनला लाभ होत असला तरी विदेशी व्यापारात संतुलन साधण्याच्या उद्दिष्टाची पूर्तता करण्यास ते असमर्थ ठरले. वृत्तपत्राकरिता आयात केलेल्या कागदाचे सदोष व्यवहार, अवाढव्य खर्च, लालफीत, वस्तुनिष्ठ धोरणाचा अभाव या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या उणिवा आहेत. त्या दूर करुन कॉर्पोरेशनचे कार्य कार्यक्षम बनविणे आवश्यक आहे.

सुयोग्य धोरणाची गरज

आयात-निर्यात व्यापाराचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर निर्यात संवर्धनासाठी कायम व निश्चित स्वरुपाच्या धोरणाची गरज असल्याचे स्पष्ट दिसून येते. बाजारपेठ संशोधन, लहान राष्ट्रांशी संपर्क, एस.टी.सी. द्वारे निर्यातवृध्दीचे प्रयत्न, वाहतूक सवलती इ. संदर्भात शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. आयात धोरणातील शिथिलता काढून ते अधिक कडक निर्बंधाचे करावयास हवे. वस्तुतः भारतीय उद्योगांनी प्रगतीची वाटचाल करताना अधिक गुणवत्तेने विदेशी प्रमंडळांशी स्पर्धा करण्याची क्षमता पर्याप्त प्रमाणात प्राप्त करावयास पाहिजे होती, पण त्याकडे केवळ अधिक लाभकारकतेमुळे दुर्लक्ष करण्यात आले त्याचा निर्यातीवर प्रतिकूल परिणाम झाला.भारतीय उद्योगांनी तांत्रिकता, उत्पादकता, व्यवस्थापन, कौशल्य यात गुणात्मक वाढ केली पाहिजे. म्हणजे देशांतर्गत व विदेशात प्रामुख्याने आपल्या दर्जेदार वस्तूंना प्रभावी मागणी निर्माण होऊ शकेल.

नवीन वस्तूंकरिता नवीन बाजारपेठा मिळविणे, वस्तूंचा दर्जा वाढविणे, आपल्या वस्तू विदेशातील बाजारपेठांमध्ये लोकप्रिय होण्याकरिता आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात आकर्षक सहभाग देणे, सिंगापूर-न्यूयॉर्क, पॅरिस, लंडन, मॉंट्रिऑल, नैरोबी येथे विक्री केंद्रे स्थापन करणे, लघुउद्योगांना निर्यातीचे स्वरुपात विशेष मदत करणे इत्यादी संदर्भातील प्रयत्नांचे निर्यात संवर्धक धोरण असल्यास अपेक्षित आर्थिक विकासाचा मार्ग सुलभ होऊ शकेल. त्याचीच नितांत आवश्यकता आहे.

* * *

टी. व्ही. उद्योगाकडून स्वस्त किंमतीतील संचांची अपेक्षा

एक दशक असे होते की टी. व्ही. उद्योगात भांडवल गुंतवणूक करायला कोणाला उत्सुकता नव्हती, कारण दूरदर्शनचा विकास नव्हता व विस्तारही नव्हता. नंतर हळूहळू विकासाला प्रारंभ झाला. शासनाचे धोरण बदलले व दूरदर्शनच्या केंद्राचे जाळे विणायला सुरुवात झाली. त्यामुळे टी. व्ही. उत्पादकांनी त्या उद्योगात भांडवल गुंतवणुकीस प्राधान्य दिले व आज तेच क्षेत्र तीव्र स्पर्धेचे झाले आहे.

आधुनिकतेमुळे दूरदर्शनचे महत्व वाढते आहे. मुळातच दूरदर्शन हे मनोरंजनाचे आकर्षक साधन आहे. विविध प्रायोगिक कार्यक्रमामुळे व थेट प्रक्षेपणामुळे ते अधिक आकर्षक बनत आहे. त्याचा प्रसार वाढला आहे. दूरदर्शनचे काही दोष नक्कीच आहेत. तरीही त्याच्या दृक् श्राव्यतेमुळे त्याचा जनमानसावरील प्रभाव वाढतो आहे. टी. व्ही. उद्योगाला यामुळे भरभराटीचे दिवस आले. दूरदर्शन हे जाहिरातींचे विलक्षण प्रभावी माध्यम ठरल्यामुळे अनेक प्रमंडळांची टी. व्ही. वर कार्यक्रम देण्यात तीव्र स्पर्धा सुरु आहे. टी. व्ही. उद्योगाप्रमाणे शासनाचे उत्पन्नही सतत वाढत आहे.

विकासाचा आलेख

या दशकात टी. व्ही. उद्योगाने विशेष प्रगती केल्याचे दिसून येते. प्रारंभीची १०० कोटी रुपयाची गुंतवणूक ६५० कोटी रुपयावर गेली. सतत वाढत्या उत्पन्नाचा व लाभकारकतेचा हा परिणाम आहे. या उद्योगामुळे सामान्यतः एकूण २००० लोकांना (यात इंजीनियर्स, तंत्रज्ञ,

अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश आहे.) रोजगार पुरवठा होतो तसेच टी. व्ही. विक्रेता दुकानांमुळे सामान्यातः पाच लक्ष लोकांना रोजगार संधी प्राप्त होते. आधुनिक तंत्रज्ञान, दूरदर्शन केंद्रांचा विस्तार, शासनाचे उदार धोरण, लोकप्रियता यामुळे या उद्योगाचे उत्पन्न ८० लक्ष रु. वरुन ९० कोटी रु. पर्यंत वाढले आहे. सध्या औद्योगिक क्षेत्रात भरभराटीचा उद्योग म्हणून याकडे पाहिले जाते.

दूरदर्शन केंद्राचा विस्तार

१९५९ मध्ये भारतात दूरदर्शन केंद्राचा प्रारंभ झाला. जर्मनीच्या मदतीने ११२ कोटी रुपये खर्च करुन आधुनिक टी.व्ही. स्टुडिओ उभारण्यात आला आणि अन्य तांत्रिक व्यवस्था पूर्ण करण्यात आली व दिल्ली दूरदर्शन केंद्र सुरु झाले. यासाठी ६.४ कोटी रु. वरुन २३ कोटी रु. खर्च वाढविण्यात आला व दूरदर्शन केंद्राचे जाळे विस्तारण्यात आले.

वर्ष	ट्रान्समिशन सेन्टर	क्षेत्रफळ चौ.कि.मी.	लोकसंख्या (लक्षामध्ये)
१९५९	१	३०.७	१९०.७
१९७२	१	४९.६	३२३.६
१९७३	३	९५.१	४४१.१
१९७५	३	१६५.६	८८४.६
१९७६	-	१७५.४	९११.७
१९७७	५	३१८.५	१२६८.९
१९७८	२	३४१.१	१३६७.९
१९७९	२	३९२.१	१५५६.०
१९८१	१	४३५.३	१६७८.५
१९८२	२१	५८८.८	२९२९.५
१९८३	२	६०५.८	२१००.१
१९८४	१२३	११०९.६	३७४६.९
१९८५	१२	११६२.२	३९५२.९

वरील सारणीवरुन टी. व्ही. केंद्राचे प्रक्षेपण क्षेत्रफळ, केद्रांची संख्या व दूरदर्शनचा लाभ मिळालेली लोकसंख्या याचे चित्र सुस्पष्ट होते. १९८२ पासून टी. व्ही. केंद्राच्या विस्ताराला विशेष वेग आला व त्या दृष्टीने १९८४ मध्ये उच्चांक गाठलेला दिसतो. गतवर्षीच्या तुलनेत त्यावर्षी ३५ टक्केने वाढ झालेली दिसते. १ एप्रिल १९७६ ला दूरदर्शन स्वतंत्र विभाग म्हणून कार्यरत झाले. दूरदर्शनच्या विस्तारासाठी सहाव्या योजनेत ६८कोटी रु. जास्त खर्च करण्यात आले. सातव्या योजनेत ७०० कोटी रु. खर्चाची तरतूद करण्यात आली.

उत्पादनात वेगाने वाढ

शासनाच्या दूरदर्शन विस्तार योजनेचा परिणाम टी.व्ही.उद्योगातील उत्पादन वाढीत दिसून आला.

टी.व्ही.सेटसचे उत्पादन

(आकडे लक्षामध्ये)

वर्ष	कृष्णधवल	रंगीत
१९८०	३.७	-
१९८१	४.४	-
१९८२	५.७	-
१९८३	६.६	०.५
१९८४	१०.०	२.८
१९८५	१२.२	६.०
१९८६ [सप्टें.]	१५.२०	६.०
१९८७	२५.०	१०.०
१९८८	३७.०	१५.०
१९८९	५५.०	२०.०
१९९०	७५.०	२५.०

वरील सारणीवरून भारतातील दोन्ही प्रकारच्या टी.व्ही.सेट्सच्या उत्पादनाची व त्यातील वाढीची स्थिती दिसून येते. १९८४ पासून दोन्ही उत्पादनात विशेष वाढ आढळून येते. रंगीत दूरदर्शन संचांची मागणी वाढल्याने २.८ वरून ६.० लक्षावर उत्पादन झाले. कृष्ण धवल व रंगीत संचांच्या मागणीत तफावत असण्याचे कारण रंगीत संचाची किंमत कृष्ण धवलपेक्षा ३.१२ पटीने जास्त आहे. कृष्ण धवल संचाची २००० रु. ते ४००० रु. व रंगीत संचाची ७००० रु.ते १२२७० रु. किंमत आहे. रंगीत संचाचे तांत्रिक घ + ! [पिक्चर टयूब] आयात केलेले असतात त्यामुळे व विक्रीकर, ऑक्ट्राय, सेन्ट्रल एक्साईज इत्यादी करांच्या ओझ्यामुळे रंगीत संचाच्या किंमतीत वाढ होत जाते.

उत्पन्नात लक्षणीय वाढ

वर्ष	उत्पन्न कोटी रुपये
१९७६-७७	०.८०
१९८१-८२	११.२७
१९८२-८३	१५.८९
१९८३-८४	१९.७९
१९८४-८५	३०.००
१९८५-८६	६०.००
१९८६-८७	९०.००

टी.व्ही. उद्योग अतिशय उत्पन्नदायी असल्याचे वरील आकडेवारी सिद्ध करते. १९८१ पासून उत्पन्न चढत्या पध्दतीने वाढत असून १९८५ मध्ये ते ६० कोटी रुपयापर्यंत पोहोचले. १९७६ ते १९८६ या दशकात उत्पन्नातील वाढ लक्षणीय आहे. शासनाचे विस्तारक दूरदर्शन धोरण,तसेच दूदर्शनवरील खाजगी प्रमंडळांची विविध कार्यक्रमांची शृंखला व त्यांची लोकप्रियता यामुळे टी.व्ही. खरेदी करण्यासंबंधी अनुकूल वातावरणाची निर्मिती झाली. शहरामध्ये टी.व्ही. खरेदीचे प्रमाण वाढत आहे. मागणीत सतत वाढ झाल्यामुळे टी.व्ही. उद्योग उत्पन्नदायी बनला आहे.

स्वस्त दरातील संचांची गरज

टी.व्ही. उद्योगाचे उत्पन्न व लाभ आणि शासनाने टी.व्ही.संचाराचे विस्तारित धोरण लक्षात घेता आता स्वस्त दरामध्ये ग्रामीण जनतेला टी.व्ही. संच उपलब्ध होणे ही गरज होत आहे. त्यासाठी उत्पादन खर्चाकडे लक्ष पुरवून तो कमी झाल्यास स्वस्त किंमतीत टी.व्ही. संचचा पुरवठा करणे शक्य होऊ शकते. टी.व्ही.उद्योग निर्मितीच्या लहान उद्योगांना सवलती देणे,कस्टम डयूटी कमी करणे. हायपॉवर टी.व्ही. कोऑरडीनेशन कमिटीच्या शिफारसी अंमलात आणणे,इलेक्ट्रॉनिक डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन कडून स्वस्त दरात आयातीच्या घटक वस्तू पुरविणे, विदेशी सहभागाचे प्रमाण काही प्रमाणात कमी करणे, पश्चिम बंगाल व ओरिसामध्ये तेथील स्थानिक उत्पादकांकरिता विक्रीकर नसून अन्य प्रदेशातील उत्पादकांकरिता तो अतिशय जास्त आहे. ही स्थिती लक्षात घेऊन विक्रीकरासंबंधी शासनाने सर्व ठिकाणी एकात्म धोरण(युनिफॉर्म पॉलीसी) निश्चित करणे इत्यादी उपाययोजना अंमलात आणल्या तर टी.व्ही. उद्योगाला उत्पन्न व लाभ प्रचंड प्रमाणावर आहेच पण ज्या ग्राहकांमुळे ही स्थिती निर्माण होते.त्या ग्राहकाला आर्थिक समाधान लाभले पाहिजे ही भूमिका महत्वाची आहे. म्हणून कमी उत्पादन खर्चाकडे लक्ष पुरवून स्वस्त दरात टी.व्ही.उद्योगाने संच उपलब्ध करुन देणे ही आजची गरज आहे. टी.व्ही.उत्पादक याकडे लक्ष पुरवितील काय ?

* * *

औद्योगीकरणात विदर्भ मागे कां आहे ?

देशाच्या अर्थव्यवस्थेत मूलभूत स्वरुपाची आणि दूरगामी परिणाम घडवून आणणारी प्रक्रिया म्हणजे औद्योगीकरण होय. औद्योगीकरणाशिवाय आर्थिक विकास घडवून आणता येत नाही. आपल्या देशातील औद्योगीकरणात महाराष्ट्र आघाडीवर आहे. म्हणजेच,पश्चिम महाराष्ट्र औद्योगिकदृष्टया संपन्न बनत आहे. विदर्भाला मात्र अजूनही औद्योगीकरणाचा सूरच गवसलेला नाही. शंभर वर्षांपासून सु रु असलेली प्रसिद्व एम्प्रेस मिल बंद पडली आहे, तर मॉडेल मिल शासकीय आश्रयावर कसातरी तोल सांभाळत आहे. विदर्भात औद्योगीकरणाच्या क्षेत्रातील चित्र उत्साहवर्धक तर नाहीच, उलट चिंताजनक होत चालले आहे. अशी स्थिती निर्माण होण्यास काही महत्वाचे घटक कारणीभूत आहेत.

जोखीम

औद्योगिक क्षेत्रात नव्याने उद्योगांची निर्मिती करण्याकरिता तरुण वर्ग पुढे यावा लागतो. नेमके हेच विदर्भात घडून येत नाही, जोखीम पत्करण्याची वृत्ती अजिबात नसल्यामुळे व केवळ नोकरीला प्राधान्य दिल्यामुळे असे घडत आहे. सामान्यतः नोकरी करावी व ती चांगल्या प्रकाराची असावी, असा दृष्टिकोन बहुतांश सुशिक्षितांमध्ये आढळतो. भांडवल कसे

उभारावे ? गुंतवणूक केल्यावर लाभच होईल काय ? वस्तूंना मागणी किती राहील ? स्पर्धेच्या परिस्थितीत आपला निभाव लागेल काय ? असे विविध प्रश्न प्रारंभीच त्यांच्या मनात निर्माण होतात व त्याची समाधानकारक उत्तरे शोधता न आल्यामुळे नोकरी हाच पर्याय केवळ शिल्लक राहतो.

मुळातच धाडसाची व जोखीम स्वीकारण्याची वृत्ती उद्योगाकरिता आवश्यक असते. त्या जिद्दीतून काम तत्परतेने करण्याची स्थिती निर्माण होते. कामाचा आवाका वाढतो व कर्तृत्वातून उद्योग यशस्वी होतो. आजचा पदवीधर ब-याच अंशी या दृष्टीने उदासीन आहे. याला पुस्तकी शिक्षणही कारणीभूत आहे. शिक्षणातून औद्योगिक महत्व, त्याचे लाभ व आवश्यकता इत्यादी प्रयोगातून पटवून द्यावयास पाहिजे. नेमका त्याचाच अभाव आहे. वाणिज्य अभ्यासक्रमात औद्योगिक अर्थशास्त्र, व्यवसाय-प्रशासन-प्रबंधन-संघटन इत्यादी विषय असूनही, त्यांच्या प्रात्यक्षिक प्रयोगाचा पूर्णतः अभाव आहे. त्यामुळे उद्योगाची रचना कशी असते, त्याचे स्वरुप किती विस्तारित असते, त्याच्या जडणघडणीतील भागीदार घटक किती आणि कसे प्रयत्नांची पराकाष्ठा करतात आदी बाबी प्रत्यक्ष पाहण्याचा व अभ्यास करण्याचा योग विद्यार्थ्यांना कधीच येत नाही. त्यामुळे हे आपले क्षेत्र नाही असा ते समज करुन घेतात.

नोकरी

आजच्या शिक्षणाने विद्यार्थ्यांना स्वावलंबी करण्यापेक्षा परावलंबी व नोकरीगामी केले आहे. स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून काहीतरी लहान व्यवसाय करण्याची मनाची तयारी अनेकांची नसते. उद्योगासाठी जिद्द, काम करण्याची धडपड व सातत्य, विशिष्ट ध्येय, साधनांचा योग्य उपयोग करुन घेण्याची तयारी इत्यादी गुण उद्योजकामध्ये असणे आवश्यक असते. विदर्भातील उद्योजकांत या गुणांचा काही प्रमाणात अभाव आढळतो. विदर्भ पूर्वीपासून शेतीदृष्टीने संपन्न राहिला आहे. त्यामुळे वृत्तीने हळूहळू आळशी बनला. शेती गेली, तर नोकरी करु, पण स्वतंत्र व्यवसाय करणार नाही, हा येथील बाणा ! त्यामुळे व्यवसाय करण्याची वृत्ती विदर्भात फोफावलीच नाही. एकदम मोठया उद्योगाची उभारणी केली पाहिजे असे नाही. प्रारंभी एखाद्या लहानशा दुकानापासून प्रारंभ करावयाचा असतो. पण नोकरीतील लाचारी परवडेल, स्वाभिमानाचा व्यवसाय नको अशी स्थिती दुर्दैवाने दिसून येते. अर्थात नोकरीमध्ये पगाराची शाश्वती असते, काम व अधिकार कमी असतो, जिद्दीची गरज नसते. त्यामुळे नोकरीचे आकर्षण जास्त राहणे स्वाभाविक आहे.

भांडवल

उद्योग किंवा व्यवसाय करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असते. स्वतः जवळील पैसा किंवा कर्जाद्वारे भांडवलाची उभारणी होत असते. भांडवल उपलब्ध करुन देणा-या संस्था हिरिरीने समोर येत नाहीत. त्यातही ज्या संस्था कर्ज देतात त्यात तांत्रिकता व विलंब इतका

जास्त असतो की, कर्ज नको व उद्योगही नको असे म्हणण्याची पाळी येते. त्यामुळे उद्योगांच्या उभारणीत अडथळे उत्पन्न होतात. अनेक उद्योग भांडवलाच्या अभावी सुरुच होऊ शकले नाही, असे आढळते. उपलब्ध उद्योगांना वेळेवर अर्थप्रबंधन होत नाही. त्यामुळे उद्योग आजरी पडतात. एम्प्रेस मिल व मॉडेल मिल हे दोन मोठे उद्योग आजारी आहेत, यातून परिस्थितीचे गांभीर्य सहज लक्षात येऊ शकते. वित्त संस्थांचे अकुशल व्यवस्थापन विदर्भात उद्योगवाढ न होण्यास ब-याच अंशी कारणीभूत ठरले आहे.

नियोजन

उद्योगांचे यश नियोजनात असते. ब-याच ठिकाणी उद्योग व्यवस्थापनात नियोजनाचा अभाव आढळतो. आपला उद्योग लहान असो किंवा मोठा असो, त्याचे व्यवस्थापन कसे राहणार, लाभ किती मिळणार, त्याचा विस्तार कसा होणार, विक्रीच्या उद्दिष्टात कशी आणि किती वाढ होणार, स्पर्धा कशी टाळता येईल, जाहिरातीतील आकर्षकता इत्यादी संदभात कोणताही ठोस विचार उद्योजकांमध्ये आढळून येत नाही. बहुतांश तरुण उद्योजकांशी बोलताना असे आढळून आले की, थोडीफार विक्री वाढविली की झाले ! जास्तीचा विचार कशाला करायचा! ठोस योजना नसल्यामुळे आपण मागे पडत जाऊ असाही विचार त्यांच्या व्यवस्थापनात तरळत नाही, हे विशेष.

अल्पसंतुष्टता

लघुउद्योगांचे व्यवस्थापन करणा-या उद्योजकांमध्ये अल्पसंतुष्टता आढळते. थोडा लाभ मिळाला, विक्रीचे उद्दिष्ट पूर्ण झाले की यांना अतिशय समाधान वाटते. ही बाब चांगली आहे की, व्यवसाय लाभकारक आहे. पण त्याचबरोबर विक्रीचे उद्दिष्ट वाढविणे व व्यवसायाचा विस्तार करणे आवश्यकच असते. लहान उद्योगातूनच मोठा उद्योग साकारतो, हे विसरता येत नाही. तसेच, आजची स्थिती चांगली असली तरी ती कायम राहीलच असे नाही. स्पर्धा तीव्र होतील, वस्तूंची मागणी कमी होऊ शकेल, आयातीत अडथळे येऊ शकतील - अशा स्वरुपाची कोणतीही विपरीत स्थिती येऊ शकते. म्हणून आहे त्यात समाधान न मानता व्यवसायाचा अधिक विस्तार करणे आवश्यक आहे. त्यातूनच औद्योगीकरणाची प्रक्रिया विस्तारते. काही लघुउद्योजक विकास करण्याच्या धडपडीत आहेत. पण त्यांची संख्या कमी आहे.

ब-याच लघुउद्योजकांचे श्रीमंत बनण्याचे स्वप्न असते. थोडा लाभ मिळताच व जास्त कर्ज मिळताच तो नवी कोरी मोटारगाडी विकत घेतो. ही खोटी शान पुढे त्याला महागात पडते. हाच पैसा त्यांने उद्योगात गुंतविला तर त्या क्षेत्रात तो अधिक लाभ प्राप्त करु शकतो. मोठया कर्जातून चैनीच्या वस्तूंची खरेदी करणे व चुकीचे प्राधान्य देणे यामुळे धंद्यातील गरजांकडे दुर्लक्ष होऊन कार्यशील भांडवलाचा अभाव निर्माण होतो. ही उद्योग विस्तारातील सर्वात मोठी अडचण आहे. यामुळे उद्योग आजारी पडतो, पण हे लक्षात यायला फार उशीर झालेला असतो.

नेतृत्व

पश्चिम महाराष्ट्राला किर्लोस्कर, वालचंद हिराचंद, गरवारे, चौगुले यांच्यासारखे सचोटीचे व कर्तृत्वसंपन्न औद्योगिक नेतृत्व लाभले व त्यामुळे त्या भागात प्रचंड प्रमाणात औद्योगीकरण झाले. तसे औद्योगिक नेतृत्व विदर्भाला लाभलेच नाही. एम्प्रेस मिल शतकापासून कार्यरत होती, पण त्यांनी औद्योगीकरणाला नेतृत्वाची दिशा कधीच दिली नाही. वास्तविकपणे श्रीमंत शेतकरी व व्यापारी यांची विदर्भात कधीच वानवा नव्हती. कापूस पुण्यामुंबईच्या कापडगिरण्यांना जातो, तसेच येथील प्रसिद्ध संत्री पश्चिम महाराष्ट्रात जातात. पण येथे मात्र कापडगिरण्यांचा विस्तार झाला नाही किंवा ऑरेंज ज्यूस फॅक्टरी मोठया प्रमाणावर निर्माण झाल्या नाहीत. मोठा उद्योजक नेतृत्वाच्या दिशेने विदर्भात निर्माण झाला नाही, ही औद्योगीकरणातील शोकांतिकाच होय.

राजकारण

विदर्भ उद्योगक्षेत्रात मागे राहण्यामध्ये सर्वात महत्वाचा घटक राजकारण हा आहे. महाराष्ट्रात उद्योगांसाठी परवाने देत असताना ते नेमके पश्चिम महाराष्ट्राकडेच जातात, विदर्भाकडे येत नाही हे सर्वांना विदितच आहे. राजकारणाने सर्व क्षेत्र पोखरल्या गेले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील खासदार, आमदार, नेते सर्वजण आपल्या भागात कारखाने आणण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. विदर्भात याबाबतीत पाहिजे तेवढे प्रयत्न अजिबात घडून येत नाहीत. विदर्भाला जणू काही स्वतंत्र अस्मिताच नाही अशी स्थिती आढळते.

पश्चिम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयातील माणूस स्वतःच्या निवासी भागासंबंधी अतिशय अभिमानी असल्याचे दिसून येते. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, नगर, नाशिक, जळगाव या भागातील राजकारणी नेते व सामान्य माणसे आपापल्या गावांबद्दल व जिल्हयाबद्दल एक अभिमान बाळगून आहेत. त्यामुळे आपल्या भागात कारखाना आलाच पाहिजे व विकास झालाच पाहिजे ही जाणीव आणि जिद्द राजकीय पुढा-यांमध्ये व सामान्य जनांमध्ये अतिशय तीव्र स्वरुपात आहे. अशी तीव्रता विदर्भातील नेत्यांमध्ये व सामान्यजनांमध्ये दुर्दैवाने जाणवत नाही. याचा परिणाम विदर्भातील औद्योगीकरणावर न झाला तरच नवल !

विदर्भातील औद्योगीकरणाचा वेग अतिशय मंद असण्याला वरील परिस्थिती कारणीभूत आहे. त्यामुळे विदर्भ विकासाच्या बाबतीत मागे आहे. अर्थात जे लघुउद्योजक आज कार्यरत आहेत. त्यांच्यापैकी काहींनी प्रशंसनीय व्यवस्थापन करुन प्रगती केल्याचे निश्चित दिसत आहे. पण हे प्रमाण अल्प स्वरुपाचे आहे. विदर्भातील औद्योगीकरणाच्या मंद स्थितीमुळे बेकारी जास्त आहे. औद्योगीकरणाशिवाय असे प्रश्नं सुटू शकत नाहीत. नवीन औद्योगिक नेतृत्व समोर यायला पाहिजे आणि विदर्भाची अस्मिता जागवून राजकारण व्हायला पाहिजे तरच विदर्भातील उद्योग व अन्य क्षेत्राच्या विकासाची व संपन्नतेची आशा करता येईल.

* * *

निवडणुका आणि काळा पैसा

निवडणुकांमध्ये काळ्या पैशाचे पांढ-या पैशात परिवर्तन करण्याची मोठी नामी संधी उपलब्ध होत असते. निवडणुका ही आता काहींना पैशाची लढाई झाली असल्यामुळे प्रचंड प्रमाणावर उधळपट्टी करण्यात येते. पोस्टर्सची छपाई व वितरण, जीप, अम्बसॅडर्स, स्कुटर्स, मोटार सायकल, सभांचा खर्च, लोकांना द्यावयाच्या वस्तू आणि अन्य अशा स्वरुपात निवडणुकीच्या खर्चाची विभागणी होत असते. या प्रत्येक घटकावर जितका जास्त खर्च होईल व प्रलोभने जास्त दाखविता येतील, तितकी निवडणुकातील यशाची खात्री मिळत असल्यामुळे काळा पैसा खर्च करुन त्याचे परिवर्तन केले जाते. म्हणून काही राजकारणी निवडणुकांच्या वेळी तस्करांशी संपर्क राखून असतात. त्यांना सवलती दिल्या जातात. ब-याच वेळा तस्कर निवडणुकाही लढवितात, असे चित्र पाहावयास मिळते. विशिष्ट पक्षाकडे मात्र अतिशय तुटपुंजी साधने, असे विषम दृश्य यामुळे दिसते. काळ्या पैशाचे परिवर्तन पांढ-या पैशात होत असले तरी त्यामुळे त्या प्रक्रियेला पूर्णविराम मिळत नसतो. हे सर्व होत असताना काळ्या पैशाच्या निर्मितीचे व्यवहारही तेवढयाच वेगाने घडत असतात.

काळा पैसा व त्याची रुपे

काळा पैसा म्हणजे नोंद न झालेली रक्कम. ज्याबद्दल पावती नाही, प्रविष्टी नाही, लिखित स्वरुपात हिशोब नाही असा पैसा म्हणजे काळा पैसा होय. पत्रमुद्रेप्रमाणेच प्रामुख्याने सोने, चांदी, हिरे, शेअर्स, इमारती, प्लॉटस, फ्लॅटस, मोटारी, परदेशी सुखसोयींच्या वस्तू, घडयाळी, टी.व्ही. टेपरेकॉर्डर, व्ही.सी.आर. इत्यादी स्वरुपात अस्तित्वात असतो. काळा पैसा सतत व्यापारी व्यवहारात फिरता राहात असल्यामुळे त्याचे आगणन करणे कठिण आहे. १९७० मध्ये काळया पैशाचे अस्तित्व शोधून काढण्यासंबंधी सेवानिवृत्त न्यायाधीश बांछु यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीच्या मते त्यावेळी १४०० को.रु. काळा पैसा असावा, असा अंदाज होता. काळया पैशाचे आगणन एकूण राष्ट्रीय उत्पादकाचे (Gross National Product) प्रतिशत प्रमाणावरुन केले जाते. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक फायनान्स अॅन्ड पॉलिसी (NIPFE) दिल्ली या संस्थेच्या वतीने काळया पैशासंबंधी संशोधित अहवाल लवकरच प्रसिध्द होणार आहे.

१९८० मध्ये १८००० को.रु., तर १९८८ मध्ये २२००० को.रु. काळा पैसा असावा असे अर्थतज्ञांचे मत आहे. अर्थमंत्रालयाचा आर्थिक व्यवहार विभाग व रिझर्व्ह बँयांच्या आर्थिक सर्वेक्षणात काळया पैशासंबंधीचा अहवाल आहे पण आकडेवारी दिलेली नाही. काळया पैशाची प्रत्यक्षात गणना करणे फार कठिण असते, फक्त अंदाज करता येतो.

करबुडवे आणि तस्कर

काळया पैशाचा प्रवाह अव्याहत सुरु ठेवणा-या लोकांमध्ये करबुडव्यांचा समावेश होतो. आयकर अधिनियमात परिवर्तन केल्यानंतरही कर आकारणी व करवसुलीतून बडे उद्योगपती, व्यापारी, सिनेनट, तस्कर, श्रीमंत लोक सुटतात, ही चिंतनीय स्थिती आहे. प्रसिध्द आर्थिक सल्लागार एल.के.झा यांनी नुकत्याच केलेल्या खालील विधानातून हे चित्र अधिक स्पष्ट होते. " कर बुडविण-यांना पळवाटा शोधून काढता येऊ नये म्हणून आपल्या करांच्या संबंधित कायद्यामध्ये अनेकविध सुधारणा केल्या आहेत. तरी देखील मोठे व्यापारी (मोठया शार्क माशाप्रमाणे) यातून पळवाटा शोधतात आणि लहान माणसे पकडली जातात. यामुळे काळया पैशाचे व्यवहार मात्र अधिक वाढतात. हे स्पष्ट करताना मला खेद वाटतो."

समाजवादी अर्थव्यवस्थेत नियंत्रणे आणि निर्बंध आवश्यक असतात. आपल्या देशात मिश्र अर्थव्यवस्था असल्यामुळे वस्तुनिर्मिती व पुरवठा यावर निर्बंध आहेतच. नवीन उद्योगांकरिता लायसन्स , परमिट, विशिष्ट कोटा, प्रमाण आवश्यक आहेत. या पध्दतीतून प्रारंभ झालेले उद्योग सुरक्षित स्वरुपात कार्यरत असतात. यातील काही उद्योगांचे व्यापारी वस्तूंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन काळयाबाजाराची स्थिती निर्माण करतात व प्रचंड प्रमाणावर पैसा कमवितात. उद्योग प्रारंभाच्या प्रक्रियेत, यश संपादन करण्यासाठी, प्रत्येक पातळीवर भ्रष्टाचार केला जातो. यात नोकरशहा, राजकारणी नेते यांचाही काही प्रमाणात समावेश असतो. यामुळे हे तीनही घटक काळया पैशाची निर्मिती करण्यास कारणीभूत

असतात. आयात व्यापारावर कडक निर्बंध आहेत, ते काही प्रमाणात पाळले जातात, पण बहुतांश प्रमाणात, निर्बधातून पैसे देऊन सुटका करुन घेण्यात येते. नियंत्रण व निर्बधांच्या कडक जाचातून चोरटा व्यापार वाढीस लागतो. पूर्वी सोन्याची चोरटी आयात होत होती पण आता चैनीच्या वस्तूची मोठया प्रमाणावर चोरटी आयात होते. या चोरटया आयातीतून काळया पैशाचे प्राबल्य प्रचंड प्रमाणात वाढत जाते. काळा बाजार करणा-या व्यापा-यांसोबतंच कस्टम अधिकारी व यंत्रणा, पोलिसयंत्रणा, या कार्यात सहभागी असल्याचे आढळून येते. म्हणूनच त्यावर कारवाई होत नाही. नुकतेच गाजलेले व न्यायालयाने अवैध ठरविलेले स्वराज्य पॉल शेअर्स विक्रीचे प्रकरण म्हणजे भ्रष्टाचाराचे बोलके उदाहरण आहे. सिनेउद्योगामध्ये अनेक सिनेनटांकडे आयकराची वसुली बाकी आहे. सिनेनट, दिग्दर्शक, निर्माते काही प्रमाणात रीतसर पैसा (White money) आणि काही काळा पैसा (Black money) अशा पध्दतीने प्रारभांपासून अखेरपर्यंत देण्याधेण्याचे व्यवहार करीत असतात. सुवर्ण व हिरे यांची बाजारपेठ ही तर काळया पैशाची पारंपारिक बाजारपेठ आहे. हे स्वरुप अजूनही कायम आहे.

भयंकर दुष्परिणाम

काळया पैशाने आज देशात समांतर अर्थव्यवस्था निर्माण केली आहे व ती अर्थव्यवस्थेला घातक ठरणारी आहे. समांतर अर्थव्यवस्थेमुळे आर्थिक सत्ता विशिष्ट लोकांच्या हाती जाते व ती हुकूमशाही व्यवस्थेत परिवर्तीत होण्याचा धोका असतो. प्रचलित व्यवस्थेवरील विश्‍वास काळया पैशामुळे ढासळत जातो. विकासाचा वेग मंदावत जातो. भाववाढ प्रंचड प्रमाणावर होते. चोरटा व्यापार करणा-या लोंकांकडे संपत्तीचे विशाल प्रमाणावर केद्रींकरण होते व समाजात आर्थिक विषमता तीव्रतेने वाढत जाते. करांची बंधने जाचक केल्यामुळे प्रामाणिकपणे कर देणा-या लोकांवर विनाकारण ताण पडत जातो. काळया पैशाच्या प्राबल्याचा बचत व विनियोगावर अनिष्ट परिणाम होतो आणि बचतीचा प्रवाह उत्पादक कार्यऐवजी अनुत्पादक कार्याकडे वळतो. यामुळे दारिद्र निर्मूलन, रोजगार निर्मिती, वस्तूंचा योग्य दरात पुरवठा, शेती व औद्योगिक विकास इत्यादी आर्थिक उद्‌दिष्टे पूर्ण करण्यास अडथळे निर्माण होतात व ती पूर्ण होत नाहीत. हे भयंकर दुष्परिणाम लक्षात घेता काळा पैसा हा अर्थव्यवस्थेला कॅन्सरसारखा भासतो. असामाजिक तत्वांना काळा पैसा प्रतिष्ठा देतो, त्यामुळे सामाजिक व सांस्कतिक मूल्यांचे तसेच नीतिनियमांचे अवमूल्यन व्हायला लागते. लहान व्यवहारामध्ये ही भ्रष्टाचाराची बीजे फोफावतात. अनीती, अत्याचार, आळस, अकार्यक्षमता इत्यादीचे प्राबल्य समाजात वाढत असते. आज ही सर्व परिस्थिती मोठया प्रमाणात आढळून येत आहे. एकूण सामाजिक दुरावस्था वाढत आहे. काळया पैशाच्या निर्मितीला व वाढीला शासन प्रतिबंध घालू शकले नाही, हेच शासनाचे फार मोठे अपयश आहे.

* * *

लोकसंख्या : अर्थकारणातील प्रश्नचिन्ह !

८३ कोटी, ८२ लक्ष, ९२८९४ !

भारताची लोकसंख्या !

देशाच्या अर्थकारणातील एक भयानक प्रश्नचिन्ह !

या प्रश्नचिन्हातून निर्माण होणारे समस्यांचे न थांबणारे दुष्टचक्र !

दूरदर्शन वरुन देण्यात येणा-या लोकसंख्येच्या आकडयांची विश्वसनीयता लक्षात घेऊन विचार केल्यास लोकसंख्येच्या ज़बरदस्त वाढीची कल्पना येते. दर दीड सेकंदाला एक मूल याप्रमाणे प्रतिदिवशी ४८००० ची भर लोकसंख्येत पडत असते त्यामुळे दरवर्षी देशाची लोकसंख्या १ कोटी ५० लाखांनी वाढत असते. या आकडेवारीत दिवसागणिक भर पडत आहे.

देशासमोर राजकीय, सांस्कृतिक, व धार्मिक समस्या अतिशय तीव्र होत असतांना अर्थकारणात लोकसंख्येची समस्या हा अत्यंत महत्वाचा यक्षप्रश्न बनला आहे. ही समस्या प्रामुख्याने आर्थिक स्वरुपाची असली तरी या समस्येचे राजकीय आणि सामाजिक पैलू सुध्दा महत्वाचे आहेत. समाजाचे आर्थिक जीवन, आर्थिक कल्याण व यातून देशाचा आर्थिक विकास या तीनही बाबी लोकसंख्येशी निगडित आहेत. पाश्चात्य विकसित राष्ट्राप्रमाणेच, भारताच्या बाबतीत, पुरेसा आर्थिक विकास झाल्यानंतर जन्मदर कमी होईल व लोकसंख्या आपोआप आटोक्यात येईल, असे म्हणता येणार नाही. वाढती लोकसंख्या हा अर्थकारणातील अडथळा आहे. लोकसंख्या अशीच वाढत राहिल्यामुळे बेकारी सारख्या समस्या अधिक तीव्र

बनत जातात. त्यामुळे लोकसंख्येच्या समस्येची उपेक्षा करण्याची चैन आपल्या देशाला अजिबात परवडू शकत नाही.

जागतिक पटलावर

जगाच्या वाढत्या लोकसंख्येत चीन पहिला व भारत दुस-या क्रमांकावर असला तरी सध्याचा वेग लक्षात घेता २००१ मध्ये भारत पहिल्या स्थानावर राहील असे दिसते. येत्या दोन दशकात भारताची लोकसंख्या आणखी झपाट्याने वाढण्याची संभावना आहे असे विश्व बँकेच्या अहवालात नमूद केले आहे. नेपाळ व ऑस्ट्रेलियाच्या एकूण लोकसंख्येच्या बरोबरीने भारताची लोकसंख्या वाढत आहे. तर युरोप आणि रशिया मध्ये लोकसंख्या वाढीचा दर दिवसेंदिवस कमी होत आहे. इ.स.२०२५ मध्ये जगाच्या एकूण लोकसंख्येतून त्याची लोकसंख्या १५ % ने कमी होईल. प्रकाशित अहवालानुसार १९९० पर्यंत जगाची लोकसंख्या ५.३ खर्व होईल. या वाढत्या संख्येत आशिया खंडाचे ५८ % योगदान आहे. त्यात चीन आणि भारताचा क्रमांक वरचा आहे.

लोकसंख्या आगणन

शिरगणतीचे वर्ष	एकूण लोकसंख्या (आकडे कोटीमध्ये)
१९५१	३६.१०
१९६१	४३.९१
१९७१	५४.८२
१९८१	६८.५२
१९९०	८३.८२
१९९१	८५.४२ (संभावित)

स्वातंत्र्योत्तर काळात लोकसंख्या वाढीचा वेग आश्चर्यजनक आहे. प्रत्येक शिरगणतीच्या वेळी लोकसंख्या वाढीचा वार्षिक दर सरासरी दुपटीने वाढत होता. लोकंसंख्येची घनता दर चौरस किलोमीटर मागे ४३२ असल्याचे आकडेवारी दर्शविते.

नियोजनकाळात मृत्युदरात घट होत गेली. पूर्वी रोगांच्या साथीमुळे हजारो लोक मृत्युमुखी पडत असत. आता वैद्यकीय संशोधन, प्रगती, उपकरणे, आणि साधने यामुळे रोगांचे स्वरुप नियंत्रित झाले व मृत्युची संख्या कमी झाली .

निर्वासितांचे लोंढे

देशाची १९४७ मध्ये फाळणी झाल्यापासून निर्वासितां चे लोंढे भारतात यायला सुरुवात

झाली. पाकिस्तानातून लक्षावधी नागरिकांचे आगमन झाले व त्यांचे शासनाने पुनर्वसन केले. बांगला देश निर्माण झाल्यावर पुन्हा निर्वासित यायला लागले. निर्वासितांची हजारोंची वाढती संख्या ही आसामची फार मोठी समस्या आहे. श्रीलंकेच्या तामिळ प्रश्नांमुळे निर्वासितांची संख्या वाढली आहे. ब्रम्हदेश, नेपाळ मधून निर्वासित येतच असतात. निर्वासितांची वाढत जाणारी आवक लोकसंख्येच्या प्रश्नाचे गांभीर्य वाढविण्याकरिता नेहमीच कारणीभूत ठरली आहे.

वाढत जाणा-या जन्मदरामुळे लोक संख्या वाढत जाते. या जन्मदराचा संबंध दारिद्र्याशी आहे. निम्नस्तरावरील राहणीमान, निकृष्ट आहार यामुळे जन्मदर जास्त राहतो व त्यांचा सहसंबंध असतो हे आता सिध्द झाले आहे. " लेकुरे उदंड जाहली, तो ते लक्ष्मी निघोनि गेली " असे समर्थ रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच लिहून लोकसंख्या वाढीने दारिद्रयवाढ कशी होते हे स्पष्ट केले.

देशातील ४३.२ % लोकसंख्या दारिद्र्य रेषेवरील जीवन जगत आहे. आर्थिक विकास घडून येत असला तरी त्याचा लाभ कारखानदार, व्यापारी, व्यावसायिक, सरकारी अधिकारी व राजकीय पुढारी यानांच सर्वांत जास्त होतो. त्यामुळे आर्थिक विषमता वाढते. गरीबांना विकासाचे लाभ न मिळाल्यामुळे त्यांचे राहणीमान सुधारण्याऐवजी घसरत जाते. मृत्यू येत नाही म्हणून नकोसे असले तरी जीवन जगण्याचा प्रसंग त्यांच्यावर येतो. वाढत्या दारिद्र्यामुळे लोकसंख्या पुन्हा वाढत जाते.

बेकारीची तीव्रता

वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणाम तेवढेच तीव्र स्वरुपाचे व अन्य समस्या वाढविणारे आहेत. रोजगार संधी उपलब्ध न झाल्याने तसेच शेतीवर लोकसंख्येचा भार वाढल्यामुळे ग्रामीण क्षेत्रात बेकारी वाढत जाते. रोजगार मिळविण्यासाठी दरवर्षी खेडयातून असंख्य स्त्री पुरुष शहरे आणि महानगरांचा आश्रय घेतात. हा प्रवाह अविरत सुरु असूनही ग्रामीण बेकारी व अर्धबेकारीची तीव्रता वाढत आहे. रोजगार नाही म्हणून उत्पन्न नाही व नियमितपणे उत्पन्न न मिळाल्यामुळे केविलवाणे जीवन जगणा-या असंख्य व्यक्ती खेडयामध्ये आढळतात. औद्योगीकरणाचा वेग कमी असल्यामुळे तसेच आर्थिक असमतोल असल्यामुळे शहरी भागातही बेकारी तीव्र स्वरुपात आढळून येते. सुविद्य, प्रशिक्षित, कुशल तसेच तंत्रज्ञान आत्मसात करुन घेतलेले बुध्दीमंतही बेकारीच्या वणव्यामध्ये होरपळून निघत आहे.

नियोजन काळात लोकसंख्या सतत वाढत राहिल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढले पण नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढू शकले नाही. त्यामुळे बचतक्षमता वाढली नाही. परिणामी भांडवल निर्मितीच्या दरावर प्रतिकूल प्रभाव पडत गेला. भांडवलनिर्मिती कमी म्हणून गुंतवणूक कमी व कमी गुंतवणूक म्हणून विकास कमी अशी ही विचित्र कडी निर्माण झाली आहे.

शेतीमध्ये मोठया प्रमाणावर गुंतवणूक केल्यास व शेतीं करण्यासाठी आधुनिक तंत्राचा

उपयोग करुन घेतल्यास अन्नधान्य उत्पादकतेत वाढ करता येते पण या प्रक्रियेलाही मर्यादा पडतात. लोकसंख्या वाढीमुळे शेती उत्पादनात वाढ करणे संभवत नाही. त्यामुळे पर्याप्त मात्रेमध्ये अन्नधान्य उपलब्ध होत नाही. अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होऊनही लक्षावधी लोकांना अर्धपोटी राहण्याचा प्रसंग येण्याला वाढती लोकसंख्या जबाबदार आहे.

लोकसंख्या वाढीमुळे १६ ते ४० वयोगटातील कार्यक्षम लोक काम मिळाले नाही म्हणून अनुत्पादक ग्राहक या स्वरुपात जीवन जगतात. यामुळे श्रम शक्तीचा अपव्यय होतो. सामाजिक स्वास्थ्य बिघडते. गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत जाते. अनुत्पादक खर्च वाढतो व त्याचा ताण अर्थव्यवस्थेवर पडतो. अंदाज पत्रकातील तूट वाढत जाते. पुन्हा भाववाढीशी जनतेला सामना करावा लागतो. या सर्व बाबींमुळे देशाच्या आर्थिक विकास प्रक्रियेचा वेग मंदावतो.

लोक शिक्षणाची गरज

लोकसंख्येचे वाढते संकट लक्षात घेऊन आपल्या देशात राष्ट्रीय स्वरुपाचे सर्वस्पर्शी दीर्घकालीन लोकसंख्या विषयक धोरण आखून ते युध्दपातळीवर राबविण्याची गरज आहे. विकास प्रक्रियेच्या तत्वज्ञानानुसार गुणात्मक व परिणामात्मक बदलाची स्थिती विकासामध्ये अपेक्षित आहे. श्रमशक्तीचा योग्य उपयोग, नवनवीन कौशल्याची निर्मिती व वाढ, मानवी आणि नैसर्गिक संसाधनांचा उपयोग इत्यादी घटकांकडे विशेष लक्ष देऊन लोकसंख्या विषयक धोरणाची केलेली आखणी अधिक परिणामकारक ठरत असते. जन्मदरात घट करुन लोकसंख्या नियंत्रणात आणणे हा एकच पर्याय असला तरी निरोगी, कार्यक्षम आणि सुसंस्कृत नागरिक तयार करणे ही या धोरणाची गुणात्मक बाजू विसरुन चालणार नाही कुटुंब कल्याण कार्यक्रम पहिल्या योजनेपासून सातत्याने राबविण्यात येत आहे या कार्यक्रमाचा प्रचार जोरदार असला तरी त्यात लोकांचा सहभाग अपेक्षेप्रमाणे लाभला नाही. कुटुंब कल्याण कार्यक्रमाची व्यूहरचना आखताना शासनाने आहार विषयक माहितीचा कार्यक्रम, आरोग्य सुधारणा, आयुर्मान वाढविणारे योगविषयक साधना इत्यादी कार्यक्रमांमध्ये सामंजस्य साधण्याची व्यवस्था करायला पाहिजे. म्हणजे त्याचे महत्व लोकांना अधिक चांगल्या प्रकारे समजू शकेल.

नागरिकाला आपले कुटुंब मर्यादित ठेवण्यांची आवश्यकता पटवून देणारे लोकशिक्षण सुरु करण्याची गरज आहे. त्यांच्या दृष्टीकोनात, विचारात व विश्वासात योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी हे अबश्यक आहे. ग्रामीण क्षेत्रात साक्षरतेची मोहीम राबविणे अधिक हिताचे ठरेल. लोकसंख्या शिक्षणाचा विषय तयार करुन, प्रशिक्षण, देऊन, प्रशिक्षक तयार केल्यास ते लोकाशिक्षणाचे कार्य प्रभावीपणे करु शकतील व त्याचा लाभ कुटुंब कल्याण कार्यक्रमास व लोकसंख्या नियंत्रण करण्यात मिळू शकेल. अर्थकारण तसेच समाजकारण यातील समस्या सोडविण्यासाठी याची आज नितांत आवश्यकता आहे.

* * *

स्पर्धेच्या टोकावरील साबण व्यवसाय

भारतीय साबण उद्योग !
सर्वांच्या परिचयाचा !
प्रचंड मागणीचा तसेच प्रचंड पुरवठयाचाही !
सुगंधी म्हणून ग्राहकांना,
तर भरपूर लाभ मर्यादा म्हणून उद्योजकांना मोहविणारा !

सामान्यतः प्रत्येक व्यक्तीला आपण सुंदर, स्मार्ट, चांगले दिसावे असे वाटत असते. त्याकरिता तो प्रयत्नशील असतो. त्यामुळे सौंदर्य प्रसाधनांचा उपयोग मोठया प्रमाणात करण्यात येतो. त्वचा नितळ व निरोगी राखण्यासाठी तसेच मन टवटवीत व प्रसन्न ठेवण्यासाठी आधुनिक काळात साबणाचा उपयोग प्रचंड प्रमाणावर व्हायला लागला. त्यामुळे साबण उद्योगास भरभराटीचे दिवस आले व सौंदर्य प्रसाधनात तो सर्वाधिक लोकप्रिय ठरला.

साबण उपयोग ही आता एक आवश्यक गरज झाली. ही गरज मोठया बहुराष्ट्रीय प्रमंडळांनी विविध अंगांनी फुलविली. प्रथम चैनीची बाब म्हणून सुखवस्तू व श्रीमंत वर्गापुरता मर्यादित असणारा हा व्यवसाय आता सर्वांना आकर्षित करीत प्रचंड उलाढालीच्या व लाभाच्या स्थितीत पोहचला आहे. या व्यवसायाने ग्राहकांना विपुल प्रमाणात विविध आकर्षक व सुगंधी साबण उपलब्ध करुन देऊन प्रसाधनाचे क्षेत्र अधिक व्यापक केले आहे.

या व्यवसायात ६७५ कोटी रुपयांची मागणी आहे. मागील दहा वर्षांपासून या मागणीत सतत भर पडत आली आहे. काही ग्राहकांना सतत नवीन साबण उपलब्ध हवे असते, तर काही प्रमंडळे बाजारपेठेत स्थिरपद प्राप्तीसाठी नवे साबण आणण्याचा प्रयत्न करतात. यातून

साबणाचे प्रकार वाढत गेले. विविध प्रकारच्या मागणीच्या सातत्याने अन्य उद्योगाप्रमाणेच संशोधनाचे नवे आयाम या उद्योगास लाभत आहेत.

सध्या साबण व्यवसाय स्पर्धेच्या टोकावर आरुढ झाला आहे. प्रत्येक प्रमंडळाकडून युद्धपातळीवर साबणाचे उत्पादन व विक्री करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. कारण मुळातच स्पर्धा असलेल्या या व्यवसायात निरमा केमिकल वर्क्स, गुजराथ या प्रमंडळाच्या निरमा डिटर्जंट साबण वडीमुळे राष्ट्रीय बाजारपेठेत प्रचंड खळबळ उडवून दिली आहे. पद्धतशीर आकर्षक जाहिरातीमुळे देशात व आता तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठ "निरमा" ला उपलब्ध होऊ लागली आहे. त्यामुळे भारतीय बाजारपेठेत नवी मोर्चे बांधणी व व्यूहनीतीचे चित्र दिसत आहे.

भारतीय साबण उद्योग हा हिंदुस्थान लिव्हर लि., टाटा ऑईल मिल्स कंपनी लि. (टोमको), कर्नाटक सोप अ‍ॅण्ड टिर्जंट्स लि., (केएसडीएल), गोजरेज सोपस् प्रा. लि. आणि मॉडर्न कॉस्मॅटिक्स कंपनी लि. या प्रमुख कंपन्यांच्या वर्चस्वाखाली आहे. साबणाचे २,५०,००० टन वार्षिक उत्पादन होत असते. त्यापैकी ५५ टक्के हिस्सा हिंदुस्थान लिव्हर व २० टक्के हिस्सा गोदरेज व २० टक्के हिस्सा टाटा कंपनी व उर्वरित ५ टक्के हिस्यामध्ये २५ अन्य कारखानदार आहेत. एकूण साबण व्यवसायाची बाजारपेठ खंडित स्वरुपाची आहे.

हिंदुस्थान लिव्हरचा प्रभाव

साबण व्यवसायाची बाजारपेठ दोन प्रकारात विभागली आहे. थोडया कमी किंमतीचा सामान्य गट व जास्त किंमतीचा व गुणवत्तेचा प्रिमियम गट अशी विभागणी उत्पादकांनी केली आहे त्याचे चित्र खालील प्रमाणे.

सामान्य गट-सारणी

प्रमंडळाचे नाव	साबणवडी	किंमत रू.
गोदरेज	व्हिजील	३.००
हिंदुस्थान लिव्हर	ब्रीझ	३.६०
हिंदुस्थान लिव्हर	लाईफबॉय	४.००
विप्रो	जस्मिन	४.१०
गोदरेज	फ्रेस्का	४.२०
टाटा ऑईल मिल्स क.	हमाम	४.५०
गोदरेज	सिन्थॉल	४.६०
हिंदुस्थान लिव्हर	रेक्सोना	४.७०
हिंदुस्थान लिव्हर	लक्स	४.७५

प्रिमियम गट सारणी

प्रमंडळाचे नाव	साबणवडी	किंमत रु.
हिंदुस्थान लिव्हर (इंटरनॅशनल)	सुप्रीम लक्स	५.००
हिंदुस्थान लिव्हर	कॅरिस	५.००
टाटा ऑईल मिल्स क.	मार्गो	५.२०
कोलगेट पामोलिव्ह	पामोलिव्ह	५.६०
बीडब्ल्युआय	मॉन्टेज	६.००
हिंदुस्थान लिव्हर	ड्रीम	६.००
पॉण्ड्स फ्लॉवर	पॉण्ड्स ड्रीम	६.००
गोदरेज	मारवेल	६.००
हिंदुस्थान लिव्हर	लिरिल	६.१०
म्हैसूर	म्हैसूर सॅण्डल	६.२५
गोदरेजह	क्राऊनिंग ग्लोरी	६.२५
कलकत्ता केमिकल्स	ड्रीमनील	६.५०
गोदरेज	डेटॉल	६.९०
मॉडर्न कॉस्मॉटिक्स	गोल्डफीश	८.००
टाटा	मोती	१०.००
हिंदुस्थान लिव्हर्स	पिअर्स	१०.००

वरील दोन्ही सारण्यांवरुन हिदुस्थान लिव्हर लि. चा प्रभाव असल्याचे दिसून येते. सामान्य गटात ४,तर प्रिमियम गटात ५ नवीन प्रकार त्यांनी विक्रीस उपलब्ध केले आहेत. गोदरेज कंपनीने सामान्य गटात ३ प्रिमियम गटात तीन नवे प्रकार उपलब्ध केले असून टाटा कंपनीने सामान्य गटात एक व प्रिमियम गटात दोन साबण प्रकार विक्रीस उपलब्ध करुन आपले स्थान निश्चित केले आहे. हिंदुस्थान लिव्हरचे लक्स सुप्रीम लक्स, रेक्सोना साबण ग्रामीण क्षेत्रात व विशेषतः दक्षिणेत लोकप्रिय आहे. सामान्य गटातील टाटाचा हमाम, लाईफबॉय व लक्स यांनी ६२ टक्के बाजारपेठ काबीज केली असून प्रमियम गटातील मोती, पिअर्स, क्राऊनिंग ग्लोरी, लिरिल, मॉन्टेज, म्हैसूर सॅण्डल या साबण प्रकारांनी ६५ टक्के बाजारपेठ काबीज केली आहे. विशेषतः श्रीमंत, सुखवस्तू ग्राहकांमध्ये हा प्रकार लोकप्रिय असून त्यांचे आकर्षण सतत वाढत आहे. या साबणाची एकूण वार्षिक विक्री १,५०,००० टन

आहे. लाईफबॉय साबण ग्रामीण क्षेत्रात व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मागणी प्राप्त करीत आहे. हिंदुस्थान लिव्हरच्या नंतर गोदरेजचा क्रमांक लागतो. त्या प्रमंडळाचे सिन्थॉल साबण गेल्या ३५ वर्षापासून बाजारपेठेत उपलब्ध असून एकूण मागणीत त्याचा ९ टक्के भाग आहे. क्राउनिंग ग्लोरी व मारवल यांचा मागणी भाग आता ६ टक्के झाला आहे. अजून फ्रेस्का या नवीन प्रकाराला मागणी उपलब्ध झाली नाही. टाटा ऑईल मिल्स कंपनीचे हमाम, मोती यांनी ७ टक्के मागणी भाग प्राप्त केला आहे.

डिटर्जंटचे आकर्षण

कपडे धुण्यासाठी जी साबणवडी तयार होते त्यात आता डिटर्जंट रासायनिक द्रव्याचा हिस्सा असतोच असे आढळून आले आहे. हिंदुस्थान लिव्हर कं. ने सर्वप्रथम रिन डिटर्जंट वडी बाजारपेठेत आणली. या रासायनिक द्रव्यामुळे कपडे स्वच्छ निघतात, हे विशेष होय. निरमा केमिकल्स वर्क्स या गुजराथच्या कंपनीने निरमा डिटर्जंटचे उत्पादन करुन व प्रचंड प्रमाणावर विक्री करुन बाजारपेठेत संघटित क्षेत्राला जोरदार धक्का दिला. निरमा ब्रँडचे वार्षिक उत्पादन ५,५०,००० टन आहे. सध्या बाजारपेठेत एकूण मागणी ९,००,००० टनांची आहे. निरमा असंघटीत गटात असूनही खपाच्या संदर्भात सर्वात पुढे आहे. त्यांना ४६० को. रु. ची वार्षिक प्राप्ती आहे. निरमाच्या आगमनामुळे हिंदुस्थान लिव्हर, गोदरेज व निरमा अशी तीन गटात अत्यंत तीव्र स्पर्धा आहे.

वरील सारणीवरुन संघटित क्षेत्राला असंघटित क्षेत्राशी मोठा सामना करावा लागतो, हे दिसून येते. डिटर्जंट साबणवडयांना आता ३,८०,००० टनांची अतिरिक्त मागणी असून हे आव्हान हिंदुस्थान लिव्हर व निरमा कं. या दोन्हीने स्वीकारले आहे. ७२,००० टन जास्त उत्पादन व त्याकरिता अतिरिक्त गुंतवणूक निरमा करणार असून हिंदुस्थान लिव्हर ७५० कोटी रु. गुंतवणूक करुन स्वतंत्र रीत्या खपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या तयारीत आहे. प्रोक्टर ॲण्ड गॅम्बल (रिचर्डसन हिंदुस्थान) यांनी आपले आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीचे "कॅमे" साबण बाजार पेठेत आणण्याचा मनोदय व्यक्त केल्यामुळे साबण बाजारपेठेत चिंतेचे वातावरण तयार झाले आहे. एवढे मात्र खरे की, निरमा या भारतीय कंपनीने बहुराष्ट्रीय प्रसिध्द कंपन्यांची झोप उडविली व साबण उद्योगात आपले स्थान निश्चित केले.

बाजारपेठेतील स्थिती

वर्ष	संघटित क्षेत्र	असंघटित क्षेत्र	उत्पादन टनामध्ये
१९८०	१५९	५०	२४
१९८१	१७०	७०	२९
१९८२	१६५	१४०	४६
१९८३	१७०	२००	५४
१९८४	१८०	२८०	६१
१९८५	१९०	३५०	६५
१९८६	२००	४१०	६७
१९८७	२१०	५९०	७४
१९८८	२२०	७००	७६

(स्रोत उद्योगमंत्रालय वार्षिक अहवाल)

ग्राहकराजा महत्वाचा

या स्पर्धेच्या परिस्थितीत ग्राहकराजाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. कमी किंमतीत पण अधिक गुणवत्तेचे सुगंधी साबण तयार करणे ग्रामीण क्षेत्रातील जनतेसाठी आवश्यक आहे. बहुराष्ट्रीय प्रमंडळे नेहमीच लाभाच्या उद्दिष्टावर भर देत असतात. अशा वेळी निरमा कंपनीने कमी किंमतीत गुणवत्ता कायम ठेवण्याचा प्रयत्न केला तर ग्राहकराजा सुखावल्याशिवाय राहणार नाही. निरमा कंपनीने ही अपेक्षा पूर्ण केली तर, साबण व्यवसायाच्या बाजारपेठेला एक निराळीच दिशा लाभेल, हे खरे.

* * *

सुशिक्षित बेकारी : नियोजनातील एक समस्या

योजनेचा आराखडा आणि उद्दिष्टे तयार होत असताना योजना आयोगाचे लक्ष बेकारीच्या समस्येवर केंद्रीभूत झाल्याचे एका अहवाल टिपणीत- आढळून आले. त्यात सुशिक्षित बेकारीच्या वाढत्या प्रमाणाबद्दल चिंता दिसून आली. सात योजना पूर्ण होऊनही सुशिक्षित बेकारांची संख्या ३.५० कोटीवरुन ४.६५ कोटींवर पोहोचते व त्यात मॅट्रिक ते पदव्युत्तर पातळी तसेच सर्व विद्याशाखा समाविष्ट आहेत, ही गंभीर समस्या ठरते, ते फसलेल्या नियोजनाचे फलित आहे. दर ५ वर्षात ३।। पटींनी बेकारांच्या संख्येत वाढ होते. कला-वाणिज्य पदवीधरांना किमान २७ महिने, तर इंजनियरिंग व तांत्रिक पदवीधरांना १६ ते २२ महिने नोकरी प्राप्तीसाठी थांबावे लागते, असे भगवती समितीच्या अहवालात नमूद केले आहे. प्रत्यक्षात हा कालावधी दुपटीपेक्षा जास्त प्रमाणात असतो, असे आढळते. फ्रान्समध्ये सुशिक्षित बेकारांमुळे शासन कोसळले होते, हे लक्षात घेतले म्हणजे या समस्यची तीव्रता जाणवते.

सुशिक्षित बेकारीचे स्वरुप आकडे हजारामध्ये

प्रकार	हवा असणारा रोजगार	योजना आयोगाचे मते अपेक्षित रोजगार.
१. मॅट्रिक व उच्च माध्यमिक	८०८०.९	४७६६.९
२. कला पदवीधर	८५७.५	४०३.०
३. वाणिज्य पदवीधर	३५७.८	२०३.०
४. शेतकी पदवीधर	२७.१	१५.९
५. विज्ञान व अन्य पदवीधर	८१८.७	४७२.६
६. वैद्यकीय पदवीधर	४१.४	२८.६
७. कला पदव्युत्तर	२९४.३	१५३.९
८. वाणिज्य पदव्युत्तर	४८.६	३९.६
९. विज्ञान पदव्युत्तर	६६.१	५०.८
१०. इंजीनियर्स	२२६.६	१२२.२

स्रोत : स्टॅटिस्टिकल आऊटलाईन ऑफ इंडिया, टाटा सर्व्हिसेस लि.)

वरील सारणीवरुन सुशिक्षित बेकारीचे विस्तृत स्वरुप लक्षात येते. मॅट्रिक ते पदव्युत्तरपर्यंत सर्वच विद्याशाखांमध्ये बेकारीचे प्रमाण गंभीर स्थिती प्रदर्शित करते. हे संख्याप्रमाण शेती, खाण-उद्योग, उत्पादन-उद्योग, बांधकाम-उद्योग व इतर सेवा यामध्ये ३४.३ टक्क्यांनी जास्त रोजगार संधी उपलब्ध करुन दिल्यानंतर राहिलेल्या व उत्तरोत्तर वाढत जाणा-या बेकारीचे आहे. एका राष्ट्रीयीकृत बँकेच्या वरिष्ठ अधिका-यांनी सांगितलेले उदाहरण पुरेसे बोलके आहे. त्या बँकेला १२५ कारकुनांच्या जागा भरावयाच्या होत्या, त्यासाठी देशभरातून ३ लक्ष अर्ज आले. म्हणजेच विद्यापीठातील पदवीधरांची संख्या व त्यांना प्राप्त होणारा रोजगार पुरवठा यांचे प्रमाण किती व्यस्त आहे, हे स्पष्ट होते. शिक्षण घेतल्यानंतरही बेकार राहण्याची स्थिती विफलता आणते, त्यातून निर्माण होणारा असंतोष भयावह स्थिती निर्माण करतो, हे या समस्येचे उद्वेगजनक स्वरुप आहे.

सदोष शिक्षणपध्दती

शिक्षण क्षेत्राचा विकास व्हावा या उदात्त हेतूने शहराप्रमाणेच ग्रामीण क्षेत्रात प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयीन शिक्षणापर्यंतची व्यवस्था योजनाकाळात झाली. पुढे हा विकास भरमसाट वेगाने झाला. शिक्षण क्षेत्रात राजकारण आल्यामुळे राजकीय पुढा-यांनी त्याला धंद्याचे स्वरुप दिले. शहरामध्ये इंजिनियरिंग व तांत्रिक महाविद्यालये

आवश्यकतेपेक्षा जास्त संख्येत उघडली गेली. यामुळे पदवीधरांची संख्या भरमसाट वाढली. शिक्षणाचा व व्यावसायिक क्षेत्राचा योजनापूर्वक विस्तार न झाल्यामुळे बेकारांची संख्या वाढत गेली. शिक्षण क्षेत्रातील राजकारणाप्रमाणे शिक्षणपद्धती सदोष राहिली व त्यात योग्य ते परिवर्तन करण्याची आवश्यकता शासनाला वाटत नाही, हे विशेष होय. आजच्या शिक्षणपद्धतीने व्यवसायनुकूल दृष्टिकोन स्वीकारलेला नाही. काळाच्या गरजेनुसार होणा-या परिवर्तनाची दखल घेण्याचे सामर्थ्य या शिक्षणपद्धतीत नसल्यामुळे असंख्य तरुण जीवनातील महत्वाच्या कार्यासाठी, व्यापार-व्यवसायासाठी, नोकरीसाठी अपात्र ठरत आहेत. वाणिज्य विद्याशाखेतील विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षणानंतमर स्वयंरोजगारासाठी अपात्र ठरतात, हा शिक्षण पद्धतीचा दोष नव्हे काय?

अर्थव्यवस्थेत भ्रष्टाचाराचे प्रमाण इतके प्रचंड वाढले आहे की, प्रत्येक व्यावसायिक क्षेत्रात योग्यता डावलण्यात येऊन भ्रष्टाचाराच्या जोरावर नोकरीत शिक्कामोर्तब करण्यात येते. परिणामी उचित पात्रता असलेले पदवीधर व पदव्युत्तर शिक्षण घेतलेले तरुण नोकरी व व्यवसायापासून वंचित राहतात. भ्रष्टाचाराची सर्वत्र ओरड होऊनही शासन दरबारी व समाजातही त्याकडे मोठया प्रमाणावर दुर्लक्ष होत असलेले दिसून येते. विद्यमान शिक्षण प्रणालीने नैतिक मूल्यांचे पतन घडविले व त्या अभावाची जाणीवही होणार नाही, अशी संवेदनाशून्य परिस्थिती निर्माण केली. परिणामी आळशी, खोटया प्रतिष्ठेची जपणूक करणारी, श्रमाच्या प्रतिष्ठेकडे दुर्लक्ष करणारी, परावलंबी अशी शिक्षित पिढी तयार व्हायला लागली व रोजगार संधी उपलब्ध नसल्यामुळे बेकारीचा आलेख उंचावत गेला.

भारतीय अर्थव्यवस्था अजून विकसनशील अवस्थेत आहे. आपला विकासाचा दर ५.५ आहे. यामुळे उद्योग, वाहतूक, नोकरी, सेवा इत्यादी क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली तरी शिक्षितांना, नोकरीमध्येच सामावून घेण्यास ही क्षेत्रे असमर्थ ठरली. नियोजनातील अपयश याला कारणीभूत आहे. शिक्षणाचा विस्तार व व्यापार-उद्योगांचा विस्तार व त्याद्वारे रोजगार संधीचा पुरवठा यांचे जे सुयोग्य संतुलन अमेरिका, इंग्लंड, या पाश्चात्य राष्ट्रांमध्ये आढळून येते, नेमके तेच आमच्या योजनाकारांना ३३ वर्षे झाल्यानंतरही साधता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे वाढत जाणारी बेकारी हे नियोजनातील मोठे प्रश्नचिन्ह ठरले.

उद्योजकतेचा अभाव

सुशिक्षित बेकारीला वरील कारणाप्रमाणेच सुशिक्षित युवकही त्यांच्या अवास्तव अपेक्षा व शारीरिक कष्ट करण्याची वृत्ती नसल्यामुळे जबाबदार ठरतात. केवळ नोकरी करण्यात इतिकर्तव्यता मानणारा, व्यवसाय किंवा उद्योगाची उभारणी करण्यास तयार नसणारा मोठा शिक्षित वर्ग आज अस्तित्वात आहे. उद्योजकतेचा अभाव असल्यामुळेच बेकारीचा चटका जाणवतो. व्यवसाय किंवा स्वतंत्र उद्योग प्रारंभ करावयाचा म्हणजे दोन मूलभूत प्रश्न निर्माण होतात. एक भांडवल उपलब्धीचा असतो. त्याकरिता कर्ज देण्याच्या सोयी मोठया प्रमाणावर उपलब्ध आहेत. राष्ट्रीयीकृत, व्यापारी, सहकारी बँका, सिकॉम, औद्योगिक

महामंडळे, खाजगी अर्थप्रबंधनकारी संस्था इत्यादीद्वारे कर्ज पुरवठा उपलब्ध होऊ शकतो व हा प्रश्न सोडविला जाऊ शकतो. पण दुसरा प्रश्न असतो जोखीम (Risk) स्वीकारण्याची तयारी आणि वृत्ती यांचा. याच वृत्तींचा फार मोठा अभाव जाणवतो. व्यावसायिक प्रशिक्षण सोयी व व्यवसाय मार्गदर्शन केन्द्रे यांची कमतरता व अकार्यक्षमता, व्यापार-व्यवसायासंबंधी रुची निर्माण करण्याच्या प्रयत्नांचा अभाव, काळाबाजार व भ्रष्टाचारामुळे व्यापाराचे होत असलेले अवमूल्यन, चांगल्या व सरळ मार्गाने व्यवसाय करुन उचित व मुबलक नफा प्राप्त करता येऊ शकतो, या वस्तुस्थितीच्या माहितीचा अभाव, प्रत्येक व्यापारी म्हणजे नफेखोरच असे चुकीचे समीकरण, वित्त साहय घेताना निर्माण होणा-या अडचणी, अल्पसंतष्टता, दारिद्रय इत्यादी कारणे जोखीम स्वीकारण्याच्या अभावात दडलेली आहेत. जोखीम स्वीकारण्याच्या वृत्तीचा अभाव उद्योजकतेच्या मार्गातली धोंड ठरते. वस्तुस्थिती अशी आहे की, लघु व कुटींर उद्योग मोठया प्रमाणावर सुरु केले जाऊ शकतात. त्याकरिता विस्तृत बाजारपेठ उपलब्ध आहे. लाभार्जनक्षमतेची ब-यापैकी हमी आहे. स्पर्धेच्या परिस्थितीतही अस्तित्व कायम राखण्यासाठी पर्याप्त विपणनक्षमताही आहे, औद्योगिक महामंडळाजवळ व उद्योग सेवा केंन्द्रांजवळ मोठया-लहान उद्योगांची यादी आहे. म्हणजेच व्यापार व उद्योग सुरु करण्यासाठी अनुकूल व्यवस्था व वातावरण आहे. त्याचा योग्य उपयोग करुन घेण्याची क्षमता शिक्षित युवकांमध्ये नसल्यामुळे बेकारीचे स्वरुप कायम राहते.

विशेष कार्यक्रमाची आवश्यकता

वरील समस्या सोडविण्याकरिता बेकारी निवारणाच्या विशेष कार्यक्रमाची आवश्यकता आहे. सध्याच्या शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल करुन ती व्यवसायभिमुख बनविण्यात यावी. तांत्रिक प्रशिक्षण , व्यवसाय मार्गदर्शन, उद्योगधंद्याचे आर्थिक व्यवहारातील स्थान व प्रतिष्ठा व पैसाही एक शक्ती आहे व तो योग्य रीतीने गुंतविल्यास भरपूर पैसा मिळवू शकतो, इत्यादी जाणीव निर्माण करणारे शिक्षण देण्याची व्यवस्था करायला हवी. आर्थिक विकासाचा वेग वाढविण्याच्या दृष्टीने योजनेची आखणी, उद्योगांचे विकेंद्रीकरण व लघुउद्योग स्थापनेस व विस्तारास प्रोत्साहन देणे इत्यादी योजना शासकीय स्तरावर प्रमाणिकपणे राबविणे आवश्यक ठरते. युवकांनी व्यापार व उद्योग क्षेत्रात कार्य प्रारंभ करुन स्वयंरोजगाराची योजना अंमलात आणण्यास मदत केली पाहिजे. योजनाकारांचे लक्ष या प्रश्नचिन्हांनी वेधलेले आहेच. त्याला पूर्णविराम देण्यासाठी वरील उपायांनी युक्त असा एक विशेष आर्थिक कार्यक्रम सातव्या योजनेच्या अंतर्गत अंमलात आणायला पाहिजे. म्हणजे काही प्रमाणात सुशिक्षित बेकारी कमी होऊ शकेल व युवकांना आपल्या जीवनातील सूर गवसू शकेल.

* * *

भेटवस्तूंच्या संपन्न बाजारपेठेचे स्वरुप

दिवाळी,व्रतबंध, विवाह, वाढदिवस, स्नेहमीलन अशा अनेक सुखद प्रसंगाचे वेळी भेटवस्तू देण्याचे व खरेदीचे प्रसंग जीवनात नेहमीच येत असतात. सप्रेम भेटी दिल्या जातात व तितक्याच स्नेहाने त्या स्वीकारल्या जातात. त्या सुखद क्षणाची ती वस्तुरुप आठवण असते. कधीकधी हवीहवीशी वाढणारी तर कधी जास्त खर्चाने नकोशी करणारी ! ही एक परंपरा आहे. मात्र ! या भेटवस्तूंचे वितरण करणारी व्यापारव्यवस्था आहे. दुकानांमध्ये एकापेक्षा एक सरस, आकर्षक वस्तूंची गर्दी होते व ग्राहकांना ती मोहविते ! किंमत जास्त असली तरी सुखविते, मधुक्षण तो हा ! अशी अवस्था होऊन ग्राहक सुंदर भेटवस्तूंची खरेदी करुन टाकतात !

कलात्मक बाजारपेठ

बाजारपेठांचे अनेक प्रकार आहेत. भेटवस्तू कलात्मक बाजारपेठेतील प्रकारात येतात. यात कलेला, नाविन्याला, सौंदर्याला आणि आकर्षणाला विशेष प्राधान्य आहे.

विविध प्रकारच्या भेट वस्तूंची निर्मिती करुन बाजारपेठेत विक्रीसाठी आणणारा हा भेट वस्तूंचा सर्वात मोठा व्यापार व्यवसाय आहे. ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक या व्यवसायामुळे करण्यात आली आहे. हा व्यवसाय असंघटित स्वरुपात असून निरनिराळया प्रमंडळांमार्फत कार्यरत आहे.

घडयाळ उद्योग

घडयाळ ही एक आवश्यक बाब असल्यामुळे लाभार्जनक्षमतेत हा उद्योग सतत पुढेच असतो. मनगटी घडयाळे, भिंतीवरील घडयाळे, अलार्म घडयाळे, पेन वॉच, बॉक्स वॉच, रिंग घडयाळ, अशा अनेक प्रकारच्या घडयाळांची निर्मिती या उद्योगातून होत असते. अलिकडे घडयाळींच्या किंमती पूर्वीच्या मानाने ब-याच कमी झाल्यामुळे भेटवस्तूत घडयाळाचा समावेश होतो. या उद्योगाने तांत्रिक प्रगती विशेषत्वाने केली आहे. त्यामुळे आकर्षक रंगातील व आकारातील घडयाळे ग्राहकांना आकर्षित करतात. टिटान वॉचेस कंपनी लि.ने भेट स्वरुपातील घडयाळे मोठया प्रमाणावर तयार केली आहेत. त्यासाठी आकर्षक संवेष्टन, आर्डर्स, विशेष रुचीची मागणी, कलात्मकता, नव्या प्रतिकृतीसाठी आरक्षण व्यवस्था इ. स्वरुप कार्याकडे कंपनीने विभागशः लक्ष पुरविले आहे. रमण इन्स्टिटयूटने सर सी.व्ही.रमण जन्म शताद्बीनिमित्त सर्व अधिकारी व कर्मचा-यांना टिटान. घडयाळी भेटीदाखल दिल्यात. इंडियन एअर लाईन्सने अधिका-यांना टिटान घडयाळी भेटीदाखल दिल्यात. यामुळे टिटान घडयाळांना भेटवस्तूचे " बहुमोल मान्य " प्राप्त झाले व मागणी एवढी प्रचंड वाढली की ५०० प्रमंडळांनी आपल्या अधिका-यांना व कर्मचा-यांना प्रोत्साहनपर भेट म्हणून टिटान कंपनीकडे घडयाळांची प्रचंड मागणी नोंदविली. तरुण भारतने देखील आपल्या भेटवस्तूत घडयाळाचाच समावेश केला होता. याचा परिणाम टिटान कंपनीला प्रचंड लाभ होण्यात झाला. तसेच अनेक पारषद आयोजकांनीही घडयाळे भेट देण्याचा संकल्प केला.

भेटवस्तू निर्माण करणारे व वितरित करणारे उद्योग प्रमंडळे

१) टिटान वॉचेस कंपनी - घडयाळ. २) बिंबो इंटर नॅशनल - जर्मन डिझाइनच्या सर्व शोभेच्या वस्तू. ३) ईगल प्लॉस्क इंडस्ट्री लि.- प्लॉस्क, थर्मास इत्यादी. ४) गिप्ट अन्डॅ क्रॅप्ट वर्क्स - कृत्रिम दागिने, टेबल लॅम्पस, शेल, स्टेशनरी स्टॅन्ड, कलात्मक वस्तू. ५)हैद्राबाद आल्विन लि.-उत्तम प्रकारची घडयाळे. ६)अनेके अडव्हरटायझर्स- नाविन्यपूर्ण जाहिरातीच्या वस्तू. ७)एशियन अडव्हरटायझर्स - कीचेन, ब्रिस्क, कलात्मक वस्तू. ८)बोरोसिल ग्लास वर्क्स लि.-काचेचे ग्लासेस, सेट्स स्विझलिस्टिक्स. ९)जयमन प्लॅस्टिक्स - प्लॅस्टिक्स स्टॅन्ड, फाईल्स, लॅम्प्स, गिफ्ट्स. १०)किशो कटलरी लि.- स्टेनलेस स्टीलची भांडी, चांदीचे पॉलिश असणारी तबके, पेले, फ्लॉवरपॉट इत्यादी कलात्मक वस्तू. ११)लेदर एम्पोरियम - लेदर वस्तू, फोल्डस, ट्रॅव्हलकीट डायरी, नॉव्हेल्टीज. १२)पोलीहोम लि.-गृहसजावटीच्या सर्व वस्तू. व्हेलव्हेट, मखमली गालिचे, लोड इत्यादी. १३)प्रिंटोग्राफीज-इलेक्ट्रॉनिक पेन्सिल शार्पन्स, वॉल हॅगिग्ज, स्मॉल कॉर्पोरेट गिफ्ट इत्यादी. १४)सोनेल टाइम इण्डस्ट्रीज - क्वार्टर्ज. १५)मिल्टन-वॉटरजग, आईसपॅक, फ्लॉक्स, टीफिन्स, ब्लॉस, मॅट्स, टीकोजी व अन्य. १६)मेट्रोपालिटन कंपनी - पितळेची चकचकीत विविध आकारातील भांडी, कलात्मक तबक, ओम, श्री, स्वस्तिक, फ्लॉवरपॉट, समई, चांदी सारखीच दिसणारी देवलची तबके, फुलपात्रे, टायपिन्स, सिव्हर बेस्ट्स

इत्यादी. १७)भारत प्लॅास्टिक-प्लॅास्टिक जग, बाटल्या, कपबशांचा सेट इत्यार्दी.

वरील सारणीवरुन देशातील प्रमुख १७ प्रमंडळे कलात्मक वस्तू व अन्य उपयोगी वस्तू भेट स्वरुपात विक्री करण्यासाठी व्यवसाय करीत असल्याचे आढळून येते. या प्रमंडळामध्ये पूर्वी फाउंटनपेन उद्योगाचाही समावेश होता, परंतु बॉल पॉईंटपेनच्या लोकप्रियतेमुळे या उद्योगाला कमी मागणीच्या परिस्थितीशी सामना करावा लागत आहे. पेनसेटच्या गिफ्ट माध्यमातून या उद्योगांला पुन्हा बरे दिवस येण्याची शक्यता आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांनी हेच सूत्र राबविले व त्यात ते यशस्वी झाले.

वाढती विस्तारित मागणी

गिफ्ट मार्केट अलिकडच्या दहा वर्षात अतिशय संपन्न झाले आहे. त्यात विविधता आहे. आकर्षकता आहे तसेच नाविन्यपूर्ण वस्तूंची नियमित पडणारी भरही आहे. त्यामुळे या बाजारपेठेतील समाजातील उच्चभ्रू, व्यवसायी, श्रीमंत, उच्च-मध्यम व मध्यमवर्ग मोठया प्रमाणावर आकर्षिला गेला आहे. ग्राहकांची वाढती मागणी, निरनिराळया वस्तूंच्या निर्मितीस सतत प्रोत्साहित करते, या भेटवस्तू ंची किंमत सामय वस्तूंच्या तुलनेत जास्त असते तथापि ग्राहक आपल्या आर्थिक मर्यादेत वस्तूंची विक्री करीत असतो असे एका सर्वेक्षणात आढळून आले. त्यामुळे प्रचंड उत्पादनाबरोबर वस्तू ंची प्रचंड विक्री विशिष्ट सणांच्या वेळी तर विशेषत्वाने होते व हा व्यवसाय प्रचंड लाभाची प्राप्ती करतो. या व्यवसायाचे एक महत्वाचे वैशिष्टय असे आहे की, प्रत्येक कामसाठी एखादी भेटवस्तू संबंधित व्यक्तीला दिली की संबंध सलोख्याचे होऊन त्या कामात यश मिळते अशी धारणा व्यवसायात, तसेच शासकीय स्तरावर रुढ झाली आहे. हीच धारणा या व्यवसायातील लाभाचे गमक आहे. अगदी कच्चा मालाच्या खरेदी पासून उत्पादन प्रक्रिया पूर्ण होऊन विक्री योग्य होतपर्यंत विविध स्तरावर भेटवस्तूंचे आदनप्रदान सुरु असते. त्यामुळे या बाजारपेठेला संपन्नतेचे दिवस आले आहे.

पसंतील भरपूर वाव

या संपन्न बाजारपेठेत ग्राहकांना भेटवस्तू निवडण्याचे स्वातंत्र्य विपुल आहे. पसंतीला भरपूर वाव आहे. कारण विविध प्रकारच्या किंमतीच्या वस्तूंची उपलब्धता आहे. कॅलेंडर्स, घडयाळी, कीचेन, बॉलपॉईंट पेन्स, वालेट्स, स्वीट पॅकेट्स, स्टील आर्टिकल्स, सिल्वहर आर्टिकल्स, देवल आर्टिकल्स, कॅमेरा, फूड प्रोसेसर्स, कटलरी, क्रॉकरी इत्यादी प्रकारच्या भेटवस्तू ग्राहकांना आकर्षित करतात. टाटाग्रुप, ऑरके, फिलिप्स, हिन्दुस्थान लिव्हर, बजाज या प्रमंडळांनी अतिशय आकर्षक स्वरुपाच्या डाय-या विक्रीस उपलब्ध करुन दिल्यात. त्या अतिशय सुंदर व उपयोगी असल्यामुळे त्यांचे व्यावसायिक स्तरावर भेटवस्तू म्हणून मोठया प्रमाणावर आदानप्रदान होते. डायनर्स क्लबने अशा डाय-या तयार करुन विक्रीस ठेवल्या. त्यांच्या क्लबच्या सदस्यांना त्या मोफत मिळतात, पण अन्य लोकांसाठी जास्त

किंमतीवर विक्रीस उपलब्ध असतात. जास्त किंमत असल्यामुळे श्रीमंत वर्तुळातच त्या खरेदी केल्या जातात पण डायनर्स क्लबची डायरी विकत घेऊन दुस-याला भेटवस्तू देणे हे व्यावसायिकांच्या दृष्टीने फारच प्रतिष्ठितपणाचे लक्षण समजले जाते. मोठया प्रमंडळांनी आयोजित केलेल्या कॉल्फरन्समध्ये अशा डाय-या विकत घेऊन सदस्यांना मुफ्त वितरित केल्या जातात. सामान्यांना मात्र या भेटवस्तू दुर्मिळच असतात.

सुखदसंबंधाचे संवर्धन

भेटवस्तू निर्मिती व विक्री करणारा हा उद्योग लाभार्जन क्षमतेत आघाडीवर आहे. जास्त किंमत असूनही वस्तूंची जास्त विक्री व त्यातून भरपूर लाभ पदरात पाडून घेणारा हा उद्योग आहे. यातही स्पर्धा आहेच. स्पर्धेमुळे अनिश्चितता असली तरी उत्पादकांमध्ये चुरस व जिद्द कायम आहे. मुळात लाभार्जनक्षमता असण्याचे कारण, भेटवस्तूंच्या आदानप्रदान करण्याने मानवी संबंधांना नवा सुखद आयाम लाभतो, हे आहे. कार्यात यश मिळवायचे असो, सणांचे सुख लुटायचे असो, समारंभाचा आनंद द्विगुणी करायचा असो. भेटवस्तूमुळे सुखद संबंधाचे संवर्धन होत असते. प्रत्येकजण या सुखद सोहळयात सहभागी होत असतो. आपल्या आर्थिक मर्यादेतच भेटवस्तूंची खरेदी करुन कुणाला तरी तो सुखवित असतो व अशाच प्रसंगातून स्वतःही आनंदी होत असतो. या मानवी स्वभावाच्या ऋजुतेला प्राधान्य देणारा हा व्यवसाय. यामुळेच वृद्धिंगत होत आहे. सामान्यांच्या आर्थिक मर्यादेला मानवणा-या नाविन्यपूर्ण भेटवस्तू रास्त दरात हा व्यवसाय उपलब्ध करु शकला, तर ग्राहकांनाही सुखसंपदेचे समाधान मिळेल, नाही काय?

* * *

आजच्या अर्थकारणाचा आकृतिबंध

आठव्या योजनेच्या आराखडा तयार होत असताना, अर्थकारणातील विविध पैलूंकडे सूक्ष्म रीतीने अवलोकत करीत असतांना, काही निश्चित स्वरूपाची तर काही समस्यांची तीव्रता नियोजन मंडळाच्या नजरेस आली. मागील ३५ वर्षांच्या कालावधीत अनेक आवर्त अर्थकारणात निर्माण झालीत. विकासाचा वेग मंद असला तरी वाढीच्या दिशेने ५.५ पर्यंत आला. आधुनिक तंत्रविज्ञान व विज्ञानात प्रगती झाली. मोठया प्रमाणावर औद्योगीकरण झाले. शहरांचा विकास झाला. अंतर्गत व विदेशी व्यापार वाढला. शिक्षणक्षेत्र विस्तारले गेले. प्राथमिक शिक्षणापासून तो महाविद्यालयीन शिक्षणाच्या सोयी शहराप्रमाणेच ग्रामीण क्षेत्रात निर्माण झाल्या. शिक्षितांचे प्रमाण वाढले. आरोग्यविषयक सोयी ग्रामीण क्षेत्रात विकसित झाल्या. अन्नधान्याच्या संदर्भात नियंत्रणे उठविण्यात आलीत. जनतेचे जीवनमान उंचावले, क्रीडाक्षेत्रात नैपुण्य प्राप्त झाले. दूरदर्शन क्षेत्राचा प्रचंड प्रमाणावर विस्तार झाला.

ही सर्व प्रगतीची प्रसादचिन्हे दिसत असतानाच काही मूलभूत समस्या गंभीर होत असल्याचेही स्पष्ट दिसून आले. समस्यांची तीव्रता इतकी जास्त आहे की त्यासमोर प्रगतीची चिन्हे झाकाळून जातात. काळया पैशाचे प्राबल्य, दारिद्र्याचे वाढते प्रमाण, अशिक्षित बेकारी, लोकसंख्या वाढीचा प्रश्न, आर्थिक विषमता, प्रादेशिक असमतोल, औद्योगिक केन्द्रीकरण, उत्पन्न वितरणातील असमानता, उद्योगांचे आजारीपण, विदेशी प्रतिकूल

शोधनाधिक्य, शेतमालाच्या भावासंबंधीची समस्या, शेतमजुरांची समस्या, वेळोवेळी होणारी भाववाढ, ग्रामीण इंधन समस्या, प्रदूषण इत्यादी भयानक स्वरुपाच्या समस्या अर्थकारणात आव्हान स्वरुपात अस्तित्वात आहेत. विकासाच्या जमेच्या बाजूपेक्षा समस्यांची आव्हाने लक्षात घेतली म्हणजे अर्थकारणातील प्रंचड अपयश दृष्टीस पडते.

योजनांचे अपयश :-

आतापर्यंत सात योजना पूर्ण होत आलेल्या आहेत. प्रारंभीच्या योजनेपासूनच आपली प्रत्येक योजना अपयशी ठरली. हे योजना आयोगानेही मान्य केले. योजनांची धोरणे योग्य असली तरी त्या योजनांची अमंलबजावणी न झाल्यामुळे प्रचंड प्रमाणावर अपेक्षित उद्दिष्टे पूर्ण होऊ शकली नाहीत. योजना आयोग आणि शासन यांच्यात परस्पर सामंजस्य राहिले नाही. आयोगातील तज्ञांचा सल्ला डावलण्याचेच धोरण आखण्यात आले. त्यामुळे अनेक अर्थतज्ञांशी शासनाचे मतभेद झालेत. चौथ्या योजनेच्या वेळी स्व. डॉ. धनंजयराव गाडगीळ व पुढे प्रो. मिनहास यांचे मतभेद व राजीनामा प्रकरण सर्वांना ज्ञात आहे. अर्थनीतीचे पुढे राजकीयीकरण व्हायला लागले. आवश्यक वाटला तर तज्ञांचा सल्ला ध्यायचा अन्यथा राजकीय सोयीनुसार त्याकडे दुर्लक्ष करायचे अशी पद्वत शासन दरबारी रुढ झाली. राजकीय उद्दष्टि प्रमुख तर आर्थिक उद्दष्टि गौण ठरायला लागली. आपल्या राजकीय सोयीनुसार आर्थिक कार्यक्रम तयार करणे, घोषित करणे अशी परिपाठी सुरु झाली आणि या प्रकारामुळे समस्यांची तीव्रता वाढली. अर्थकारणातील विविध धोरणांमध्ये दूरदर्शित्वाचा अभाव, विकास योजनेतील अपेक्षित व्यापकता, निश्चितता, संबद्वता या गुणांचा अभाव , सातत्य नसलेली धोरणे, नोकरशाही व अधिकारी यंत्रणेची अकार्यक्षमता यामुळे योजनांना अपयश आले.

आर्थिक विषमतेत वाढः-

नियोजनातील आर्थिक विकासाकरिता आवश्यक असणारे अग्रक्रम निवडण्यात चूक झाल्यामुळे दारिद्रय व बेकारीची समस्या वाढत राहिली. उद्योगांचा विकास करीत असताना ग्रामीण क्षेत्राकडे दुर्लक्ष झाले. मानवाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याकरिता आवश्यक असणा-या धोरणांना ग्राधान्य न दिल्यामुळे बहुसंख्यांच्या हिताकडे दुर्लक्ष झाले. समाजातील विशिष्ट वर्गाचा सतत लाभ व विकास होत गेला. श्रीमंत अधिक श्रीमंत झाले मात्र गरीब गरीबच राहिले. अशी स्थिती अग्रक्रमाच्या धोरणाच्या अपयशामुळे झाली. मोठया प्रमाणावरील असंघटीत क्षेत्राचा संघटित क्षेत्राच्या तुलनेत विकास होऊ शकला नाही. शेतक-यांच्या शेतमालाच्या खर्चानुसार योग्य भाव मिळू शकला नाही. त्यामुळे परंपरागत कर्जाचे ओझे परतफेड करण्यास व वाढत जाणा-या खर्चाचा उत्पन्नाशी मेळ घालण्यात तो पूर्णतः असमर्थ ठरला. त्याची आर्थिक स्थिती अधिक दयनीय होत गेली. शहरी लोकांचे राहणीमान वाढले पण ग्रामीण लोकांचे वाढू शकले नाही, आर्थिक विषमता वाढली. शासकीय आकडयानुसार ४६० लक्ष लोक आजही दारिद्रयरेषेखालचे जीवन जगत आहेत. अर्थकारणातील हे एक आव्हान

आहे. नियोजनातील भांडवल तंत्राचे महत्व मान्य करुनही दारिद्रयाची व बेकारीची समस्या दूर करण्यासाठी या तंत्रासोबत श्रमप्रधान तंत्राचा उपयोग आवयश्यक असतो. श्रमप्रधान तंत्राचा उपयोग केल्यामुळे अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रामध्ये रोजगाराच्या सोयी उपलब्ध होतात, अनेक बेकारांना काम मिळते, त्यांना नियमितपणे उत्पन्न मिळू शकते व आपल्या गरजा भागविण्यासाठी आवश्यक असलेले सामर्थ्य त्यांच्यामध्ये निर्माण होते परंतु या तंत्राकडे दुर्लक्ष करण्यात आले. व्यावहारिक दृष्टीकोनातून विचार करता या दोन्ही तंत्रामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न करायला हवा होता पण असे घडले नाही.

सदोष औद्योगिक धोरणः-

औद्योगिक धोरणासंबंधीची व्यूहनीती मोठया उद्योगांना व उद्योगपतींना लाभकारक अशीच होती. औद्योगिक परवाना धोरण, आयात-निर्यात धोरण, यामध्ये ब-याच उणिवा आहेत. या सर्व धोरणांची अंमलबजावणी व्यवस्थित झाली नाही. या परिस्थितीचा फायदा देशातील भांडवलदारांनी अधिक कौशल्याने करुन घेतला. त्यामुळे त्यांच्या औद्योगिक साम्राज्याचा विस्तार झाला. निवडक घराण्यांची संपत्ती योजनाकाळात प्रचंड प्रमाणावर वाढली. औद्यागिक सत्तेचे केन्द्रीकरण झाले. शहरांचा विकास झाला. त्यात गर्दी वाढली व ग्रामीण क्षेत्र तसेच राहिले. उद्योगांच्या निर्मितीच्या संदर्भात भ्रष्टाचार वाढला.

औद्योगिक धोरणामध्ये भांडवलाची दोषपूर्ण गुंतवणूक करण्यात आली. उपभोग्य वस्तु च्या गुंतवणुकीकडे दुर्लक्ष करण्यात आले. ग्रामीण औद्योगीकरणाकडेही मोंठया प्रमाणावर दुर्लक्ष केले गेले. सर्वंकष आर्थिक विकासाकरिता ग्रामीण औद्योगीकरण करणे अतिशय महत्वाचे आहे. मोठया उद्योगांच्या विकासामुळे शहरकेन्द्री विकासाचा आकृतिबंध वाढत जातो मात्र ग्रामीण क्षेत्र अविकसित राहते. औद्योगिक सदोष धोरणामुळे खाजगी क्षेत्र संघटित व सुसंपन्न झाले तर सार्वजनिक क्षेत्र सतत हानीमय व समस्याग्रस्त झाले. खरं म्हणजे सार्वजनिक क्षेत्र हे आर्थिक विकासाचे एक उत्तम माध्यम आहे परंतु केवळ नोकरशाहीच्या अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे ते क्षेत्र अपयशी ठरले.

प्रादेशिक असमतोल :

योजना काळात विशिष्ट प्रदेशामध्ये उद्योगांची मोठया प्रमाणावर स्थापना झाल्यामुळे आर्थिक विकासाच्या दृष्टीने विभिन्न प्रदेशात विषमता व असमतोल निर्माण झाले. त्यामुळे काही राज्ये जास्त प्रगत तर काही मागासलेली आहेत. तसेच राज्यांमधील काही भागांनाही हे तत्व लागू पडते. पंजाब, हरयाना, महाराष्ट्र, गुजराथ, तामिळनाडू या राज्यांचे दरडोई उत्पन्न एकूण सरासरीपेक्षा अधिक आहें तर उत्तरप्रदेश, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश याचे दरडोई उत्पन्न फार कमी आहे. महाराष्ट्रात मराठवाडा, विदर्भ हे प्रदेश पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाच्या तुलनेत बरेच मागे आहेत. मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, कलकत्ता, कानपूर, मद्रास, बंगलोर इत्यादी मोजक्या शहरी, कार्यक्षमता व साधनसामुग्रीची उपलब्धता

या नावावर प्रचंड गुंतवणूक होत गेली व त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात या भागांचा विकास झाला. विकासाच्या दृष्टीने प्रादेशिक असमतोलाची स्थिती निर्माण झाली. अर्थकारणातील हा एक महत्वाचा प्रश्न आहे. केवळ राजकीय हेतूंमुळे विशिष्ट प्रदेशाचा विकास करण्यात आला व अन्य क्षेत्राकडे दुर्लक्ष करण्यात आले. ही स्थिती विकासाच्या दृष्टीने हानीकारक आहे.

अर्थकारणातील समस्यांची वास्तवता समाजमनाला चटके देणारी आहे. दूरदृष्टीचे धोरण, सर्वंकष विकास योजना, सार्वजनिक क्षेत्रातील लाभकारकता, परिणामकारक अमंलबजावणी इत्यांदींचा अभाव असल्यामुळे समस्या सोडविता आल्या नाही. अशा अर्थकारणाला प्रत्यक्षात विकसित दिशा देण्याचे कार्य शासनाशिवाय कोण करणार ?

* * *

१६८

डॉ. सतीश शास्त्री यांचे

अर्थधारा

आगामी

पर्यटन व्यवसाय स्वरुप आणि स

पुत्र अमृताचे ! (लेखसंग्रह)

वसंत वैभवाची नांदी ! (ललित)

युगंधर (कांदबरी)

पर्यटनाचे डोही आनंद तरंग ! (पर्य



ाहित्य

डॉ. सतीश शं. शास्त्री

ीक्षा (प्रबंध)

नविषयक)

जन्म ३१ जाने. १९५२, वसंतपंचमी, नागपूर येथे. एम. कॉम. पीएच. डी. (पर्यटन व्यवसाय) प्रपाठक, वाणिज्य-व्यवसाय प्रशासन, पदव्युत्तर वाणिज्य विभाग सी. पी. अन्ड बेरार महाविद्यालय नागपूर. अध्यक्ष, व्यासपीठ प्रबोधनकारी संस्था नागपूर. पर्यटन तज्ञ, सदस्य, इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अॅन्ड डेव्हलपमेन्ट, नवी दिल्ली. आजीव सदस्य, इंडियन एन्व्हायंरमेन्ट काँग्रेस असोसिएशन नवी दिल्ली. १९८७ मध्ये नवी दिल्ली येथे संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय विकास प्रशिक्षण परिषदेत पर्यटन तज्ञ म्हणून निमंत्रित व सहभागी. निवास - ६२ अ, विद्याविहार, प्रतापनगर नागपूर-४४००२२. 'विदर्भातील पर्यटन व्यवसाय' विषयावर संशोधनपर पीएच. डी. प्राप्त झाल्यानंतर त्याच क्षेत्रात सातत्याने संशोधन. विविध वृत्तपत्र व मासिकातून आर्थिक तसेच ललित विषयावरील लेख सातत्याने प्रसिध्द.

एक सृजनशील विचारवंत, प्रतिभासंपन्न वक्ते, वाणिज्य विषयाचे संशोधक व मराठी भाषेचे अभ्यासक म्हणून डॉ. सतीश शास्त्रींचा नांवलौकिक आहे. अशा या व्यासंगी, तज्ज्ञ संशोधकाच्या अर्थ, पर्यटन व वाणिज्य विषयावरील ज्वलंत समस्यांवर वेळोवेळी वृत्तपत्रे व मासिके यामध्ये प्रसिध्द झालेल्या महत्वपूर्ण निवडक लेखांचा समावेश असलेला हा ग्रंथ-

अर्थधारा

प्रकाशक
नचिकेत कम्युनिकेशन्स प्रा. लि. स्नेहनगर, नागपूर - १५

